१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड रविवार । दि. २६ जुलै २०२६ । अंक ५० । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## सारनाथला जागतिक वारसा दर्जा

**नवी दिल्ली :** भगवान बुद्धांनी प्रथम धम्मदेसना दिलेल्या ऐतिहासिक सारनाथचा अखेर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाला आहे. दक्षिण कोरियातील बुसान येथे झालेल्या युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीच्या ४८व्या अधिवेशनात शनिवारी ही घोषणा करण्यात आली. १९९८ मध्ये सारनाथचा युनेस्कोच्या संभाव्य यादीत समावेश झाला होता. तब्बल २८ वर्षांनंतर मिळालेल्या या मान्यतेमुळे सारनाथ हे भारतातील ४५वे आणि उत्तर प्रदेशातील चौथे जागतिक वारसा स्थळ ठरले आहे.

## चौथी, सातवी शिष्यवृत्तीचा निकाल जाहीर

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल शनिवारी ऑनलाइन जाहीर करण्यात आला. परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर निकाल पाहता येणार आहे. यंदा चौथी आणि सातवीच्या परीक्षेसाठी एकूण ११ लाख ५५ हजार ६९५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १० लाख ९० हजार ९३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. निकालाबाबत गुणपडताळणी करायची असल्यास संबंधित शाळांच्या लॉगिनमधून २ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांचा अखेर राजीनामा!



**विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश**

**जंतर-मंतरवरील आंदोलन मागे**

**आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नीट पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभर पेटलेल्या विद्यार्थ्यांच्या संतापाची धग अखेर सत्तेच्या दिल्लीदरबारापर्यंत पोहोचली. जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनासह देशभरातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या दबावापुढे 'नमो' सरकारला अखेर नमते घ्यावे लागले असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा शनिवारी (दि. २५) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सादर केला. विद्यार्थ्यांच्या रेट्यापुढे सरकारला घेतलेली ही माघार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा मोठा विजय मानला जात आहे. विद्यार्थ्यांनी सरकारसमोर ठेवलेल्या प्रमुख मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी जंतर-मंतरवरील आंदोलन अधिकृतरित्या मागे घेतले आहे. कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये केंद्रीय मंत्र्यांसोबत झालेल्या तिसऱ्या फेरीतील चर्चेनंतर विद्यार्थी प्रतिनिधी सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी पत्रकार परिषदेत आंदोलन समाप्त करण्याची घोषणा केली.

प्रधान यांनी राजीनामा देताना देशातील युवक हीच भारताची खरी ताकद असल्याचे सांगितले. तरुणांची दिशाभूल होऊ नये, ते अफवा किंवा भ्रमाच्या जाळ्यात अडकू नयेत, तसेच देशाची एकता अबाधित राहावी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य कायदेशीर प्रक्रियेत अडकू नये, या भूमिकेतून आपण राजीनामा दिल्याचे धर्मेंद्र प्रधान यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आंदोलनाऐवजी शिक्षण आणि करिअरवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

नीट परीक्षा प्रकरणावरून विद्यार्थ्यांकडून गेल्या काही दिवसांपासून जंतर-मंतरवर आक्रमक आंदोलन सुरू होते. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अथवा सरकारने त्यांना पदावरून हटवावे, या मागणीवर विद्यार्थी ठाम होते. राजीनामा मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही, असा स्पष्ट इशाराच त्यांनी दिला होता.

केंद्र सरकार आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यात शुक्रवारी चर्चेची फेरी झाली होती. सरकारच्या वतीने जे.पी. नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. मात्र, प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर तोडगा निघाला नव्हता. शनिवारी पुन्हा चर्चा होणार असतानाच प्रधान यांनी राजीनामा दिल्याने पान २ वर



> शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांनी अखेर उशिरा का होईना राजीनामा दिला. हा लाखो विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा आणि बलिदानाचा विजय आहे. परीक्षेतील गैरव्यवस्थेमुळे ज्यांनी आपली स्वप्ने गमावली, ज्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला, त्या प्रत्येक विद्यार्थ्याला हा विजय समर्पित आहे. या चळवळीत सत्तेच्या अहंकाराने विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला, अश्रुधुराचा मारा झाला, आवाज दडपण्याचा प्रयत्न झाला. पण, या दडपशाहीला सत्याचा पराभव करता आला नाही. हा देश कोणत्याही हुकूमशहाचा नाही. हा देश छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्याय आणि संविधानाच्या विचारांनी उभा आहे. या लढ्यात रस्त्यावर उतरलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे, युवकाचे, सामाजिक कार्यकर्त्यांचे आणि लोकशाहीच्या बाजूने ठाम उभ्या राहिलेल्या प्रत्येक विरोधी पक्षाचे योगदान इतिहास विसरणार नाही. हा राजीनामा शेवट नाही; तो व्यवस्थेला दिलेला स्पष्ट इशारा आहे. लोकशाही जिवंत आहे, कारण देशाचे युवा अजूनही लढत आहेत. आणि जेव्हा तरुण लढतात, तेव्हा सत्तेचे सिंहासनही हादरते. या लढ्यात बलिदान दिलेल्या तमाम विद्यार्थ्यांना शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने हा विजय समर्पित करण्यात येत आहे. या घटनेनंतर लोकशाही किती धोक्यात आहे, हे पुढच्या पिढीने शिकण्याबरोबरच राजकारणाच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे.
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या

### सुबह हो गई मामू..!

सुबह हो गई मामू... लोकशाहीची सकाळ झाली आहे. देशाची जनता जागी झाली आहे. मी आधीच सांगितलं होतं, ही पहिली विकेट आहे. इथेच थांबणार नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. मला हिरो बनवू नका. ही चूक पुन्हा करू नका. एका व्यक्तीला हिरो बनवल्यामुळे आणि त्याला संविधानापेक्षाही मोठं मानल्यामुळे देशाचं मोठं नुकसान झालं आहे. मी मोडेन, पण वाकणार नाही. चुकीच्या माणसाशी पंगा घ्यायचा नाही. या सरकारमध्ये कोणीही राजीनामा देत नाही, असं सरकारच म्हणत होतं. पण आम्ही राजीनामा घेऊन दाखवला, असा दावा अभिजित दिपके यांनी केला.

### लोकशाहीने कात टाकली : शरद पवार

नीट पेपरफुटीविरोधातील आंदोलनात विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या जिद्दीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी कौतुक केले. दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणारा हा लढा लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक आहे. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे. देशातील लोकशाहीने कात टाकली आहे आणि त्याचे श्रेय देशातील युवा पिढीला जाते, असे पवार यांनी म्हटले.

# उद्याचा मोर्चा होणारच!

- **'जेन झी'ने सरकारची मस्ती जिरवली**
- **ठाकरे बंधूंचा जोरदार हल्लाबोल**



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिल्लीच्या जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांनी उभारलेल्या आंदोलनाने केंद्र सरकारला झुकवले असतानाच, विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्रातील लढाही अधिक तीव्र करण्याचा निर्धार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केला. जेन झीने आपल्या सनदशीर आंदोलनाच्या जोरावर केंद्र सरकारचा मस्तवालपणा उतरवला असून, सरकारची मस्ती जिरवली, असा घणाघाती हल्ला दोन्ही नेत्यांनी चढवला. तसेच, शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर हा रविवार, दि. २६ जुलैचा मोर्चा ठरल्याप्रमाणे होणारच, अशी स्पष्ट पान २ वर

### मोठ्या संख्येने सहभागी व्हा : शेकाप

शेतकरी कामगार पक्ष कायमच विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठाम उभा आहे. विद्यार्थ्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी रविवारी (दि.२६) मुंबईच्या दादर येथील शिवाजी पार्क येथे तिरंगा मार्च काढण्यात येणार आहे. या मोर्चात शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन विद्यार्थ्यांची ताकद बळकट करू या, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले. नीट पेपर फुटीप्रकरणी संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथील जंतर मंतर येथे आंदोलन सुरु केले. शिक्षणमंत्री महेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह पेपर फुटी प्रकरणाची चौकशी पारदर्शक व सखोल करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी हजारो तरुण, तरुणी या आंदोलनात सहभागी झाले. मात्र, सरकारने पोलीस बलाचा वापर करीत त्यांच्यावर लाठीहल्ला करण्यात आला. या अमानुष हल्ल्यात असंख्य तरुण जखमी झाले. पान २ वर

## पाचव्या मजल्यावरुन पडून कामगार ठार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील हरिग्राम येथे बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडून बांधकाम कामगाराचा निष्पाप जळी गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना न करता कामगारांकडून धोकादायक स्थितीत काम करून घेतल्यामुळे सदर दुर्घटना घडल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या दुर्घटनेला जनानदार धरुन संबंधित बांधकाम विकासकाविरुध्द निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल तालुक्यातील हरिग्राम येथील मौजे मोरने परिसरात शांती स्कायेरा या नावाने पान २ वर

## नेरळ जंक्शनजवळ मालगाडीचे कपलिंग तुटले



- **मुंबईकडे जाणारी रेल्वे वाहतूक पाऊण तास ठप्प**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ जंक्शनजवळ लोणावळ्याहून कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या रिकाम्या मालगाडीचे सीबीसी कपलिंग आणि एअर ब्रेक होस पाईप अचानक तुटल्याने रेल्वे वाहतुकीचा खोळंबा झाला. मालगाडीचे तब्बल १६ डबे नेरळ रेल्वे फाटकाच्या मध्यभागी अडकून पडल्याने मुंबईच्या दिशेने जाणारी मध्य रेल्वेची वाहतूक सुमारे पाऊण तास विस्कळीत झाली. ऐन गर्दीच्या वेळी लोकल गाड्या खोळंबल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले.

लोणावळ्याहून कल्याण जंक्शनकडे जाणारी ही रिकामी मालगाडी दुपारी सुमारे ३.४५ वाजता नेरळ स्थानकाजवळ आली असता अचानक तिचे कपलिंग आणि एअर ब्रेक होस पाईप तुटले. त्यामुळे गाडीचा पुढील भाग नेरळ स्थानकात तर १६ डबे रेल्वे फाटकाच्या मध्यभागी थांबले. परिणामी रेल्वे पान २ वर

**वेधक**

## ट्रेलर-पिकअपच्या धडकेत मृत्यू

**नवीन पनवेल :** ट्रेलर आणि पिकअप गाडीच्या झालेल्या अपघातात अशोक दत्तात्रय मस्कर (रा. सेक्टर पाच, सानपाडा) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पिकअप चालक संदेश सर्जेराव केसरे यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २३ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पळस्पे ते जेएनपीटी रोडवर निसर्ग ढाब्याजवळ पिकअप चालक संदेश केसरे यांनी पिकअप क्रमांक एमएच ४३ बीएक्स ९२९१ ही भरधान वेगाने चालवली आणि ट्रेलरला धडक दिली. या धडकेत केसरे यांच्या बाजूला बसलेले अशोक दत्तात्रय मस्कर हे गंभीर जखमी झाले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला.

## कपल बार अँड रेस्टॉरंटवर कारवाई

**नवीन पनवेल :** कपल बार अँड रेस्टॉरंटवर कारवाई करत पोलिसांनी ११ जणांविरोधात गुन्हा दाखल केला. भिंगारी, काळुंद्रे येथील कपल बारमध्ये सात महिला वेटर ठेवणे बंधनकारक असतानादेखील सातपेक्षा जास्त महिलांना ठेवून नियमांचे उल्लंघन करण्यात आले. तसेच या महिला वेटरांनी मद्यपानगृह, उपाहारगृहमध्ये नृत्य करण्यास मनाई असतानादेखील तोकडे कपडे परिधान करून ग्राहकांसोबत लगट करताना दिसून आल्या. याप्रकरणी अरविंद नायक (मॅनेजर), प्रवीण शेट्टी, रवी कुमार मंडल आणि आठ महिला वेटर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# दहा मिनिटे वीज; दोन तास अंधार!

- **महावितरणच्या कारभाराने पेणकर त्रस्त**
- **गणपती मूर्तिकार, व्यावसायिकांना फटका**

**। पेण । प्रतिनिधी ।**

तुरळक पाऊस पडत असतानाही पेण शहरात गेल्या दोन दिवसांपासून वीजपुरवठ्याचा अक्षरशः लपंडाव सुरू आहे. दहा मिनिटे वीज आल्यानंतर तब्बल दोन तास अंधार अशी परिस्थिती निर्माण झाल्याने पेणकर संतप्त झाले आहेत. गणेशोत्सव तोंडावर असताना वारंवार वीज खंडित होत असल्याने गणपती मूर्तिकार, दुकानदार आणि लघुउद्योजकांच्या कामावर त्याचा थेट परिणाम होत आहे.

वीजपुरवठा खंडित होण्याबाबत महावितरणचे कनिष्ठ अभियंता जीवन कांबळे यांनी नगरपालिका प्रशासनाकडून झाडे तोडण्याचे काम सुरू असल्याचे कारण दिले. मात्र, नगरपालिका विद्युत विभागाचे प्रमुख शिवाजी चव्हाण यांनी हा दावा फेटाळून लावत शहरात सध्या झाडे तोडण्याचे कोणतेही काम सुरू नसल्याचे स्पष्ट केले. आवश्यक झाडांची छाटणी मे महिन्यातच करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, महावितरणच्या पान २ वर

## गावातून लालपरी थेट पंढरपुरात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटी महामंडळाने ९७ एसटी बसचे नियोजन केले आहे. त्यामध्ये १२ लालपरी थेट पंढरपुरात दाखल होणार आहेत. यातील काही बसेस शुक्रवारी पंढरीच्या वारीला निघाल्या असून, काही बसेस शनिवारी निघल्याची माहिती एसटी महामंडळाने दिली. आषाढी एकादशीनिमित्त लाखो भक्त विठ्ठल रखुमाईच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल होतात. सर्व भाविकांसाठी उत्सवाचा दिवस म्हणून मानला जातो. त्यामुळे भाविकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी एसटी महामंडळ रायगड पान २ वर

# वारकरी संस्कृतीचे रायगडमध्ये दर्शन

## आषाढी एकादशीनिमित्त शाळांमध्ये विठ्ठलाचा जयघोष दुमदुमला

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीनिमित्त रायगड जिल्ह्यामध्ये वारकरी संस्कृतीचे दर्शन घडले. जिल्हा परिषद शाळांसह वेगवेगळ्या खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांनी हातात टाळ-मृदुंग, लेझीम घेऊन पारंपरिक वेशभूषा करून हरिनामाचा जप करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाईसह इतर संतांची केलेली वेशभूषा दिंडीचे आकर्षण ठरले. संपूर्ण जिल्हा विठ्ठलाच्या जयघोषाने दुमदुमला. जिल्ह्यामध्ये मंगलमय वातावरणात हा सोहळा पार पडला. दरम्यान, पर्यावरणाचे महत्त्व पटवून देत असतानाच झाडे लावा झाडे जगवा हा संदेशही पोहोचविण्याचा प्रयत्न या वारीच्या



• (छायाचित्र : समीर मालोदे)

माध्यमातून करण्यात आला.

आषाढी एकादशीला पंढरपूरची वारी आणि चातुर्मासाची सुरुवात म्हणून ओळखली जाते. वारकरी संप्रदायातील अत्यंत पवित्र दिवस म्हणून ओळखला जातो. आषाढ महिन्यातील शुल्क पक्षाच्या एकादशीला येणार आध्यात्मिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचा दिस म्हणून मानला जातो. यंदा आषाढी एकादशी शनिवारी (दि.२५) रायगड जिल्ह्यामध्ये साजरी करण्यात आली. वेगवेगळे धार्मिक उपक्रमांतून हा उत्सव साजरा करण्यात आला. आषाढी एकादशीनिमित्त वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्या वतीने दिंडीचे आयोजन करण्यात आले. आषाढी एकादशीचे महत्त्व पटवून देण्यात आले. जिल्ह्यातील विठ्ठल रखुमाईच्या मंदिरात जाऊन दर्शन घेण्यात आले. यावेळी मंदिरात अलोट गर्दी दिसून आली. आषाढी एकादशीनिमित्त रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांसह खासगी शाळांमध्ये गावागावात व शाळेच्या परिसरात वारकरी दिंडी काढण्यात आली. काही शाळकरी मुलांनी विठ्ठल रखुमाई तर काहींनी वेगवेगळ्या पान २ वर

**गणेशमूर्ती निर्मितीचा समृद्ध वारसा पाहून आदर व्यक्त** | **नेदरलँड, जर्मनी, मलेशिया, मॉस्कोतील युवकांनी अनुभवली मूर्तीकला**

# परदेशी पाहुणे भारावले 'बाप्पा'च्या कलेने!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पाच्या मूर्तीला आकार देणाऱ्या कुशल हातांची कला, मातीपासून साकारले जाणारे देखणे रूप आणि त्यामागील शेकडो वर्षांची परंपरा... हे सारे अनुभवताना नेदरलँड, जर्मनी, मलेशिया आणि मॉस्को येथील विदेशी युवक अक्षरशः भारावून गेले. अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील प्रसिद्ध श्री गणेश चित्रशाळेला या विदेशी पाहुण्यांनी शनिवार, दि. २५ जुलै रोजी भेट देत गणेशमूर्ती निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया जवळून अनुभवली. गणेशोत्सव, भारतीय संस्कृती आणि कोकणातील मूर्तिकलेचा हा अनोखा वारसा



पाहून त्यांनी 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष करीत भारतीय संस्कृतीप्रती आदर व्यक्त केला.

लायन्स क्लबच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण उपक्रमांतर्गत विविध देशांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी भारतभेटीवर आलेले युवक अलिबागमध्ये दाखल झाले आहेत. अलिबाग लायन्स क्लबच्या सदस्यांकडे त्यांचा मुक्काम असून, पान २ वर

### मुकुटापासून अलंकारांपर्यंत...

मूर्तिकार निर्भय अनंत धोदरे यांनी विदेशी युवकांना गणेशमूर्ती निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. मूर्ती घडविताना पारंपरिक शिल्पकलेचा वापर, मूर्तीतील कलात्मक बारकावे, पर्यावरणपूरक संकल्पना तसेच गणेशमूर्तींच्या विविध रूपांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. गणरायाच्या मुकुटापासून दागिने, अलंकार, आयुधे आणि विविध आभूषणांपर्यंत प्रत्येक गोष्टीमागे असलेला ऐतिहासिक आणि आध्यात्मिक अर्थही युवकांनी जाणून घेतला. जिवंत भासणाऱ्या गणेशमूर्ती आणि त्या साकारण्यासाठी घेतली जाणारी मेहनत पाहून या युवकांनी आश्चर्य व्यक्त केले.



# स्मार्ट मीटरची सक्ती नको!

**भरमसाठ वीज बिले माफ करा**

## • सुधागडमध्ये शेकापचे कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

स्मार्ट मीटर बसविण्याच्या नावाखाली वीज ग्राहकांवर होत असलेली सक्ती आणि त्यानंतर आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ वीज बिलांविरोधात शेतकरी कामगार पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे. स्मार्ट मीटर ग्राहकांसाठी ऐच्छिक ठेवावेत, त्यांची सक्ती करू नये आणि स्मार्ट मीटर बसवल्यानंतर आलेली अवाजवी वीजबिले तातडीने माफ करावीत, अशी मागणी शेकापच्या वतीने सुधागड विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



महाराष्ट्र शासनाने पहिल्या टप्प्यात पोस्टपेड स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम सुरू केली असून, त्यानंतर प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्याचे धोरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र, ग्राहकांची पूर्वपरवानगी न घेता सक्तीने स्मार्ट मीटर बसविले जात असल्याचा आरोप शेकापने केला आहे. या मीटरमुळे अनेक ग्राहकांना नेहमीपेक्षा मोठ्या प्रमाणात वीजबिले येत असल्याने सर्वसामान्य ग्राहक आर्थिक अडचणीत सापडत असल्याचेही पक्षाने म्हटले आहे.

शेकापच्या निवेदनानुसार, सक्तीने बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरमुळे आकारण्यात आलेली भरमसाठ वीजबिले संपूर्णपणे माफ करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्राहकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता अवाजवी बिले आकारणे अन्यायकारक असून, या प्रकाराला तातडीने आळा घालण्याची मागणीही करण्यात आली.

महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याचे कंत्राट विविध कंपन्यांना देण्यात आले असून, या प्रक्रियेबाबतही शेकापने प्रश्न उपस्थित केले आहेत. ग्राहकांची संमती न घेता खासगी कंत्राटदारांमार्फत स्मार्ट मीटर बसविण्याची पद्धत बंद करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. वीज कायदा २००३ मधील तरतुदींचा दाखला देत ग्राहकांना योग्य आणि दोषरहित मीटर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी वीज वितरण कंपनीची आहे. त्यामुळे ग्राहकांवर स्मार्ट मीटरची सक्ती करू नये, असे शेकापने म्हटले आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही स्मार्ट मीटरबाबत ऐच्छिकतेचा मुद्दा स्पष्ट केला असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

स्मार्ट मीटर ऐच्छिक ठेवावेत, ग्राहकांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करू नये, तसेच अवाजवी वीजबिलांचा प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा ग्राहकांच्या प्रश्नासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेकापच्या वतीने देण्यात आला. यावेळी किसनराव उमटे, अतिष सागळे, नरेश बैकर, सुधीर साखरले, राहुल दिघे, नरेश भोईर, नितेश देशमुख, संदेश पवार आदी उपस्थित होते.

### ग्राहकांची लूट थांबवा

स्मार्ट मीटरमुळे वीज वापराच्या नोंदी अधिक असल्याने ग्राहकांना अवाजवी बिले येत असल्याचा आरोप शेकापने केला आहे. मोबाईल चार्जर, दूरदर्शन संच आदी उपकरणे प्रत्यक्ष वापरात नसतानाही वीज जोडणी सुरू असल्यास त्याचा वीज वापर मोजला जात असल्याने बिल वाढत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरच्या नावाखाली सुरू असलेली ग्राहकांची लूट तातडीने थांबवावी, अशी मागणी करण्यात आली.

# ४४ तासांत खुनाचा छडा

## •आरोपी गुजरातमधून जेरबंद

। पनवेल । प्रतिनिधी ।

जुन्या वादातून झालेल्या हल्ल्यात चालकाचा जीव गेल्याने खळबळ उडालेल्या खुनाच्या गुन्ह्याचा तळोजा पोलिसांनी अवघ्या ४४ तासांत छडा लावला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण, साक्षीदारांचे जबाब आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढत पोलिसांनी त्याला गुजरातमधील बलसाड रेल्वे स्थानक परिसरातून ताब्यात घेतले. या जलद कारवाईमुळे तळोजा पोलिसांच्या तपासाची चुणूक पुन्हा एकदा समोर आली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जुलै २०२६ रोजी रात्री नितलस गावातील 'निशा ट्रान्सपोर्ट' कंपनीच्या कार्यशाळेत चालक चंदन कपिलमुनी पांडे आणि रमेशकुमार स्वामीनाथ यादव यांच्यात जुन्या वादातून भांडण झाले होते. त्यानंतर २४ जुलै रोजी पहाटे ४.३० ते ५ वाजण्याच्या सुमारास दोघांमध्ये पुन्हा वाद झाला. यावेळी आरोपीने चंदन पांडे यांच्या डोक्यावर अवजड हत्याराने जोरदार वार केला. गंभीर जखमी झालेल्या पांडे यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर कंपनीचे व्यवस्थापक मोहम्मद आलम हनीफुल खान यांच्या फिर्यादीवरून तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खुनाच्या गंभीर गुन्ह्याची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याबरोबरच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान आरोपी गुजरातमध्ये असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर सपोनि. निलेश येवले यांच्या पथकाने गुजरात गाठत बलसाड रेल्वे स्थानक परिसरातून आरोपीला ताब्यात घेतले. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ४४ तासांत आरोपीपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर निकम, सपोनि. अजय शिंदे, निलेश येवले, सागर शिंगटे, पोउपनि. ज्ञानोबा धुळकुंडे, सिद्धेश शिंदे तसेच तळोजा पोलीस ठाण्यातील तपास पथकाने केली.

## पान १ वरून

### अखेर राजीनामा!

राजकीय वर्तुळात खळबळ उडाली.

याशिवाय आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबतही सरकारने सहमती दर्शवल्याचा दावा सीजेपीने केला आहे. भाजप किंवा त्यांच्या सहयोगी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेतले जातील, तसेच भविष्यात आंदोलनकर्त्यांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असे आश्वासन सरकारकडून देण्यात आल्याचे प्रवक्त्यांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या मागणीवरही सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे विद्यार्थ्यांकडून स्पष्ट करण्यात आले. शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या प्रस्तावांचा अभ्यास करून पुढील काळातही त्यांच्याशी संवाद सुरू ठेवण्याचे आश्वासन सरकारने दिल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनीही आंदोलनकर्त्यांनी सादर केलेल्या चारसूत्री प्रस्तावावर सकारात्मक चर्चा झाल्याचे स्पष्ट केले. सरकारकडून प्रमुख मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांना शांततेने घरी परतण्याचे आवाहन केले.

गेल्या काही दिवसांपासून जंतर-मंतरवर सुरू असलेल्या या आंदोलनाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईमुळे वातावरण अधिक तापले होते. मात्र, चर्चेच्या तीन फेऱ्यांनंतर सरकारने मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्याने अखेर आंदोलनाची सांगता झाली आहे. विद्यार्थ्यांच्या एकजुटीने आणि सातत्यपूर्ण लढ्याने सरकारला निर्णय घेण्यास भाग पाडल्याचा दावा करण्यात आला आहे.

**मोदी, शाहना सुनावलं**

आपण शांत राहणं हीच आपली ताकद आहे. आपण असंच शांतीने इथे बसून राहू. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह हे पोलिसांमार्फत काम चालवायचे. मात्र, आता यांनी आरएसएसचे गुंडही पाठवले. त्यामुळे पोलीस आणि आरएसएसच्या गुंडांनी यावं. मात्र, हे आंदोलन संपणार नाही, असं म्हणत दीपके यांनी मोदी-शहांवर हल्लाबोल करत आरएसएस आणि पोलिसांनाही सुनावलं.

आज खूप दिवसांनी मनापासून आनंद झाला आहे. तरुणाई जिंकली आहे. त्यांच्या निर्धाराला, जिद्दीला, चिकाटीने केलेल्या लढ्याला सलाम. ज्या युवा साथींनी मार खाल्ला, रक्त सांडले, रस्त्यावर राहिले, अश्रूधूर अनुभवला, त्यांच्या वेदनादायी अनुभवांशी सहवेदना राखत हे सांगायला हवे, की ते वाया गेले नाही. आमच्या पिढीला अभिमान वाटतो आणि खूप आनंद होतो आहे की या देशातील लोकशाही जेन झीच्या हातात सुरक्षित राहील. या लढ्याद्वारे देशातील सर्वधर्मीय तरुणाईने एकत्र येऊन आयडिया ऑफ इंडिया परत उभी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला साक्षी ठेवून हे आंदोलन केले. त्यांच्या विचारांना खरी आदरांजली तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा देशातील लोकशाही विरोधी, संविधान विरोधी शक्तीला सत्तेतून पायउतार करण्यात येईल.

**- उल्का महाजन, सर्वहारा जन आंदोलन भारत जोडो अभियान**

### दहा मिनिटे वीज; दोन तास अंधार!

अधिकाऱ्यांनी राजू पोटे मार्गावरील वीजवाहिन्या ४० वर्षे जुन्या असल्याचा दावा केला. मात्र, याच मार्गावरील वाहिन्या सप्टेंबर २०२५ मध्ये बदलण्यात आल्याचे सांगितले जात असल्याने 'मग त्यावेळी नेमक्या कोणत्या वाहिन्या बदलल्या?' असा सवाल उपस्थित झाला आहे.

पावसाळ्यापूर्वी देखभाल-दुरुस्तीची कामे पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत ठेवणे अपेक्षित असताना महावितरणच्या ढिसाळ नियोजनाचा फटका ग्राहकांना बसत आहे. 'बिले वेळेवर भरायची, मग वीज सुरळीत देण्याची जबाबदारी कोणाची?' असा संतप्त सवाल पेणकरांनी उपस्थित केला असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

### परदेशी पाहुणे भारावले 'बाप्पा'च्या कलेने!

डॉ. रवींद्र म्हात्रे आणि डॉ. रेखा म्हात्रे यांच्या पुढाकारातून या युवकांना वाघ्रण येथील गणेश चित्रशाळेला भेट देण्याची संधी मिळाली.

चित्रशाळेत दाखल होताच तयार होत असलेल्या आकर्षक गणेशमूर्तींनी विदेशी युवकांचे लक्ष वेधून घेतले. मूर्तींच्या बारकाव्यांचे निरीक्षण करत त्यांनी मूर्ती कशा घडवल्या जातात, त्यांना आकार कसा दिला जातो, रंगकाम आणि अलंकारांची रचना कशी केली जाते, याबाबत उत्सुकतेने माहिती जाणून घेतली.

कार्लेखिंड येथील प्रयास हॉस्पिटलचे डॉ. रवींद्र म्हात्रे यांनी या युवकांना भारतीय संस्कृती, गणेशोत्सवाची परंपरा आणि कोकणातील गणेशभक्तीचे वेगळेपण याबाबत माहिती दिली. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून, त्याला सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक परंपरेचीही जोड असल्याचे त्यांनी सांगितले.

या संवादातून विदेशी युवकांना महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे व्यापक स्वरूप समजून घेता आले. गणेशमूर्ती निर्मितीमागील कलात्मकता, श्रद्धा आणि परंपरेचा संगम त्यांना विशेष भावला.

**'बाप्पा मोरया'चा जयघोष**

चित्रशाळेतील भेटीचा समारोप करताना विदेशी युवकांनी 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष केला. भारतीय संस्कृती, कोकणातील गणेशभक्ती आणि पारंपरिक मूर्तिकलेचा जवळून अनुभव घेता आल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. या भेटीमुळे रायगडच्या गणेशमूर्ती कलेची ओळख थेट परदेशी पाहुण्यांपर्यंत पोहोचली.

गणेशमूर्ती ही केवळ मातीपासून तयार होणारी कलाकृती नाही, तर त्यामागे श्रद्धा, संस्कृती, परंपरा आणि कलाकाराची अनेक दिवसांची साधना असते. परदेशातून आलेल्या युवकांनी इतक्या उत्सुकतेने मूर्ती निर्मितीची प्रक्रिया जाणून घेतली, हा आमच्यासाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. आपल्या गणेशोत्सवाची आणि पारंपरिक मूर्तिकलेची ओळख जगभर पोहोचत आहे, याचा विशेष आनंद वाटतो.

**- मूर्तिकार निर्भय धोदरे**

### उद्याचा मोर्चा होणारच!

भूमिका त्यांनी घेतली. मुंबईत मातोश्री निवासस्थानी शनिवारी संयुक्त पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व करणारे अभिजित दिपके यांचे अभिनंदन केले. भाजप सरकारने देशात असा भ्रम निर्माण केला होता की, देशात नागरिक उरलेलेच नाहीत, ती केवळ झुरळे आहेत. मात्र, याच एका 'झुरळाने' हुकूमशाही सरकारला झुकवून दाखवले, असा टोला त्यांनी लगावला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही विद्यार्थी आंदोलनाचे जोरदार समर्थन केले. जेन झीने सरकारच्या झिंज्या उपटल्या आहेत, अशा शब्दांत त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. युवाशक्ती एकत्र आली तर ती काय करू शकते, याची जंतर-मंतरवरील आंदोलन ही केवळ झलक असल्याचेही त्यांनी म्हटले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अचानक दिल्लीला का गेले, याबाबतही राज ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. ते दिल्लीला का गेले, हे मला माहिती नाही; त्याचा खुलासा त्यांनी स्वतःच करावा, असा टोला त्यांनी लगावला.

विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात उद्याचा मोर्चा होणारच असल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. दादरच्या शिवाजी पार्कपासून सिद्धिविनायक मंदिरापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असून, तरुणांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यामुळे दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आता मुंबईतील राजकीय वातावरणही तापण्याची चिन्हे आहेत.

### मोठ्या संख्येने सहभागी व्हा : शेकाप

तर काही तरुण मृत पावले. विद्यार्थ्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी रविवारी (दि.२६) तिरंगा मार्चचे आयोजन मुंबईत करण्यात आले आहे. कोणत्याही पक्षाचा झेंडा हाती न घेता, भारताचा तिरंगा हाती घेऊन दादर येथील शिवाजी पार्क येथे तिरंगा मार्च सकाळी दहा वाजल्यापासून काढण्यात येणार आहे. हा लढा न्यायासाठी असणार आहे. राष्ट्रीय ध्वज असणारा तिरंगा हाती घेऊन रायगड जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते व तरुणांनी तिरंगा मार्चमध्ये सामील व्हावे, असे आवाहन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केले आहे.

### नेरळ जंक्शनजवळ मालगाडीचे कपलिंग तुटले

वाहतुकीसोबतच फाटकावरील रस्ते वाहतुकीचाही खोळंबा झाला.

घटनेची माहिती मिळताच रेल्वे कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले. कपलिंग आणि एअर ब्रेक होस पाईपची दुरुस्ती पूर्ण केल्यानंतर सायंकाळी ४.३० वाजता मालगाडी मार्गस्थ करण्यात आली. त्यानंतर रेल्वे वाहतूक पूर्ववत झाली.

मालगाडी मुख्य मार्गावर पाऊण तास उभी राहिल्याने मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या काही लोकल गाड्यांवरही परिणाम झाला. मालगाडीच्या कपलिंगऐवजी प्रवाशांनी भरलेल्या लोकलचे कपलिंग किंवा ब्रेक पाईप तुटले असते तर काय झाले असते? असा सवाल उपस्थित करत प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या देखभाल आणि सुरक्षाव्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली. नियमित तपासणी आणि देखभालीकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

### पाचव्या मजल्यावरुन पडून कामगार ठार

इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या बांधकाम साईटवर उत्तमकुमार कृष्णाराम यादव (३९) सेंट्रिंगचे काम करत होता. उत्तमकुमार पाचव्या मजल्यावर सेंट्रिंगचे काम करत होता. यावेळी त्याचा अचानक तोल गेल्याने तो थेट खाली कोसळला. उत्तमकुमार याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

### वारकरी संस्कृतीचे रायगडमध्ये दर्शन

संतांची वेशभूषा करून हरिनामाचा जप करण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या गजरात संपूर्ण जिल्हा भक्तीमय झाल्याचे चित्र पहावयास मिळाले. शाळकरी मुलांनी या सोहळ्याचा आनंद मनमुरादपणे लुटला. यावेळी पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. झाडांचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### गावातून लालपरी थेट पंढरपुरात

विभागाने विशेष ज्यादा एसटी बसेसचे नियोजन केले.

रायगड विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या अलिबाग, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, मुरूड, रोहा व माणगाव या आगारामार्फत एसटी बसच बुकींगची व्यवस्था करण्यात आली होती. ४० अथवा त्यापेक्षा अधिक भाविक एकत्र आल्यास त्यांच्यासाठी थेट गावातून पंढपुरात जाण्यासाठी विशेष बससेवा सुरु करण्यात आली. तसेच ज्यादा एसटी बसेसची व्यवस्थादेखील वेगळी करण्यात आली होती.

आषाढी एकादशीनिमित्त जिल्ह्यातून ज्यादा ८५ एसटी बसेस सोडण्यात आल्या आहेत. भाविकांकडून एसटीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तसेच थेट गावातून पंढरपुरात जाण्यासाठी १२ बसेसला मागणी आल्याचे सांगण्यात आले. आषाढी एकादशीनिमित्त ९७ एसटी बसेस भाविकांच्या सेवेसाठी उपलब्ध झाल्या आहेत. प्रत्येक आगारातून साधारणपणे दहा ते १३ बसेस पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आगारातील एसटी बसच्या काही फेऱ्या रद्द करण्याची वेळ महामंडळावर आली. नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्याचा फटका मोठ्या प्रमाणात बसला. २७ जुलैपर्यंत प्रवाशांना त्रास होणार आहे, त्यामुळे प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन एसटी महामंडळ रायगड विभागाकडून करण्यात आले आहे.

# खालापुरातील दूध संकलन केंद्र वादात

## • नगरपंचायत ना हरकत दाखल्याविना केंद्र सुरू

। खोपोली । प्रतिनीधी ।

खोपोली शहर मनोज कळमकर,ता. २५ जुलै बातमीदार-राज्यभर दूध संकलन केंद्र अन्न व प्रशासन विभागाच्या रडारवर असून, नगरपंचायत हद्दीत देखील सुरू असलेले दूध संकलन केंद्र नगरपंचायतीच्या ना हरकत दाखल्याशिवाय सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे या दूध संकलन केंद्राला कोणाचे अभय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



रायगड जिल्ह्यातील शासकीय दूध केंद्र दुधाचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे बंद पडले असताना खासगी दूध संकलन केंद्र मात्र जोरात सुरू आहेत. या दूध संकलन केंद्रावर कुठल्या मार्गाने दूध पुरवठा होतो, याबाबत मोठ्या प्रमाणात साशंकता आहे. खालापूर येथील दूध संकलन केंद्राबाबतदेखील अनेकदा तक्रारी होऊन देखील त्यावर कारवाई झालेली नाही. राज्यभर दूध संकलन केंद्रावर धाड सत्र सुरू झाल्यानंतर या केंद्रावरील दुधाची आवक अचानक कमी झाली आहे. त्यामुळे आधी संशयाच्या भोवऱ्यात असलेले केंद्राबाबत जागरूक नागरिकांनी नगरपंचायत मध्ये माहिती घेतली असता नगरपंचायतीकडून कोणताही ना हरकत दाखल न घेता केंद्र सुरू असल्याचे उघडकिस आले आहे. याबाबत नागरिकांनी अन्नप्रशासन विभागाला देखील तक्रार केली असून, नगरपंचायत ही अन्न प्रशासन विभाग तातडीची कारवाई करणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

> खालापूर सह अनेक ठिकाणी दूध संकलन केंद्र बेकायदेशीरपणे सुरू असून, काही ठिकाणी भेसळयुक्त दूधदेखील तयार करून विक्री केले जाते. खालापुरात दोन महिन्यांपूर्वी नागरिक आणि दूध संकलन केंद्र चालक यांच्यात वादावादी होऊन प्रकरण मारहाणीपर्यंत पोहोचले होते. अशा गोष्टीमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून, अन्न प्रशासन विभागाने वेळीच कारवाई करावी.
>
> – सुरेश गावडे, माहिती अधिकार कार्यकर्ता

> खालापूर हद्दीत सुरू असलेल्या दूध संकलन केंद्राने नगरपंचायतीकडे कोणतेही परवानगी घेतलेली नाही. ना हरकत दाखला न घेता केंद्र सुरू आहे.
>
> – वैभव ओव्हाळ, आरोग्य विभाग, नगरपंचायत खालापूर

### ट्रेलरवर आदळून क्लिनरचा मृत्यू

**पनवेल :** मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे समोरील ट्रेलर न दिसल्याने पळस्पे-जेएनपीटी रोडवर पिकअप वाहन ट्रेलरच्या मागील बाजूस जोरदार धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात पिकअपमधील क्लिनरचा मृत्यू तर चालक जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातातील पिकअप वाहन (एमएच-४३-जीएक्स-९२९१) पनवेल येथून जेएनपीटीच्या दिशेने जात होते. यावेळी पळस्पे जेएनपीटी मार्गावरील निसर्ग ढाब्याजवळ पिकअप वाहन आले असताना, मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे चालकाला समोरील ट्रेलर निदर्शनास आला नाही.

# तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरातील तक्का सिग्नल परिसरात रेडियमचे काम करणाऱ्या २४ वर्षीय तरुणावर अज्ञात व्यक्तीने कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. जखमी शाकीन समीर खान असे या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत.

या घटनेतील जखमी आर्टस पासून शाकीन समीर खान पनवेलच्या कोळखे गाव परिसरात राहण्यास असून तो तक्का सिग्नलजवळील शिवम आर्टस या दुकानात ९ महिन्यांपासून रेडियमचे काम करत आहे. शाकीन नेहमीप्रमाणे कामावर आला होता, त्यानंतर तो रात्री उशिरापर्यंत काम करत होता. मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास बाहेर मुसळधार पाऊस सुरु असताना तो आपल्या दुकानात नसला होता. याचवेळी पाठीमागून अचानक आलेल्या अज्ञात हल्लेखोराने त्याच्या डोक्यावर कोयत्याने जोरदार बार केला.

पहिल्या बारानंतर काय घठल ते समजण्यापूर्वीच दुसरा घान नसल्याने तो घानरुन दुकानाबाहेर पळाला. यावेळी बाहेर एक व्यक्ती धावताना दिसल्याने शाकीनने त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अंधार आणि पावसामुळे हल्लेखोराचा चेहरा त्याला दिसला नाही. काही अंतर गेल्यानंतर डोक्यातून रक्तस्राव होत असल्याचे लक्षात येताच तो पुन्हा दुकानात परतला. तेव्हा दुकानात कोयता पडलेला असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. हॉस्पीटलमध्ये विभागात या हल्ल्यात शाकीन गंभीर जखमी झाल्याने त्याला तत्काळ कामोठे येथील एमजीएम अतिदक्षता उपचारासाठी दाखल करण्यात आले. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणी शाकीन खान याच्या जनानावरुन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. तसेच या हल्ल्यामागील कारण आणि आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरु केला आहे.

# काळ नदीत अडकले दोन तरुण

**दोन तासांच्या थरारानंतर सुखरूप सुटका**

## • मध्यरात्री एनडीआरएफचे धाडसी बचावकार्य

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

काळ नदीला आलेल्या पुराच्या पाण्यात रात्रीच्या अंधारात दोन तरुण अडकले आणि मदतीसाठी त्यांचा आक्रोश सुरू झाला. नदीचे रौद्ररूप, मुसळधार पाऊस आणि काळोख अशा प्रतिकूल परिस्थितीत तब्बल दोन तास एनडीआरएफच्या जवानांनी जीव धोक्यात घालून शोधमोहीम राबवली. अखेर नदीच्या काठावरील झाडाजवळ अडकलेल्या दोन्ही तरुणांना बोटीच्या सहाय्याने सुखरूप बाहेर काढण्यात आले. मध्यरात्री झालेल्या या थरारक बचावकार्यानंतर दोन्ही तरुणांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.



आदिल शकील खान आणि शब्बू अशी या दोन्ही तरुणांची नावे आहेत. बुधवारी (दि. १५) झालेल्या अतिवृष्टीमुळे काळ नदी दुथडी भरून वाहत होती. रात्री साडेदहाच्या सुमारास दोन तरुण नदीच्या पाण्यात अडकल्याची माहिती महाड येथे तैनात असलेल्या एनडीआरएफ पथकाला मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पथकप्रमुख सुशांत कुमार सेठी यांच्यासह ३० जवान आणि बचावबोट तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

एकीकडे मुसळधार पाऊस, दुसरीकडे नदीचा वाढलेला प्रवाह आणि त्यात काळोख असल्याने बचावकार्य मोठे आव्हान ठरले. बॅटरीच्या प्रकाशात बोटीच्या सहाय्याने जवानांनी नदीपात्रात शोध सुरू केला. अखेर नदीच्या काठालगत एका झाडाजवळ दोन्ही तरुण अडकून पडल्याचे जवानांना दिसले. तरुण आणि नदीचा काठ यांच्यामध्ये सुमारे १०० मीटर अंतर होते. त्यानंतर एनडीआरएफच्या जवानांनी बोटीच्या सहाय्याने सावधपणे बचावकार्य सुरू केले. ाडेदहा ते साडेबारा असा सुमारे दोन तासांचा थरार सुरू होता.

### आपत्तीप्रवण गावांमध्ये जनजागृती

रायगड जिल्ह्यात जुलै महिन्यात अतिवृष्टीमुळे पूर आणि दरड कोसळण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने बचावकार्य करता यावे, यासाठी १ जुलैपासून एनडीआरएफचे पथक महाड येथे तैनात करण्यात आले आहे. पथकाचे प्रमुख मुकेश पुजारी असून त्यांच्यासोबत दोन निरीक्षक, २८ जवान आणि एक श्वान आहे. या पथकाने आतापर्यंत विविध आपत्तीच्या प्रसंगी बचावकार्य केले आहे. त्याचबरोबर महाड तालुक्यातील आपत्तीप्रवण गावांमध्ये जनजागृती मोहीमही राबविण्यात येत आहे. आतापर्यंत १४ हून अधिक ठिकाणी नागरिकांशी संवाद साधून पूर, दरड कोसळणे यांसारख्या आपत्तींच्या वेळी घ्यावयाची खबरदारी, बचावाच्या उपाययोजना आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री. भालचंद्र पंढरीनाथ घुमरे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्वे नं. / हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| ८८ / २ / ड | ०.१८.२०<br>पो. ख ०.०१.३०<br>एकूण ०.१९.५० हे. आर. पॉ. | १.८१ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीशीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : २६/०७/२०२६

सही/
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं. १५, सनराईज अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत, जि.रायगड - ४१०२०१.

# जिल्हा हरिनामाच्या गजराने दुमदुमला

आषाढी एकादशीनिमित्त जिल्हा विठ्ठलमय झाला होता. यानिमित्त अलिबाग तालुक्यांतील वरसोली येथील विठ्ठल मंदिरांमध्ये विशेष सजावट करण्यात आली होती. जिल्हाभरातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरांमध्ये भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले होते. पहाटेपासून काकड आरतीपासून ते रात्रीच्या हरिनाम जागरापर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी दर्शनासाठी मंदिरांमध्ये गर्दी केली होती. जिल्ह्यातील विठ्ठल मंदिरांत पारंपरिक पालखी मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. टाळ-मृदंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जाणार असून, वारकरी, महिला भजन मंडळे, युवक दिंडी पथके आणि लहान मुलांच्या प्रभातफेऱ्यांमुळे भक्तीचा अनोखा उत्सव अनुभवायला मिळाला होता. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि मंदिर समित्यांनी सुरक्षा, वाहतूक आणि गर्दी नियंत्रणासाठी विशेष नियोजन केले होते.


(छायाचित्र : समीर मालोदे)

## विठ्ठल नामाची शाळा भरली



### जनता विद्यालय पूर्व प्राथमिक शाळेत आषाढी दिंडी भक्तिभावात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**
आषाढी एकादशीचे औचित्य साधत खोपोली येथील जनता विद्यालय पूर्व प्राथमिक शाळेत पारंपरिक दिंडी सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. तब्बल ३० वर्षांपासून अखंड सुरू असलेल्या या उपक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसर ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल-विठ्ठल या नामघोषाने दुमदुमून गेला.

यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, वारकरी, वासुदेव आदींच्या आकर्षक वेशभूषा साकारत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. मुलांनी पारंपरिक पोशाखात टाळ-मृदुंगाच्या गजरात दिंडीत सहभाग नोंदवला. मुलांनी पांढरे धोतर, कुर्ता, डोक्यावर गांधी टोपी, तर मुलींनी नऊवारी साडी परिधान करून वारकरी संस्कृतीचे दर्शन घडवले.

शाळेच्या मुख्याध्यापिका समीक्षा ढोके यांच्या संकल्पनेतून गेली तीन दशके हा दिंडी सोहळा सातत्याने आयोजित केला जात असून, यंदाही तो अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरा, संस्कार, भक्तीभाव आणि भारतीय संस्कृतीची ओळख निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष अबुवकर जळगावकर, गगनगिरी इंटरनॅशनल स्कूलचे अध्यक्ष दिनेश गुरव, के. एम. सी. कॉलेजचे उपाध्यक्ष दिलीप पोरवाल यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मुख्याध्यापिका समीक्षा ढोके म्हणाल्या की, मराठी माध्यमाच्या जनता विद्यालयाच्या पूर्व प्राथमिक विभागात दरवर्षी हा उपक्रम आयोजित केला जातो. विठ्ठल-रुक्मिणी आणि वारकरी वेशातील विद्यार्थ्यांना पाहून शाळेचे वातावरण भक्तिमय होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्यांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यावेळी पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत, अशा पारंपरिक उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार, शिस्त आणि भारतीय संस्कृतीविषयी आदर निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली. संपूर्ण शाळा परिसर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेला आणि दिंडी सोहळ्याने उपस्थितांना भक्तिरसात चिंब भिजवले.



## चित्रातून साकारली पंढरीची वारी

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**
आषाढी एकादशी म्हटली की लाखो वारकऱ्यांची पंढरपूरकडे निघालेली वारी, टाळ-मृदुंगाचा गजर आणि पांडुरंग, पांडुरंग या नामघोषाने दुमदुमलेले वातावरण डोळ्यांसमोर उभे राहते. दरवर्षी लाखो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पायी वारी करतात. मात्र, विविध कारणांमुळे अनेक भक्तांना प्रत्यक्ष पंढरपूर वारीत सहभागी होता येत नाही. अशा भाविकांना वारीचा भक्तिमय अनुभव देण्याच्या उद्देशाने पनवेल येथील कापड बाजारातील देवण्य ब्राह्मण समाज संस्था मंदिरात चित्रकार भूषण चोणकर यांच्या संकल्पनेतून पंढरीची वारी जिवंत करणारे आकर्षक चित्र साकारण्यात आले. या चित्रामध्ये विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, भगव्या पताका, टाळ-मृदुंगाचा गजर आणि भक्तीचा उत्साह अत्यंत प्रभावीपणे रेखाटण्यात आला आहे. मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक या चित्रासमोर थांबून पांडुरंग... पांडुरंग... असा नामघोष करत दर्शन घेत होते.



## विद्यार्थ्यांची पारंपरिक वारी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, विंधणे येथे आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारीचे सुंदर सादरीकरण करून संपूर्ण शाळा भक्तिमय वातावरणाने भारून टाकली.

कार्यक्रमात मितांश पाटील याने विठ्ठल तर प्रिन्सिका कोळीने रखुमाई यांची आकर्षक वेशभूषा साकारली होती. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भक्तिगीते, अभंग आणि पारंपरिक नृत्य सादर केले. श्रीजा जोशी आणि मायरा चिट्टमपल्ले यांनी सादर केलेल्या सुंदर नृत्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

विद्यार्थ्यांनी भगवे ध्वज, तुळशीची रोपे आणि टाळ-मृदंगाच्यागजरातवारीचेसादरीकरण करून आषाढी एकादशीचा आनंद द्विगुणित केला. शाळेचे संस्थापक व अध्यक्ष कैलास पाटील यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे आध्यात्मिक व सांस्कृतिक महत्त्व समजावून सांगितले.

भारतीय संस्कृतीचे जतन, भक्तीभाव, शिस्त, एकता आणि संस्कार यांचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून पटवून दिले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक भक्तिगायनाने झाली. या उत्सवामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेचा परिचय झाला आणि संस्कृती, भक्ती व आनंद यांचा सुंदर संगम अनुभवता आला.

## विंधणे शाळेची दिंडी फेरी



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
आषाढी वारीच्या पवित्र भावनेने राजिप उत्कृष्ट शाळा, विंधणे येथे आज बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. लहानग्यांच्या मुखात विठ्ठल नामाचा गजर आणि डोक्यावर टाळ-मृदुंगाचा ठेका घेऊन संपूर्ण गाव भक्तीमय झाले होते.

शाळेच्या प्रांगणातून सकाळी बालदिंडीला प्रारंभ झाला. शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि सर्व बाल वारकरी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते.

मुलांनी डोक्यावर तुळशी वृंदावन, हात पताका आणि गळ्यात तुळशीच्या माळा धारण केल्या होत्या. ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठलच्या जयघोषात संपूर्ण गावातून दिंडी फेरी काढण्यात आली.

गावातील प्रमुख रस्त्यांवरून दिंडी फिरत असताना ग्रामस्थांनी ठिकठिकाणी फुलांची उधळण करून आणि पाण्याचे वाटप करून वारकऱ्यांचे स्वागत केले. लहान वारकऱ्यांचा उत्साह पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

दिंडीची सांगता गावातील हनुमान मंदिरात करण्यात आली. मंदिर परिसरात सर्वांनी एकत्रितपणे विठू माऊली तू माऊली जगाची हे अभंग गायन केले. त्यानंतर शांती आणि समृद्धीसाठी संत ज्ञानेश्वर महाराजांचे पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी सांगितले की, वारकरी संप्रदायातील मूल्ये लहानपणापासून मुलांमध्ये रुजावीत, एकोपा आणि भक्तीभाव वाढावा यासाठी दरवर्षी शाळेतर्फे बालदिंडीचे आयोजन केले जाते.

## महिलांची दिंडी उत्साहात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**
आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर श्रीवर्धन शहरात भक्तीमय वातावरणात महिलांची दिंडी उत्साहात पार पडली. पेशवेकालीन श्री लक्ष्मी नारायण मंदिरापासून सुरु झालेली ही दिंडी चौकर पाखाडी मार्गे मुळगाव कोळीवाडा येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात संपन्न झाली.

यावेळी हाती तुळशीवृंदावने, भगवे ध्वज आणि टाळांच्या गजरात सहभागी झालेल्या महिलांमुळे संपूर्ण परिसर ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल-विठ्ठलच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

महिलांनी फुगड्या खेळत व अभंग गात वातावरणात भक्तीचा रंग भरला. दिंडीचे विठ्ठल-रखूमाई मंदिरात आगमन झाल्यानंतर मंदिर व्यवस्थापनाकडून दिंडीचे स्वागत करण्यात आले. यानंतर मंदिर व्यवस्थापनाकडून दिंडीत सहभागी महिलांचा सत्कार करण्यात आला.

वारकरी परंपरेचे जतन आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे यंदाचा आषाढी एकादशीचा उत्सव श्रीवर्धनकरांसाठी विशेष आणि स्मरणीय ठरला. या दिंडी वेळी परिसरातील नागरिकांचीही उपस्थिती लाभली होती.



## मुरुडच्या विठ्ठल मंदिरात लांबच लांब रांगा



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड जुनी पेठ येथील भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल रुक्मिणीची पूजा करण्याकरीता पहाटेपासून शेकडो वारकरी आणि भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती. दर्शनासाठी मंदिराच्या प्रवेशद्वारापासून लांबच लांब रांगा लागल्या होत्या.विठ्ठल... विठ्ठल...च्या अखंड नामगजरात भाविकांनी भक्तिभावाने श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले.

आषाढ मासाच्या शुक्ल पक्षातील एकादशीला देवशयनी आणि वद्य पक्षातील एकादशीला कामिका असे म्हटले जाते. वर्षभरातील चोवीस एकादशी मध्ये आषाढी एकादशीचे विशेष महत्व असल्याचे सर्व भक्त पंढरपुरला किंवा आपल्या परिसरातील विठ्ठल मंदिरात जाऊन पुजा अर्चा केली जाते. या दिवशी सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. आषाढ एकादशीला प्रात:स्नान करुन तुलसी वाहुन विष्णुपुजन करण्यात येते या पुजेचा मान-कुंभार वाड्यातील प्रकाश रविंद्र चव्हाण व त्यांच्या पत्नी प्राजक्ता प्रकाश चव्हाण यांना मिळाला. पहाटे महापुजा आरती झाल्यानंतर मंदिर सर्वांसाठी खुले केले होते. पंचक्रोशी भागातील एकमेव मंदिर असल्यामुळे शहरांसह पंचक्रोशी भागातील वारकरी व भाविकांची गर्दी होत असते. तेलवडे, वाणदे, जोसरंजण, खारअंबोली, आदी भजने मंडळी येऊन भजन व किर्तन गायली जातात. सर्व भक्तांना तिर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री काळ भैरव विठ्ठल रुक्मिणी देवस्थानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वास चव्हाण, उपाध्यक्ष संदिप राजपुरकर, खजिनदार प्रकाश चव्हाण, सचिव संजय नाईक, दिलीप जामकर व कार्यकारणी सदस्य व आदिंसह भक्तांनी परिश्रम करुन सुयोग्य व्यवस्थापन ठेवले होते. यावेळी मुरुड पोलीस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शिंपी समाज मंदिरात भक्तांची गर्दी

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**
पनवेल येथील प्राचीन शिंपी समाजाच्या सुमारे ११५ वर्षांच्या इतिहास लाभलेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळपासूनच महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच युवकांनी विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिरात अभिषेक, महापूजा, हरिपाठ, भजन आणि नामसंकीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात वारकरी भक्तांनी विठूमाऊलीच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत दर्शन घेतले.

## कडावमध्ये बालगोपाळांची दिंडी



**। कर्जत । प्रतिनिधी ।**
कडाव येथील शिशु मंदिर शाळेने आषाढी एकादशी निमित्त बालगोपाळ यांनी वारकरी वेश परिधान करून दिंडी काढली. टाळ-मृदंग, विठूनामाचा गजर अन् बालवारकऱ्यांचा उत्साह दिसून आला.

शिशु मंदिर शाळेचे विद्यार्थ्यांनी कडाव गावात दिंडी काढली. या दिंडीमध्ये बालगोपाळ पारंपरिक दिंडी मोठ्या उत्साहात काढण्यात आली होती.

विठ्ठलनामाच्या गजरात, टाळ-चिपळ्यांच्या निनादात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होते. शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कुडे तसेच अंजली गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली शिशु मंदिर कडाव ते बालदिगंबर गणपती मंदिर या मार्गावर ही दिंडी काढण्यात आली.

याप्रसंगी पुष्पा मोहिते, अर्चना भोसले, करुणा तांडेल, माया गंगावणे, भाग्यश्री म्हात्रे, सोनाली पवार, रूपाली थोरवे, प्रगती कडव, पुनम गायकर, माया अंकुश गंगावणे, सुशीला गायकर, उर्मिला गायकर, मधुरा ठोंबरे यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

## शारदा मंदिरात भक्तीगीते सादर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत शहरातील अभिनव ज्ञान प्रबोधिनीच्या शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेतून दहिवली येथील पुरातन विठ्ठल मंदिर अशी दिंडी काढली. शाळेचे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनि दिंडीच्या माध्यमातून दहिवली येथील विठ्ठल मंदिरात आषाढी वारी साजरी करताना येथे आयोजित धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला.

कर्जत शहरातील शारदा मंदिरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदा ही आषाढी वारीचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी वारीचे महत्त्व वारकरी परंपरा ही लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये रुजावी या उद्देशाने दरवर्षी दहिवली विठ्ठल मंदिरात



भजन अभंग विठ्ठल भक्ती गीते सादर करण्यात आली. यावर्षी इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी आषाढी वारी मध्ये सहभाग घेतला. तर शाळेच्या शिक्षिका द्विविजा श्रीराम पुरोहित यांनी पंढरीच्या वारीचे महत्व सांगणारे व्याख्यान विद्यार्थ्यांसमोर सादर केले.या उपक्रमाची संकल्पना संस्थेचे अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनी राबविली असून शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे यांच्या माध्यमातून हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी असे उपक्रम आयोजित केले जातात. कार्यक्रमाचे नियोजन श्रद्धा जामघरे यांनी केले तर शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे पारंपरिक पोशाखात सहभागी झाल्याने दिंडीमध्ये रस्त्याने चालणारे वाटसरू देखील सहभागी झाले होते.

## ग्रामस्थांकडून सन्मान



**। खांब । प्रतिनिधी ।**
रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथील विद्यार्थ्यांनी आषाढी वारी निमित्त काढण्यात आलेली दिंडी सोहळ्याचे धानकान्हे ग्रामस्थ यांच्याकडून मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या दिंडी सोहळ्यानिमित्त पंढरपूरच्या आषाढी वारीची परंपरा बालमनावर बिंबविण्यासाठी तसेच संस्कृतीची ओळख व्हावी या उद्देशाने सदरील दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धोंडू कचरे, सखाराम कचरे, यशवंत माहित, पांडुरंग गोसावी, विनायक गोसावी, रोहन गोसावी, दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या दिंडी सोहळ्यात वारकरी संप्रदायाची पारंपरिक वेशभूषा करून व पालखी तयार करून विविध अभंग तसेच भजनाचे गायन करून धानकान्हे गावात वारकरी दिंडी काढण्यात आली होती.

## शिपुरकर,वाघरे शाळा भक्तीरसात न्हाहली

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगाव येथील सुधाकर नारायण शिपुरकर विद्यालय आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम विद्यालयात आषाढी एकादशीचा पवित्र सोहळा अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात मोठ्या श्रद्धेने साजरा करण्यात आला. संतांच्या परंपरेचा, वारकरी संप्रदायाच्या संस्कारांचा आणि भक्तीचा अमूल्य वारसा बालमनात रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनाला अक्षरशः स्पर्श केला.

लहान विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम



तसेच वारकऱ्यांचा पारंपरिक वेश परिधान करून साकारलेली रूपे सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. निरागस चेहऱ्यांवर ओसंडून वाहणारी भक्ती, हातात भगवे पताके, गळ्यात तुळशीच्या माळा आणि कपाळावर गंधाचा टिळा अशा वेशभूषेमुळे शाळेचा परिसर जणू छोट्याशा पंढरपुरातच परिवर्तित झाला होता. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि विठ्ठल... विठ्ठल..., रामकृष्ण हरी..., ज्ञानोबा-तुकोबा..., माऊली... माऊली... अशा अखंड नामस्मरणात दिंडी व पालखी मिरवणूक काढली. संपूर्ण परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता.

प्रत्येक पावलागणिक भक्तीचा उत्साह आणि विठुरायावरील अपार श्रद्धा अनुभवायला मिळत होती. वारकरी परंपरेतील प्रेम, समता आणि बंधुभावाचा संदेश देत विद्यार्थ्यांनी एकमेकांना प्रेमाने आलिंगन देऊन शुभेच्छा दिल्या. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकी, प्रेम आणि भक्ती यांचे महत्त्व या उपक्रमातून बालमनात रुजविण्यात आले. उपस्थित पालक, शिक्षक आणि नागरिकांनीही या भावस्पर्शी क्षणांचा मनापासून आनंद घेतला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ धार्मिकपरंपरेचीओळखझालीनाही, तर संतांच्या विचारांचा, संस्कारांचा आणि सामाजिक ऐक्याचा अमूल्य संदेशही मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निवडक

## गुरुदत्त ढाकणे राज्यात दुसरा



**सुतारवाडी :** गुरुकुल एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर आयोजित गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा (जीटीएस) घेण्यात आली होती. या परीक्षेत राजिप शाळा सुतारवाडीचा विद्यार्थी गुरुदत्त बाळासाहेब ढाकणे या विद्यार्थ्याला शंभर पैकी ९८ गुण मिळवून तो राज्यात दुसरा आला. तर मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत राज्यात ९ वा आला आहे. याच शाळेची विद्यार्थिनी धनिष्ठा ओमप्रसाद सुतार ही विद्यार्थिनी सामान्य ज्ञान परीक्षेत केंद्रात दुसरी आली आहे. गुरुदत्त ढाकणे आणि धनिष्ठा सुतार यांनी मिळविल्या यशा बद्दल त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे.

## ८० फिटनेस स्टुडिओतर्फे वृक्षारोपण




**अलिबाग :** पर्यावरणाच्या संवर्धनाची जाणीव समाजात रुजविण्याचा उद्देशाने शुक्रवारी (दि.२३) जुलै रोजी बेलकडे येथे वृक्षारोपण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी एफएटीचे ५० सदस्य उपस्थित होते. त्यावेळी ६० झाड लावण्यात आली. तसेच पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. वृक्षारोपणात पिंपळ, आवळा, उंबर, चिंच, सिताफळ, बाबू, काजू आदी झाडे लावण्यात आली. नुसते झाड न लावता त्याचे संवर्धन पण झाले पाहिजे या उद्देशाने संवर्धनाचे जबाबदारी अद्वेत पाटील, संचित म्हात्रे, डॉ. सागर खेदु, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे यांनी घेतलेली आहे. या कार्यक्रमाच्या वेळी नगरपालिकेचे सीईओ सागर साळुंखे, अद्वेत पाटील, जयेश नील, सागर कवळे, सुरेंद्र ढवळे आदी सदस्य उपस्थित होते.

## कुत्र्यांच्या हल्ल्यात वासरू जखमी



**रोहा :** भटक्या कुत्र्यांच्या हल्लूयात लहानगा गोंडस पाडस (वासरू) जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि.२३) रोजी सकाळी रोहे शहरापासून जवळ असलेल्या निवी गावात घडली. या घटनेमुळे ग्रामस्थ विशेषतः शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. सर्पमित्र सुनील बामुगडे व त्यांच्या साथीदारांनी मोठ्या धाडसाने व शिताफीने जखमी वासराला पकडून औषधोपचारासाठी प्राणी मित्र कुमार देशपांडे यांच्याकडे घेऊन गेले. प्राणीमित्र कुमार देशपांडे यांनी जखमी वासराला रेबीज इंजेक्शन देऊन त्याच्यावर उपचार केले. या दरम्यान लहानग्या वासराचे जीव वाचविण्यात तरुणांना यश आले. निवी भागात सद्या भटक्या कुत्र्यांची दहशत दिवसेंदिवस वाढत आहे. वाहन चालक व नागरिकांवर हल्ला करणाऱ्या भटक्या कुत्र्यांमुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडवत असून हे भटके कुत्रे लहान वासरे, कोंबडयांवर देखील हल्ले करत असल्याने संबधित प्रशासनाने या भटक्या कुत्र्यांचा वेळीच बंदोबस्त करावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## कोलाड रस्त्याला जिवघेणे खड्डे



**कोलाड :** कोलाड बाजारपेठेतील बायपास रस्त्याची परिस्थिती अतिशय बिकट झाली आहे. रस्त्याला मोठं-मोठे खड्डे व उड्डाण पुलावरून वाहणारे धबधबे यामुळे उड्डाण पुलावरून येणाऱ्या पाण्याबरोबर मोठी खडी ही रस्त्यावर येत आहे. रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे रस्त्यातील खड्डे व वाहून आलेली खडी वाहन चालकांच्या लक्षात येत नाही, यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. पावसामुळे उड्डाण पुलावरून आलेल्या पाण्यामुळे कोलाड मच्छी मार्केट जवळ पूरस्थिती निर्माण झाली आहे. रस्त्याला पडलेले खड्डे व उड्डाण पुलावरून आलेली खडी ही पाण्यातून मार्ग काढतांना वाहन चालकांच्या लक्षात येत नसल्याने मोठा अपघात घडण्याची शकता निर्माण झाली आहे. काही दिवसापूर्वी खड्डे भरण्यासाठी आंदोलन करण्याची तयारी दर्शविली होती यामध्ये संबंधित ठेकेदारांनी खड्डे भरण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर ठेकेदारांनी थतुर् मातुर खड्डे भरले होते. परंतु आता परिस्थिती जैसे थे झाली आहे.

## स्वच्छता कर्मचाऱ्यांना पीपीई किटचे वाटप




**श्रीवर्धन :** भारत सरकारच्या यांत्रिक स्वच्छता परिसंस्थेसाठी राष्ट्रीय कृती अभियानांतर्गत श्रीवर्धन नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी पीपीई किट वाटपाचा कार्यक्रम शनिवारी पार पडला. याप्रसंगी श्रीवर्धन नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अतुल चौगुले, उपनगराध्यक्ष अनंत गुरव आणि मुख्याधिकारी अवधूत कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शन करताना मान्यवरांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव केला. नगरपरिषदेचे स्वच्छता कर्मचारी हे शहराचे खरे आरोग्य रक्षक आहेत. त्यांच्या सुरक्षिततेची आणि आरोग्याची काळजी घेणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मान्यवरांनी केले. तसेच दैनंदिन काम करताना स्वतःच्या संरक्षणासाठी या सुरक्षा साधनांचा नियमित वापर करण्याचे आवाहनही कर्मचाऱ्यांना करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते स्वच्छता कर्मचाऱ्यांना पीपीई किट प्रदान करण्यात आले. नगरपरिषदेने या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी घेतलेल्या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले. या कार्यक्रमास नगरपरिषदेचे अभियंता, कर्मचारी व स्वच्छता दलातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सेतू कार्यालयात एजंटांचा सुळसुळाट

- नागरिकांची उघडउघड अडवणूक
- सामान्याकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तहसील कार्यालयातील मसेतूफसुविधा केंद्र सध्या नागरिकांच्या मदतीसाठी की एजंटांचे खायचे दुकान, असा सवाल उपस्थित होत आहे. सेतू कार्यालयाच्या आवारात एजंटांचा प्रचंड सुळसुळाट वाढला असून, नागरिकांची उघडउघड अडवणूक आणि फसवणूक करून मलाई लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

विविध दाखले, कागदपत्रे आणि शासकीय कामांसाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना सरळ मार्गाने काम करणे कठीण झाले आहे. आम्ही अधिकाऱ्यांच्या ओळखीचे आहोत, तुमचे काम एका दिवसात करून देतो, असे सांगून एजंट नागरिकांकडून हजारो रुपये उकळत आहेत.

विशेष म्हणजे, पुरवठा कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांना या बाबत विचारणा केली असता कर्मचारी नियमानुसार मूळ अर्जदाराची मागणी करतात, तेव्हा अर्जदार आले नाहीत, आम्ही त्यांचेच काम घेऊन आलोय, आम्ही सामाजिक कामे करतो काम करूनच द्या! अशी अरेरावी हे एजंट कार्यालयात करतात असे सांगितले आहे. ओळखीचा सुगावा देऊन आणि राजकीय किंवा इतर दबाव आणून कामे पदरात पाडून घेण्याचा सपाटा या एजंटांनी लावला आहे.

काम नसेल होत तर क्लायंटला खिडकीत पाठवून गर्दी केली जाते. कागदपत्रांची पातळीची प्रक्रियेत चुकामूक झाल्याने बांगलादेशी रेशनकार्ड कसे बनतात ह्याचे उदाहरण दिसते. या बाबत पुरवठा कार्यालयात अनेकदा विवाद होताना दिसले आहे. या त्रासाबद्दल कार्यालयाने वरीष्ठना माहिती दिली असल्याचे समजते

शासकीय नियमांनुसार अत्यंत कमी शुल्कात होणाऱ्या कामांसाठी हे एजंटच्या संगनमताने महा-ई-सेवा केंद्र सामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक करत जनतेकडून अव्वाच्या सव्वा पैसे वसूल करत आहेत.नवीन रेशनकार्ड आता शासकीय संकेतस्थळा वरुन सुविधा मिळाली मात्र याचा फायदा महा-ई -सेवा केंद्र घेत आहेत. ह्यावर कोणाचेही नियंत्रण नाही असे दिसते आहे.

### प्रशासनाकडून कडक कारवाईची मागणी

या प्रकारामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही नाहक ताण येत असून, अरेरावी करणाऱ्या एजंटांवर प्रशासनाने आणि पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.सेतू आवारात रोज दिसणारे एजंटांच्या वावरावर त्वरित बंदी घालावी. फक्त मूळ अर्जदारांनाच प्रत्यक्ष उपस्थितीत प्रवेश द्यावा. महा-ई -सेवा केंद्राला शासनाने ऑनलाईन शुल्क मर्यादा जिल्हाधिकारी कडून ठरवून द्यावी. दलालांची अरेरावी थांबवण्यासाठी सीसीटीव्ही आणि सुरक्षा रक्षक तैनात करावेत अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> ग्रामीण भागातून किंवा दूरवरून येणाऱ्या अशिक्षित व गरजू नागरिकांना कार्यालयाच्या परिसरात उभे राहून फॉर्म भरण्यास मदत करतो सांगून नागरिकांना जाळ्यात ओढले जाते ऑनलाईन करण्यास ठराविक सेवा केंद्राकडे पाठवून तेथे ३ ते ४ हजार उकळले जात आहे. सर्वसामान्य अर्जदारांची मोठी आर्थिक फसवणूक होत असून, प्रशासनाच्या प्रतिमेलाही मोठा धक्का बसत आहे. तहसील सेतू येथील रेशनकार्ड एजंटना प्रशासनाने यावर तात्काळ चाप लावावा.
>
> -पीडित नागरिक



## खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

**खांदा कॉलनी :** मुसळधार पावसामुळे पनवेल शहरातील अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेषतः पनवेलमधील गावदेवीकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे.

अवघ्या महिनाभरापूर्वी या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात आले होते; मात्र पुन्हा झालेल्या पावसामुळे रस्ता उखडून ठिकठिकाणी मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. या मार्गावरून दररोज शेकडो रिक्षा, दुचाकी आणि इतर वाहनांची ये-जा सुरू असते. खड्डे चुकविताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि रिक्षाचालकांना या रस्त्यावरून प्रवास करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## साई सेवा मंडळाचे वृक्षारोपण उत्साहात

**चिरनेर :** श्री साई सेवा मंडळ उरण विभाग उरण ते शिर्डी मानाच्या पहिल्या पालखीच्या वतीने सामाजिक उपक्रम एक झाड आई वडिलांच्या नावाने या संकल्पनेतून करळ ब्रीज आणि करल फाटा ते दास्तानफाटा या पालखी मार्गावर १३५ झाडांचे रोपण करण्यात आले. सदर कार्यक्रम लोकसहभागातून झाला. यावर्षी मंडळ २६ वर्षात प्रदार्पण करत आहे. आणि त्याच नियोजन सुरू झाले आहे. यावेळी अध्यक्ष सतीश पाटील, उपाध्यक्ष सुधीर ठाकूर चंद्रकांत म्हात्रे, जगदीश कडू, अमित मुंबईकर, अतिश पाटील, हरेश्वर ठाकूर व साईभक्त उपस्थित होते.

## उरण पोलिसांचा सुरक्षा 'अवेअरनेस' उपक्रम




**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कायदा, सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्ती याबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी उरण पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थी सुरक्षा अवेअरनेस उपक्रम राबविण्यात आला. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश खांदवे, बीट मार्शल व गोपनीय शाखेच्या अमलदारांनी उरण परिसरातील चार शैक्षणिक संस्थांना भेट देऊन विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला.

मोहिमेअंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गुन्हेगारी, सायबर फसवणूक आणि वाहतूक नियमांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. शिक्षकांना गुड टच-बॅड टच, मोबाईलचा योग्य वापर आणि मित्रांसोबत वागताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षकांना व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम, अनोळखी व्यक्तींपासून सावध कसे राहावे आणि पोलिसांच्या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती देण्यात आली. बीट मार्शल आणि गोपनीय शाखेच्या अमलदारांनी प्रत्यक्ष उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना विविध गुन्ह्यांपासून दूर कसे राहावे याचे प्रात्यक्षिकही दाखवले.

## रेल्वे स्थानकातील स्वच्छतागृह दुर्गंधीच्या विळख्यात

- प्रवाशांचा संताप,
- आंदोलनाचा इशारा

**| चणेरा | प्रतिनिधी |**

मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक असलेल्या रोहा रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सुविधांसाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेले अत्याधुनिक स्वच्छतागृह रेल्वे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अस्वच्छतेच्या गर्तेत सापडले आहे. नियमित साफसफाईचा अभाव, तीव्र दुर्गंधी, पाणीपुरवठ्यासाठी नळच गायब आणि तुंबलेल्या ड्रेनेजमुळे प्रवाशांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या महत्त्वाच्या स्थानकावरील स्वच्छतागृहात अनेक ठिकाणी नळच नसल्याने प्रवाशांना पाण्याच्या बाटल्या घेऊन जावे लागत आहे. वापरानंतर रिकाम्या बाटल्या कमोडमध्ये किंवा परिसरात टाकल्या जात असल्याने ड्रेनेज व्यवस्था वारंवार तुंबत असून अस्वच्छतेची समस्या अधिकच गंभीर बनली आहे. परिणामी, संपूर्ण परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे.

रोहा स्थानक हे मध्य रेल्वेचे अंतिम स्थानक असून येथून पुढे कोकण रेल्वेची हद्द सुरू होते. मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून ये-जा करणाऱ्या हजारो प्रवाशांसाठी हे महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र, अशा स्थानकावरील मूलभूत सुविधांची झालेली दुरवस्था रेल्वे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे.

स्थानकाबाहेरील वाहनतळाची स्थितीही तितकीच बिकट आहे. पावसामुळे संपूर्ण परिसर चिखलमय झाला असून वाहनचालकांना चिखलातच वाहने उभी करावी लागत आहेत. त्यामुळे प्रवासी आणि वाहनधारक दोघांनाही मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

प्रवाशांनी स्वच्छतागृहांची नियमित साफसफाई, गायब झालेल्या नळांची तातडीने बसवणूक, ड्रेनेज व्यवस्थेची दुरुस्ती आणि वाहनतळ चिखलमुक्त करण्याची मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली आहे.

## नेत्र तपासणी शिबीर उत्साहात

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले. डॉ. सुभाष डवले यांनी यानिमित्त डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी राबवलेल्या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून नेत्र तपासणी सर्व विद्यार्थ्यांनी करून घ्यावी असे आवाहन केले.

## जेएनपीएच्या कामगार ट्रस्टी पदाची निवडणूक रखडली

- कामगार संघटनांमध्ये असंतोषाचे वातावरण

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

जेएनपीए कामगार विश्वस्त पदाच्या मुदत संपुष्टात येऊन चार महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र, त्यानंतरही केंद्रीय कामगार आयुक्तांकडूनच जेएनपीए कामगार विश्वस्त पदाच्या निवडणुकीसाठी मंजुरी दिली नाही. केंद्रीय आयुक्तांलयाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे जेएनपीए दोन कामगार विश्वस्त पदाच्या निवडणुक रखडली आहे. यामुळे कामगारांचे प्रश्न बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मांडण्यात प्रतिनिधीच नसल्याने कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. जेएनपीए प्राधिकरण स्थापनेनंतर ऑक्टोबर २०२२ मध्ये पहिल्याच कामगार ट्रस्टींच्या निवडणुकी पार पडली होती. या निवडणुकीत उबाठा गटाचे माजी जिल्हा प्रमुख व जेएनपीटी कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष व दिनेश पाटील पहिल्या क्रमांकांची (२९१ मते) मिळवित ट्रस्टीपदी लागोपाठ निवडून येण्याची हॅट्रिक साधली होती. तर जेएनपीटी वर्कर्स युनियनचे सरचिटणीस व माजी कामगार ट्रस्टी रविंद्र पाटील यांनी दुसऱ्या क्रमांकाची (१६१ मते) मिळवून जेएनपीए कामगार ट्रस्टी पदाचा दुसऱ्यांदा बहुमान पटकावला होता. न्हावा-शेवा बंदर कामगार (अंतर्गत) संघटनेचे सरचिटणीस व माजी ट्रस्टी भुषण पाटील यांना १४३ मते न्हावा-शेवा पोर्ट ॲण्ड जनरल वर्कर्स युनियनला अवघी ५१ मते मिळाल्याने या दोन्ही कामगार संघटनांना पराभवाला सामोरे जावे लागले होते.

बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या सदस्यांची संख्या कमी करुन १७ वरुन ९ वर आणण्यात आली आहे. या ९ पैकी ७ जागा जेएनपीए अध्यक्ष, उपाध्यक्ष, सीमाशुल्क विभागाचे मुख्य आयुक्त, महाराष्ट्र बंदर विभागाचे प्रिन्सिपल सेक्रेटरी आदी संचालकपदी पदसिद्ध नियुक्ती केली जाते. तर बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या दोन जागा कामगारातून निवडून येणाऱ्या कामगार प्रतिनिधींची नियुक्ती केली जाते. याआधी बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या मुदतीचा कालावधी दोन वर्षांचा होता. प्राधिकरणाच्या निर्मितीनंतर संचालकांचा कार्यकाळ तीन वर्षांचा करण्यात आला आहे.

मात्र, कामगार ट्रस्टींचा कालावधी ३१ मार्च २०२६ रोजीच संपुष्टात आला आहे. त्यामुळे कामगार ट्रस्टींना मागील चार महिन्यात झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत सहभागी होता आलेले नाही. यामुळे बंदर कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या व अनेक प्रलंबित प्रश्न बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मांडता आलेले नाहीत. यामुळे कामगारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## यांत्रिकीकरणामुळे भातशेतीला नवी दिशा

### यांत्रिक भात लागवडी यशस्वी




**| माणगाव | प्रतिनिधी |**

बदलत्या काळात शेती अधिक किफायतशीर, आधुनिक आणि उत्पादनक्षम करण्याच्या उद्देशाने कृषी विभागाच्या पुढाकारातून मौजे कोशींबळे ता. तळे येथे प्रगतशील शेतकरी बापू बबकम यांच्या शेतात यांत्रिक पद्धतीने भात लागवडीचे प्रात्यक्षिक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

शेतमजुरांची टंचाई, वाढता मजुरी खर्च आणि वेळेअभावी अनेक शेतकऱ्यांना भात लागवडीत अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर यांत्रिक भात लागवड ही काळाची गरज ठरत असून, कमी वेळेत, कमी खर्चात आणि योग्य अंतरावर रोपांची लागवड करून अधिक उत्पादन मिळविण्याचा प्रभावी पर्याय असल्याचे या प्रात्यक्षिकातून स्पष्ट झाले. प्रात्यक्षिकावेळी आधुनिक भात लागवड यंत्राच्या साहाय्याने रोपांची अचूक आणि समसमान लागवड कशी केली जाते, याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर, खत व्यवस्थापन सुलभ होणे, तण नियंत्रणास मदत आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक बाबींची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. उपस्थित शेतकऱ्यांनी यंत्राची कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहून विविध शंकांचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे, जिल्हा तंत्र अधिकारी सीमा चौधरी, तालुका कृषी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती देत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

महिलांच्या ओठांवर लावणीची गाणी | गावांमध्ये पारंपरिक पद्धतीने भातलागवड

# रोहा तालुक्यात भातलागवडीची लगबग



**| चणेरो | प्रतिनिधी |**

दमदार पावसाच्या आगमनाने रोहा तालुक्यातील भातलागवडीच्या कामांना चांगलाच वेग आला असून, तालुक्यातील कोलाड, खांब, धाटाव, गोफण, चणेरा, कोकबन, घोसाळे, उडदवणे, वरसे, देवकान्हे आदी गावांतील शिवार सध्या शेतकऱ्यांच्या उत्साहाने गजबजून गेले आहेत. काळ्या मातीत राबणारे शेतकरी, महिलांच्या ओठांवर झुलणारी पारंपरिक लावणीची गाणी, सामूहिक श्रमदान आणि शेतातच होणारे सामूहिक जेवण यामुळे ग्रामीण संस्कृतीचे जिवंत आणि मनमोहक दर्शन घडत आहे.

पावसाने अनुकूल साथ दिल्याने शेतकऱ्यांनी भातलागवडीची कामे युद्धपातळीवर सुरू केली आहेत. यंत्रांच्या युगातही अनेक गावांमध्ये पारंपरिक पद्धतीने भातलागवड करण्याची परंपरा आजही कायम असून, गावागावांत श्रमदानाच्या माध्यमातून एकमेकांच्या शेतात मदतीचा हात दिला जात आहे. त्यामुळे केवळ शेतीचे कामच वेगाने होत नाही, तर गावातील सामाजिक ऐक्यही अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

याच पार्श्वभूमीवर वरसे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा प्रगतशील शेतकरी अमित मोहिते यांनी स्वतः शेतात उतरून भातलागवडीत सहभाग घेतला. सुमारे सहा ते सात एकर क्षेत्रात त्यांनी पारंपरिक पद्धतीने मजयाफ या भात वाणाची लागवड केली. राजकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळतानाही शेतीशी असलेली आपली नाळ त्यांनी कायम जपली असल्याचे यावेळी दिसून आले.

लावणीदरम्यान महिलांनी पारंपरिक लावणीची गाणी गात संपूर्ण शिवारात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. दुपारच्या वेळी शेतातच सामूहिक जेवणाचा कार्यक्रम पार पडला. श्रम, सहकार्य आणि संस्कृतीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने हा सोहळा केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता ग्रामीण जीवनातील सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरला.

> शेती हा आमचा केवळ व्यवसाय नसून संस्कार आहे. समाजाचे पोट भरणाऱ्या या मातीत राबण्यातच खरा अभिमान आहे. आम्ही अनेक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने शेती करत आलो असून, यंदाही जया या भात वाणाची लागवड केली आहे. आमच्या वाडीतील सुमारे ४० मजूर आणि ग्रामस्थ गेल्या ४० वर्षांपासून एकत्र येऊन भातलागवडीची परंपरा जपत आहेत. एकमेकांच्या शेतात श्रमदान करण्याची संस्कृती आजही कायम असल्यामुळे बाहेरून मजूर आणण्याची गरज भासत नाही. हीच गावाच्या एकोप्याची आणि ग्रामीण संस्कृतीची खरी ताकद आहे.
>
> -अमित मोहिते
> शेतकरी

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२६ जुलै**

१) श्री. बाळाराम वामन पाटील
मु.ढवर, अलिबाग, २६-७-१९४१

# मुरूड-एकदरा खाडी गाळाने बुजली

## ● मासेमारी हंगामापूर्वी गाळ काढण्याची मागणी ● मच्छिमारांचे तहसीलदारांना निवेदन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड-एकदरा खाडीतील वाढत्या गाळामुळे मच्छिमारांच्या बोटींच्या ये-जा करण्यास मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी १५ ऑगस्ट रोजी संपणार असून, त्यानंतर मासेमारीचा हंगाम सुरू होणार आहे. त्यामुळे हंगाम सुरू होण्यापूर्वी खाडीतील गाळ तातडीने काढून खाडीचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी मुरूड सागर कन्या मच्छिमार सहकारी संस्थेच्या वतीने मुरूड तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



मुरूड-एकदरा परिसरातील कोळी बांधव आपल्या मासेमारीच्या बोटी खाडीजवळ समुद्रात नांगर टाकून उभ्या करतात. मात्र, दिवसेंदिवस खाडीमध्ये गाळ साचत असल्याने बोटी काढताना अडचणी निर्माण होत आहेत. खाडीच्या मुख्य मार्गात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने मासेमारी बोटींचे अपघात होण्याची शक्यता वाढली असून, भविष्यात नौकांची ये-जा पूर्णपणे बंद होण्याची भीती मच्छिमारांनी व्यक्त केली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून एकदरा-मुरूड खाडी परिसरात ग्रोयन्स बंधारा तसेच खाडीतील गाळ काढण्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. ग्रोयन्स बंधाऱ्याचे काम सुरू करण्यात आले होते; मात्र हे काम अर्धवट राहिल्याने पावसाळ्यातील पाण्याच्या प्रवाहामुळे खाडीच्या मार्गात मोठ्या प्रमाणात गाळ साचला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

चार मच्छिमार संस्थांमधील बांधवांकडून खाडीतील गाळामुळे निर्माण झालेल्या समस्येबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मासेमारी हंगाम सुरू होण्यापूर्वी गाळ काढला नाही, तर संपूर्ण मासेमारी हंगाम अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन खाडीतील गाळ काढण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी मुरूड सागर कन्या मच्छीमार सहकारी संस्थेचे अध्यक्ष मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु, प्रकाश सरपाटील, सुरेंद्र मकु, पांडुरंग आगरकर यांच्यासह कोळी बांधव उपस्थित होते.

# गंभीर गुन्ह्यातील तिघे तडीपार

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

गुन्हेगारी कृत्यांना पायबंद घालणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांनी चोरी, घरफोडीसह १३ गंभीर गुन्हे करणाऱ्या तिघांना तडीपार केले आहे. रायगड जिल्ह्यासह जिल्ह्यालगत असलेल्या पुणे, नवी मुंबईमधून त्यांना हद्दपार करण्याचे आदेश रायगडचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी काढले आहेत. सर्वसामान्य नागरिकांच्या जिवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

खालापूर तालुक्यातील निंबोडे दांडवाडी येथील रहिवासी असणारा मंगेश पवार (२६) हा चोरी, घरफोडी आदी गुन्ह्यातील टोळी प्रमुख आहे. खालापूरमधील शिरवली येथील किशोर पवार(२५) आणि आनंदवाडी येथील गुरुनाथ हिलम (२७) हे दोघेज टोळीतील सदस्य आहेत.खालापूर पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या या तिघांनी गुन्हेगारी टोळी तयार केली. त्यांनी २०१७ पासून २०२५ या कालावधीत चोरी, जबरी चोरी, घरफोडीसारखे १३ गुन्हे केले आहे. याबाबत वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातमध्ये त्यांच्याविरोधात गून्हे दाखल आहेत. आर्थिक फायद्याबरोबच दहशत निर्माण करण्यासाठी खालापूर परिसर आणि मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर चोरी, लुटमार दरोडा टाकून आर्थिक व मालमत्तेची लूट करीत होते. त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करून कारागृहातही ठेवण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांना पोलिसांचा धाक राहिला नाही, ही बाब पोलिसांच्या निदर्शनास आली. नागरिकांच्या जीवितास आणि मालत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न या टोळीमुळे निर्माण झाला आहे. महामार्गावरून मालवाहतूक करणारे चालक आणि प्रवासी वर्गांमध्ये दहशत निर्माण झाली होती. ती दूर करण्यासाठी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी त्यांना तडीपार करण्याचा निर्णय घेतला. त्यांना दोन वर्षांसाठी रायगडसह नवी मुंबई व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**कृषीवलच्या वाचकांना आवाहन**

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे. **संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# घरफोडी करणाऱ्या दोघांना सक्तमजुरी

**रायगड :** घरात घुसून घरफोडी करणाऱ्या दोघांना अलिबाग न्यायालयाने सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. या निर्णयाने घरफोडी करणाऱ्यांना दणका मिळाला आहे. या खटल्याची सुनावणी गुरुवारी (दि. २३) मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात झाली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संदीप निषाद असे या आरोपीचे नाव आहे. हा मुळचा उत्तर प्रदेशमधील असून, तो नवगाव येथे सध्या राहात होता. तसेच संगिता काजले असे या दुसऱ्या आरोपीचे नाव आहे. ही महिला आरोपी वायशेत येथील रहिवासी आहे. अलिबाग तालुक्यातील चोंढी नाकामधील वेलणकर वाडी येथील ऋषीकेश वेलणकर व घरातील मंडळी घरात झोपलेले असताना सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली.

# महामार्गावर अमोनियाचा टँकर कलंडला

## ● गॅसगळती न झाल्याने मोठा अनर्थ टळला

**| पोलादपूर | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गासमोर गुरुवारी सायंकाळी अमोनिया गॅस वाहून नेणारा टँकर चालकाचा ताबा सुटल्याने कलंडला. या अपघातात टँकरमधून कोणतीही गॅसगळती न झाल्याने मोठा अनर्थ टळला. अपघातात टँकर चालकाला किरकोळ दुखापत झाली आहे.



(छायाचित्र : शैलेश पालकर)

अलिबाग येथून लोटे एमआयडीसीतील प्रेरणा केमिकल्स कंपनीकडे अमोनिया गॅस घेऊन जाणारा टँकर मुंबईकडून गोव्याच्या मार्गिकेवरून जात होता. कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गासमोर आल्यानंतर चालकाचे टँकरवरील नियंत्रण सुटल्याने टँकर रस्त्यावर पलटी झाला. धोकादायक अमोनिया गॅस टँकरमध्ये असल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, टँकरच्या तपासणीअंती गॅसगळती झालेली नसल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने परिसराची पाहणी केली, तसेच वाहतुकीचे नियोजन केले.

या अपघातात टँकर चालक प्रेमप्रकाश भस्कळ पटेल (४२, रा. कमळानगर, जास्मिन रोड, बृहन्मुंबई) याला किरकोळ दुखापत झाली. त्याला तातडीने कळंबणी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लोटे एमआयडीसीतील प्रेरणा केमिकल्स कंपनीकडे जात असल्याने कंपनीचे सेफ्टी अधिकारी व प्रतिनिधीही घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी टँकरची सखोल तपासणी करून कोणत्याही प्रकारची अमोनिया गॅसगळती झालेली नसल्याचे स्पष्ट केले. यावेळी परिसराला कोणताही धोका नसल्याचे त्यांनी सांगितले. रात्री उशिरा अपघातग्रस्त टँकर रस्त्याच्या बाजूला करण्यात आला आणि वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

# खैरतस्कर वनखात्याकडून जेरबंद

## लाकडांसह ३९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

खैर जातीच्या झाडाची तोड करून त्या झाडाच्या कापलेल्या तुकड्यांची कारमधून वाहतूक करण्याचा कोणताही वैध परवाना जवळ न बाळगता अवैधरित्या खैराची वाहतूक करणाऱ्या तीन चोरट्यांना वनखात्याच्या नागोठणे परिक्षेत्र कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जेरबंद केले. त्यांच्याकडून ४,२३६ रुपये किमतीचे खैर लाकूड, ३० हजार रुपये किमतीची कार तसेच ५ हजार रुपये किमतीचे पेट्रोल कटर मशीन असा एकूण ३९,२३६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



(छायाचित्र : महेश पवार)

या तीन खैर चोरट्यांमध्ये भाऊ चंदर मोरे (३२), आकाश बाबाजी वाघमारे (२३) व महेंद्र मनोहर वाघमारे (२६, सर्व रा. चांदे आदिवासीवाडी, ता. माणगाव, जि. रायगड) यांचा समावेश असून, त्यांना अटक करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

यासंदर्भात उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, नागोठणे वन परिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांना यासंदर्भात गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार उपवनसंरक्षक उमेश वावरे व सहायक वनसंरक्षक भाऊसाहेब जावरे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे वन परिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांच्या सूचनेनुसार वन विभागाच्या नागोठणे पथकाने बुधवार (दि. २२) रोजी पहाटे पाली-वाकण रस्त्यावरील वजरोली येथे सापळा रचला. रस्त्यालगत हे पथक दबा धरून बसले असतानाच पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास वाकणकडून पालीच्या दिशेने येणारी मारुती अल्टो (एमएच-०६ एएन-२०८३) कार थांबवून तपासणी केली असता, त्यामध्ये ०.३४५ घनमीटर क्षमतेचे १९ नग खैर लाकडाचे तुकडे आढळून आले. या गुन्ह्यात वापरलेली कार, खैर तुकडे व पेट्रोल कटर मशीन जप्त करण्यात आले आहे.

या कारवाईत वनरक्षक अर्जुन जारवाल, मधुकर सोनवणे, अमोल खांडेकर, रणजीत कारंडे, प्रवीण देवडे आणि व्यंकटी माने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. याप्रकरणी नागोठणे वनपरिक्षेत्र अधिकारी दादासाहेब कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल मनोज साळवी हे पुढील तपास करीत आहेत.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २६ जुलै ते ०१ ऑगस्ट २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## नोकरदारांना दिलासा मिळेल

**मेष :** राशीधारकांनी या सप्ताहात आपण आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमान काळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व मोसमी आजारापासून सावध राहा. जोडीदाराची साथ मिळेल. आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील, याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा. **महिलांना–** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. **शुभ दिनांक–** २६,२७.

## कलाकारांना उत्तम वाव

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत दूर दृष्टिकोन ठेवून वागलात तर पुढचा होणारा त्रास दूर करू शकाल. कलाक्षेत्राला उत्तम वाव मिळेल. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. प्रकृतीबाबत अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा आणि उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. नोकरदारांना दिलासा मिळेल. व्यापाऱ्यात प्रगती करण्याची संधी मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. मौल्यवान वस्तू सांभाळा. कलाक्षेत्रात आपणाला आपले नाव उंचावर नेण्याची संधी मिळू शकेल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः डोळ्यांच्या विकारावर लक्ष द्या. प्रवासाचे योग संभवतात. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक राहील. गोड बोलून कार्यभाग साधण्याचे तंत्र अंगिकारा. **महिलांना–** महिलांना अंगीभूत कलांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल; पण अनावश्यक खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा. **शुभ दिनांक–**२८,२९.

## आर्थिक बाजू उत्तम राहील

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्याला उद्योग-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी संपादन करता येईल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. प्रकृतीबाबत अधिक चिकित्सक राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व मोसमी आजारांपासून सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. शंकास्पद आर्थिक व्यवहारामध्ये आपण गुंतले जाणार नाही याची दक्षता घ्या. येणाऱ्या प्रश्नांना सामंजस्याने सोडविण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केल्यास हा सप्ताह चांगला जाऊ शकेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगणे हितकारक ठरू शकेल. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना दिलासा मिळेल. दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. **महिलांना–** प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा; विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व पोटाच्या विकाराबाबत अधिक लक्ष द्या. काही भाग्यवंतांना सुवार्ता मिळण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक–** ३०, ३१.

## वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन आपले प्रकृतीस्वास्थ्य जपणे आवश्यक आहे. महिलांना त्यांच्या कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीस्वास्थ्याबाबत आपण अधिक चोखंदळ राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. वादाचे प्रसंग टाळा. मुलांकडे अधिक लक्ष द्या. आर्थिक बाजू ठीक राहील. एकंदर ग्रहमान पाहता ते आपणास अनुकूल असून, त्याचा लाभ घेऊन आपल्या आकांक्षा पूर्ण करता येतील. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. राजकारण व क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींना मोठा दिलासा मिळू शकेल. कोर्टकचेरीच्या कामांना गती मिळेल. अध्ययनात मुलांना प्रगती साधता येईल. संयम व सामंजस्याने येणारे प्रश्न सोडविणे हितकारक ठरेल. आर्थिक बाजू सावरता येईल. **महिलांना–** मनातील पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. प्रकृतीची पथ्ये पाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. थोडी जिवाची घबराट होण्याची शक्यता राहील, ताण तणावामुळे त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक–** २७,३०.

## वेळेचे नियोजन केल्यास लाभ

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या वेळेचे योग्य नियोजन केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. प्रतिष्ठित व्यक्तींच्या भेटी होण्याची शक्यता राहील. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढेल. विरोधकांची धास्ती घेण्याचे कारण नाही. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रकृतीबाबत अधिक चिकित्सक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा, विशेषतः उष्णतेचे विकार, मोसमी आजारांपासून सावध राहा. नको त्या प्रलोभनांना बळी पडू नका. घरगुती वातावरण चांगले ठेवा. आपण सकारात्मक विचाराने आपले कार्यालयीन व कौटुंबिक परिस्थिती हाताळल्यास बरेच काही साध्य करता येईल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा. संयम व शांततेने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. साहसी गोष्टींपासून दूर राहा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. तांत्रिक क्षेत्राला गती मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. आर्थिक व्यवहारात तज्ञांचा सल्ला घ्या. विरोधकांवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी देऊ नका. **महिलांना–** प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आप्तेष्टांच्या, मित्रमंडळींच्या संपर्कात राहाल. **शुभ दिनांक–** २८,०१

## खर्चावर नियंत्रण ठेवा

**कन्या :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात आपण आपल्या कार्यालयीन कामाबरोबर कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य दिल्यास एकूण वातावरण चांगले राहील व समाधान मिळेल. कौटुंबिक वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. नोकरदारांना व व्यावसायिकांना दिलासा मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. ज्येष्ठांच्या आरोग्याकडे अधिक लक्ष द्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. खर्चावर योग्य नियंत्रण ठेवा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा व मोसमी आजारांपासून सावध राहा. आपणास चांगली साथ देणारे असल्याने आपल्या आशा-आकांक्षांना पालवी फुटू शकते. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. इतरांशी नाराजी पत्करू नका. आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील राहा. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक लक्ष द्या. नियमित व्यायाम करा. **महिलांना–**कोर्ट कचेरीत रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत. स्पर्धा परीक्षेत यश संभवते, बेफिकीर राहू नका, **शुभदिनांक–** २६,२७.

## संयम अन् सावधगिरीने वागा

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात ग्रहमान प्रतिकूल असल्याने आपणास प्रत्येक बाबतीत सावधगिरीने व संयमाने वागणे हितकारक असणार आहे. सरकारी नियम व कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्या. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण न ठेवल्यास नाराजीचा सूर जाणवू शकेल. घरगुती वातावरण वादासारख्या गोष्टींनी बिघडणार नाही याची दक्षता घ्या. प्रेम, सामंजस्य यांचा वापर केल्यास घरगुती वातावरण गढूळ होणार नाही. प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये सांभाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. आपण अनेक बाबतीत गोड बोलून कार्यभाग साधण्याचे धोरण स्वीकारल्यास आपल्या ध्येयाकडे वाटचाल करू शकाल. आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कामाचा उत्साह वाढला तरी हुकूमत गाजवू नका. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला चांगला वाव मिळेल. **महिलांना–**दूरच्या आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. प्रकृतीबाबत अधिक लक्ष द्या, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभदिनांक–** २८,२९

## व्यवहारात चढ-उताराचे प्रसंग

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्चावर मात्र कटाक्षाने निर्बंध ठेवणे हितकारक राहील. आपल्या रागावर नियंत्रण ठेवणे योग्य राहील. वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक सध्या नको. व्यवहारात चढ-उतार संभवतात. हाती घेतलेल्या कामात सफलता मिळेल. नोकरदारांना काहीसा दिलासा मिळेल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. आपणास घेत असलेल्या श्रमाचा योग्य परतावा मिळाल्याचे समाधान मिळू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम काळ असून, प्रवासाचे योग संभवतात. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे म्हणजे इतरांची नाराजी होणार नाही. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा. **महिलांना–** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. चांगली ऑफर मिळेल, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा, उष्णतेच्या व डोळ्यांच्या विकारांबाबत सावध राहा. **शुभदिनांक–** ३०,०१

## जोडीदाराची साथ मिळेल

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण आपल्या उद्योग-व्यवसाय क्षेत्रात काही बदल करणे महत्त्वाचे ठरणार आहे, पर्यायाने आपणावर येणाऱ्या आव्हानांना आपण सहजपणे सामोरे जाऊ शकाल. इतरांच्या मतांना जास्त महत्त्व न देता आपणास योग्य वाटणाऱ्या गोष्टींना प्राधान्य द्या. सरकारी नियमांचे पालन करा. विवाहेच्छुकांच्या आशा पल्लवित होतील. प्रलोभनांपासून दूर राहा. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः मोसमी आजार व डोळ्यांच्या विकारांकडे लक्ष द्या. वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. आपल्याला नोकरी-व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. आपल्या प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. शेतीविषयक कामांना गती मिळेल. आपल्या स्वभावातील हेकेखोरपणावर मात्र प्रतिबंध करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः पोटाच्या तक्रारीबाबत सावध राहा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. राजकीय क्षेत्रात यश संभवते. **महिलांना–** कडक उपवास न करता हलके अन्न घेणे हितावह आहे, जुना आजार बाळवण्याची शक्यता राहील. **शुभ दिनांक –** २९,०१.

## कलागुणांना प्रोत्साहन

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान आपल्याला असलेले ग्रहांची उत्तम साथ मिळणार असल्याने आपण अपेक्षित गोष्टी साध्य करू शकाल. यश सुलभ रीतीने मिळवू शकाल, नोकरदारांनी मात्र वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. विद्यार्थ्यांना अध्ययनात अपेक्षित यश मिळू शकेल. विवाहेच्छुकांच्या आशा-आकांक्षा पल्लवित होतील. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. प्रकृतीबाबत मात्र सावधानता बाळगा, विशेषतः कफाच्या विकारांबाबत सावध राहा. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने करा. आर्थिक बाजू सांभाळा. अनावश्यक खर्च टाळा. जोडीदाराची साथ मिळेल. प्रवास संभवतो. आपणास हा आठवडा बऱ्याच बाबतीत चांगला जाऊ शकेल. घरात एखादे शुभकार्य होण्याची शक्यता राहील. शेतीविषयक कामांना गती मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. कौटुंबिक वादविवाद मात्र कटाक्षाने टाळण्याचा प्रयत्न करा. राजकीय क्षेत्रात जम बसवू शकाल. **महिलांना–** कुटुंबाकडून अपेक्षित सहकार्य मिळेल. प्रकृतीची काळजी घ्या, विशेषतः प्रिय व्यक्तीला व्यसनांपासून दूर ठेवण्यास मदत करा. **शुभ दिनांक–** २६,२८.

## मोठी गुंतवणूक टाळावी

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ते आपणास पुष्कळशा बाबतीत साथ देणारे असल्याने आपले कार्य सफल करू शकाल. विरोधकांची धास्ती बाळगण्याचे कारण नाही, ते नामोहरम होतील. आपल्या कामकाजात अधिक लक्ष देऊन ते पार पाडण्याचा प्रयत्न करा. सामाजिक क्षेत्रात आपला दबदबा वृद्धिंगत होईल. प्रकृतीबाबत मात्र दक्ष राहा, विशेषतः उष्णतेचे विकार व सरकारी नियमांचे पालन करा. व्यवसायात प्रगतीची संधी मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. प्रलोभने टाळा. जोडीदाराची साथ मिळेल. हा सप्ताह विशेषतः लाभाचा ठरणार आहे. या आठवड्यात महत्त्वाची कामे हाती न घेतल्यास, पुढे ढकलल्यास सर्व दृष्टीने हितकारक ठरू शकेल. नोकरदारांना कामाचा त्रास संभवतो. कामाची जबाबदारी वाढण्याची शक्यता राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना–** त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. संगणक व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना प्रगतीची संधी मिळेल. आर्थिक व्यवहारात मात्र सावधानता बाळगा. मोठी गुंतवणूक करण्याचे टाळा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. **शुभ दिनांक–** २७,२९.

## वरिष्ठांशी जुळवून घेणे हितकारक

**मीन :** राशीसाठी आपले या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या मेहनतीलाच यशाची झालर प्राप्त होण्याची शक्यता असल्याने त्याचा योग्य उपयोग करणे सर्व दृष्टीने ठीक राहील. नोकरदारांनी आपल्या वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक राहील. आपल्या श्रमाला योग्य न्याय दिला जाईल. कौटुंबिक वातावरण वादाच्या प्रसंगाने बिघडणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. गुरूकृपेचा लाभ घेता येईल. सरकारी नियमांचे पालन कटाक्षाने पाळा. वैवाहिक जोडीदाराची उत्तम साथ मिळेल.आपण प्रत्येक बाबतीत सकारात्मक विचाराने वागण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. नोकरदारांना दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय व्यवहार करू नये. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. **महिलांना–** एखादे चांगले बक्षीस मिळणार आहे. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागणे योग्य राहील. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये पाळा व नियमित व्यायाम करा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. **शुभ दिनांक –**३०,०१.

# खड्ड्यांकडे लक्ष वेधण्यासाठी ‘खड्ड्यात सोडा होडी’ स्पर्धा



**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

अष्टविनायक पालीतील रस्त्यांच्या दुरवस्थेकडे आणि नगरपंचायतीच्या निष्काळजीपणाकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उबाठा) सुधागड पालीच्या वतीने एका अनोख्या मखड्ड्यात सोडा होडीफ व्हिडिओ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्या पाली शहरातील रस्ते खड्ड्यांनी भरले असून नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नगरपंचायतीचा भोंगळ कारभार आणि दुर्लक्ष यामुळे जनतेचा छळ होत असल्याचा आरोप करत, झोपलेल्या प्रशासनाला जाग आणण्यासाठी शिवसेनेने या अभिनव आंदोलनाची हाक दिली आहे. मनगरपंचायतीला जाग आणूया, खड्ड्यात होडी सोडून दाखवू या असे या मोहिमेचे घोषवाक्य आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पाली शहरातील कोणत्याही मोठ्या खड्ड्यात कागदाची होडी सोडतानाचा १ मिनिटाचा व्हिडिओ बनवावा. या व्हिडिओमध्ये खड्ड्याची दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास स्पष्टपणे सांगावा आणि दाखवावा. व्हिडिओसोबत नगरपंचायतीला नेमका काय संदेश द्यायचा आहे, तेही पाठवावे. व्हिडिओ बनवताना प्रत्येकाने स्वतःची आणि रस्त्यावरील वाहतुकीची काळजी घेणे आवश्यक आहे.

या अनोख्या स्पर्धेच्या माध्यमातून शिवसेनेने पाली नगरपंचायतीचा जाहीर निषेध नोंदवला असून, खड्डेमुक्त पाली हवीच अशी ठाम मागणी केली आहे. या अभिनव उपक्रमाला पालीकरांचा कसा प्रतिसाद मिळतो आणि नगरपंचायत यावर काय कारवाई करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## आर.डी स्कूलच्या विद्यार्थ्यांची वेशभूषा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कशेळे येथील आर डी स्कूलचे विद्यार्थ्यांनी आषाढी एकदशीनिमित्त दिंडी काढली होती. विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे वेश परिधान करुन दिंडीमध्ये सहभाग घेतल्याने या दिंडीचे रूप आणखी विलोभनीय दिसत होते.

कशेळे गावातील बाजारपेठ आणि लोकवस्ती मधून ही दिंडी अनेक मंदिरात पोहचली. लहान मुलांकडून भक्तीभावाने साजरा केला जातो.

शाळेतील मुलांनी विठ्ठल रुक्मिणी यांचे वेशभूषा करून आषाढी एकादशी वारी साकारण्यात आली.

यावेळी सहभागी झालेल्या प्रत्येक मुलांनी वारीचा पोशाख परिधान करून महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्याचे काम आर डी इंग्लिश मीडियम स्कूल येथील शिक्षकांनी परिश्रम घेऊन करण्यात आले.

शाळेतील मुलांना आषाढी वारीचे महत्त्व कलावे यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन शिक्षकांकडून केले पाहिजे अशी सूचना आर डी इंग्लिश आणि सेमी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका प्रतीक्षा धुळे यांनी केली होती.

## पेण ते सापोली पायी दिंडी वारी

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

आषाढी वारीच्या निमित्ताने पेणच्या गणेशमंदिरातून सापोली येथील श्रीराम मंदिरापर्यंत पायी दिंडी उत्साह पूर्ण वातावरणात काढण्यात आली. या वारीत महिला पुरुष तरुण वर्ग ही हातात टाळ घेऊन भगवा ध्वज फडकवीत विठूरायाचा गजर करीत निघाला होता. वाटेत गोल रिंगण फुगड्या घालत ही दिंडी श्रीराम मंदिरापाशी पोहोचली. त्यानंतर भाविकासाठी मंजिरी काळे, शर्दूल काळे, तृप्ती पेंडसे यांचे भजन संगीत मैफील ही होती. या दिंडीचे सुरेख नियोजन शिवानी आणि विवेक आघारकर यांनी केले.

## न्हावे ग्रामस्थांची भक्तीमय दिंडी

**। चणेरा । प्रतिनिधी ।**



आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त न्हावे गावात भक्ती श्रद्धा अनुभवायला मिळाला होता. अजय साळावकर यांच्या येथून निघालेल्या दिंडीने श्रीराम मंदिर, सोनखार येथून भक्तिमय वातावरणात प्रस्थान केले. या दिंडीत न्हावे शाळेतील शिक्षक, सर्व विद्यार्थी तसेच ग्रामस्थ सहभागी झाले होते.

दिंडीत वारकऱ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंग-भजनांच्या सुरावटीवर नाच-गाणी, फुगड्या खेळत भक्तिरसाचा अनोखा आविष्कार साकारला. विठ्ठलनामाच्या अखंड गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता. ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल अशा जयघोषांनी गाव दुमदुमून गेले.

मराठआळी येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाली तेव्हा मंदिर परिसरात वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

विठ्ठलाच्या चरणी सर्वांनी सामूहिक प्रार्थना करून सुख-समृद्धी, शांतता आणि सर्वांच्या कल्याणाची प्रार्थना केली. वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून प्रेम, समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देणारी संस्कृती आहे. भेदाभेद विसरून सर्वांना एकत्र आणणाऱ्या या वारकरी परंपरेत सहभागी होत ग्रामस्थांनी सामाजिक ऐक्याचेही दर्शन घडविले. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनाने मनातील चिंता दूर होऊन भक्तीचा नवा प्रकाश प्रत्येकाच्या जीवनात उजळतो, अशी भावना यावेळी उपस्थित वारकरी आणि ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## विठ्ठल भक्तीचा अनोखा सोहळा

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा पेण या शाळेत बाळगोपाळांचा विठ्ठलभक्तीचा अनोखा सोहळा रंगला. वारकरी वेशातील चिमुकले, विठ्ठल-रुक्मिणीच्या आकर्षक वेशभूषा, डोक्यावर तुळशी वृंदावन आणि मुखी अखंड विठ्ठलनाम अशा भक्तिमय वातावरणात शाळा अक्षरशः पंढरीमय झाली होती. विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारकरी परंपरा आणि आषाढी एकादशीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले



विद्यार्थ्यांनाही या समृद्ध परंपरेची ओळख व्हावी या उद्देशाने वारकरी संस्कृतीचा गोड संस्कारआषाढी एकादशी निमित्ताने आज प्राथमिक शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत लेझीमच्या तालावर विठ्ठलनामाचा गजर करत वातावरण भक्तीरसाने भारून टाकले.याप्रसंगी पालखीची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. टाळ-मृदंगाच्या तालावर भजन म्हणत विठ्ठल भक्तित रममाण झाले होते. चिमुकल्या वारकऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत दिंडीचा अनुभव साकारला. विद्यार्थ्यांच्या नृत्याच्या सादरीकरणाने उपस्थित पालक आणि शिक्षकही भारावून गेले होते.

या पालखी सोहळ्याचे पूजन वसंत आठवले, संजय कडू, लेखा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक पालक संघाचे सर्व सदस्य पालक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी फेर धरून, फुगड्या खेळून आणि विठ्ठलनामाचा गजर करत आनंदोत्सव साजरा केला. भगवा ध्वज, तुळशी वृंदावन आणि भक्तीमय वातावरणामुळे संपूर्ण शाळा परिसर विठ्ठलमय झाला होता.

## गारमाळमध्ये चिमुकल्यांनी जिंकली मने

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीचे औचित्य साधत रायगड जिल्हा परिषद शाळा, गारमाळ येथील विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचा अनोखा अनुभव देणारी दिंडी काढली. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या वेषातील चिमुकल्यांनी हरीनामाच्या गजरात गाव भक्तीमय केले.

राजिप शाळा, गारमाळ येथे आषाढी एकादशीनिमित्त विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेषभूषा परिधान करून गावातून भक्तिमय दिंडी काढली. विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या वेशातील चिमुकल्यांनी दिंडीत आकर्षक



सहभाग नोंदवला. मुलांनी पांढरा कुर्ता, धोतर, गांधी टोपी, हातात टाळ तर मुलींनी नऊवारी साडी परिधान करून डोक्यावर तुळस घेत टाळ-मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष केला. दिंडीमुळे गारमाळ गावासह संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी फुगड्या, गवळणी आणि पारंपरिक भक्तिगीते सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाळेत वर्षभर विविध सण-उत्सव पारंपरिक पद्धतीने साजरे करून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, सांस्कृतिक मूल्ये आणि धार्मिक परंपरांचे जतन करण्याचा प्रयत्न केला जातो. या उपक्रमाचे पालक आणि ग्रामस्थांनी कौतुक केले. दिंडीचे यशस्वी आयोजन करण्यासाठी एकनाथ डमाळे, सविता दारशेवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उरणमध्ये विठ्ठल रखुमाईचा जयघोष

**उरण** : उरण शहारात आषाढी एकादशीनिमित्त भेंडखळ, बोरी नाका उरण, देवूळवाडी येथे विठ्ठल रखुमाई मंदिरात पहाटेपासूनच विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मोरा कोळीवाडा येथील जय हनुमान प्रासादिक भजन मंडळांनी उंबर देव येथून पालखी पायी दिंडी काढण्यात आली होती. उरण मोराहून बोरी नाका विठ्ठल मंदिर, पेन्शनर पार्क, नागाव, जीवन मुक्त स्वामी महाराज मठ येथे पालखीची झाली. याप्रसंगी सदानंद गायकवाड, गणेश नाखवा, सिद्धेश गायकवाड आदी उपस्थित होते.

## माथेरानमध्ये ज्ञानदिंडी सोहळा

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीनिमित्त माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या आयोजनातून ज्ञानदिंडी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर विविध सांस्कृतिक संस्थांच्या वतीने ज्ञानदिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अध्यात्माची जोड देत शिक्षणाचे आणि विचारांचे महत्त्व समाजात रुजवावे, या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अंगणवाडीतील मुलांनी विठ्ठल-रुक्मिणी, वारकरी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत जनाबाई यांचे रूप परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.




टाळ-मृदंगाचा गजर:विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल आणि ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. केवळ धार्मिक सोहळा न ठेवता दिंडीमध्ये झाडे लावा, झाडे जगवा,प्लास्टिक मुक्ती, मुली वाचवा, मुली शिकवा आणि ग्रंथ हेच आमचे गुरु अशा विविध सामाजिक संदेश देणाऱ्या पाट्या आणि फलक घेऊन विद्यार्थी सहभागी झाले होते.

अभंग आणि फुगड्या: दिंडीच्या मार्गावर विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभंग गायले आणि फुगड्यांचा आनंद लुटला. ज्ञानोबा-तुकाराम च्या नामघोषात आणि रिंगण सोहळ्यात तल्लीन झालेले विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामुळे संपूर्ण परिसरात पंढरपूरच्या वारीचाच भास होत होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा, सामाजिक भान आणि वाचनाची आवड निर्माण होण्यास मदत होते, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी सुनील शिंदे, शिवाजी शिंदे, प्रकाश सुतार, सुहासिनी शिंदे, चंद्रकांत जाधव, अनंत शेलार रमेश ढोले, संघपाल वाठोरे, अंधारे, विदुला गोसावी, सुरेखा जमदाडे, रमा आखाडे, मनिषा दळवी, श्रद्धा रामाणे, वनिता कदम, अनिता चव्हाण, कांचन केतकर मनिषा चौधरी, आदीने सहभाग घेतला होता.

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक जगदिश भवरलाल वैष्णव (शर्मा) यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे काकळघर, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| काकळघर, ता. मुरुड | ४६ | क्षेत्र ०-३५-७०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-३७-२० | ७.३७ |

दिनांक :- २५/०७/२०२६

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता:- फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. नं. ९७६७०१०९०२

### जाहीर नोटीस

माझे आशील प्रज्योत रिअल्टी तर्फे प्रोप्रा.श्री गौरव प्रविण घरत, मु.लक्ष्मीज्योत, चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | भुमापन क्र./उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| वरसोली | १८०/२/१ | १७.८०.०० | ०.०० |

येणेप्रमाणे वर्णनाची बिनशेती मिळकत, त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, वगैरेसह या मिळकती बाबत मिळकतीचे विदयमान मालक प्रज्योत रिअल्टी तर्फे प्रोप्रा श्री गौरव प्रविण घरत, मु.लक्ष्मीज्योत, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करणेच्या सुचना दिल्या आहेत. सबब, सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळवहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख २५.०७ २०२६

**(ॲड.एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमीन मिळकती त्या जमीन मालकांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील आमचे अशिलांस खरेदी देणेबाबत व्यवहार ठरविला आहे, त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - अंत्राट तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| भागाबाई विठू जाधव<br>सुषमा बळीराम वायले | २५ | - | ०-५०-१०<br>०-००-५०<br>०-५०-६० | १-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत जमिन मालकांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : २४/०७/२०२६
मोबाईल: ९८२२९११२०५

ॲडव्होकेट
**श्री. अे.पी.डिमेलो**
मु.भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक श्री.संकेत सुभाष पाटील यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | खाते क्रमांक | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू./पै.) |
|---|---|---|---|---|
| टेभोर्डे ता.मुरूड | १०५ | ६७/१ | १-०३-४०<br>पैकी ०-०६-०० | ०.७२ |

वर नमुद केलेली मिळकत क्षेत्र १-०३-४० हे.आर. पैकी श्री. संकेत सुभाष पाटील यांच्या हिश्श्याचे क्षेत्र ०-०६-०० हे.आर. ही मिळकत जाहिर नोटिशीचा विषय आहे

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग,
दिनांक : २३/०७/२०२६

**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा.आगरी पॅलेस, मु.पो.चिंचोटी
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक कृष्णकांत गोपाळलाल पित्ती यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७० | ८ | ०-५१-००<br>पैकी ०-३०-०० | ०=४७ |
| ७१ | १/ब | २-५७-००<br>पैकी ०-२१-०० | २=८७ |
| ७२ | ४/ब | ०-२८-०० | ०=१९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०७/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथिल खालील वर्णनांकित शेती जमीन मिळकत विद्यमान मालक श्री.नितीन शिवराम माचकर यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसेच विद्यमान मालकांनी देखिल विकत देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| चौल, ता.अलिबाग, जि.रायगड | १९८४/१/अ | जिरायत ०.१२.००<br>पो.ख ०.५९.५०<br>एकूण ०.७१.५० | ३५.४९ |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी श्री.नितीन शिवराम माचकर यांच्या सामाईक मालकी हिश्श्यात असलेल्या ०.०५.०१ हे.आर. या क्षेत्रापैकी अविभाज्य हिस्सा

तरी वर नमुद मिळकतींचे संदर्भात कोणाचेही गहाण, दान, बक्षिस लिज, बयाणा पावती, फरोक्तखत, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसाहक्क, वहिवाटीचे जाण्या-येण्याचा मार्ग आदि कोणत्याही प्रकारे कसलेही हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांच्याकडे योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात कळवावी येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर जमिन मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार विद्यमान मालकांबरोबर पुर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २६/०७/२०२६

सही
**ॲड. रोशन अनिल राऊत**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग,
पत्ता- वढाव खुर्द, पो.बामणगाव, ता.अलिबाग,
जि. रायगड. मो.क्र.७७९८०२७६३८

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने- नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **शुभमुहूर्त प्रथम पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय वेबसाईटसह, स्थळांसाठी रोहा पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- **शुभमुहुर्त विवाहमंडळ** अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.
- **जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-**अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९
- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. **मोबाईल** : ७५५९१८४६१२
- **वाडगाव अलिबाग येथे विलावर** राहण्यासाठी एक जोडपे हवे आहे. कृपया पुढील नंबर वर संपर्क करावा. ९८२२९३८४४४
- **अलिबाग साईइन रिसॉर्ट येथे** बँक ऑफिससाठी रिटायर व्यक्ती Computer ज्ञान आवश्यक व वेटर पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा साई इन रिसॉर्ट, चोंढी, अलिबाग.
- **८-१५ ते १० या** वेळात घरकामासाठी बाई पाहिजे. **संपर्क**-९२८४५५५३१४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**




## राशीभविष्य

- **मेष** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. प्रवास शक्यतो टाळावा. व्यवसायात साधारण स्थिती राहील.
- **वृषभ** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **मिथुन** : खर्चाचं योग्य नियोजन करा. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. जुनी येणी वसूल होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत दिलासा मिळेल. मनाजोग्या घटना घडतील. कामासाठी प्रवास लभदायी ठरेल.
- **सिंह** : व्यवसायात चिंता, ताण राहील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : महत्त्वाच्या निर्णयांना विलंब नको. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. सरकारी कामांना गती येईल.
- **तूळ** : नव्या कामांचा उत्साह राहील. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता लाभेल. बाकी चिंता करू नये.
- **वृश्चिक** : उपजत गुणांना वाव मिळेल. कार्यक्षमतेत वाढ होईल. स्थावर प्रश्न तुर्तास प्रलंबित राहतील.
- **धनु** : व्यवसायात चिंता राहील. उत्पन्न आणि खर्चाचा मेळ साधणार नाही. नव्या योजना तुर्तास नको.
- **मकर** : हितशत्रूंच्या कारवाया वाढणार आहेत. विचारपूर्वक पावलं टाकावीत. कुलदेवतेची उपासना करावी.
- **कुंभ** : सरकारी योजनांचा लाभ घ्या. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. मुलांच्या प्रगतीत अडचणी येतील.
- **मीन** : दानधर्माकडे ओढा राहील. व्यवसायात महत्त्वाचा दिलासा मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.

ब्युटी टॉक

## जपा कुरळे केस

कुरळे केस खूप सुंदर दिसतात. पण अशा केसांची निगा राखणं सोपं नसतं. म्हणूनच असे केस मॅनेज करणं वैतागवाणं ठरू शकतं. अशा वेळी कुरळ्या केसांच्या या स्टायलिंग टिप्स उपयुक्त ठरू शकतील.

* कुरळे केस विंचरण्यासाठी ब्रशचा वापर करू नका. ब्रशमुळे केस अजूनच गुंततील. केसांमधला गुंता सोडवण्यासाठी बोटांचा वापर करा तसंच मोठ्या दातांच्या कंगव्याने केस विंचरा.

* कुरळे केस पहिल्यांदा खालच्या बाजूने विंचरून घ्या. आधी टोकं विंचरून घेतल्याने केस गळणं कमी होईल. टोकं विंचरून घेतल्यानंतरच स्कॅल्पकडे वळा.

* कुरळ्या केसांची चमक टिकवून ठेवण्यासाठी योग्य देखभाल होणं गरजेचं आहे. कुरळ्या केसांचं नियमित डिप कंडिशनिंग करायला हवं. यासाठी ऑर्गन ऑईल किंवा शिया बटरयुक्त हायड्रेटिंग मास्कचा वापर करता येईल.

* कुरळे केस दर सहा ते आठ आठवड्यांनी ट्रिम करायला हवेत. यामुळे केसांचा लूक छान दिसेल. विचित्र वाढलेले कुरळे केस चांगले दिसत नाहीत.

## २६ जुलै

दिन विशेष

**२००९ :** ज्येष्ठ संगीतकार भास्कर चंदावरकर यांचे निधन.
**२०१५ :** याकूब मेमनवर निर्दोषत्वाचा शिक्का मारणाऱ्या सलमान खानच्या ट्विटमुळे संतापाची लाट.
**२०१७ :** राज्यसभेच्या उमेदवारीसाठी अमित शहांची वर्णी.
**२०१८ :** भारत सरकारने कायदेशीर पद्धतीने मेहुल चोक्सी याच्या प्रत्यार्पणाची विनंती केल्यास त्यावर विचार होऊ शकतो, असे अँटिग्वा सरकारकडून सकारात्मक संकेत.

अ‍ॅप वर्ल्ड

## स्मार्ट क्रिकेटिंग अ‍ॅप्स

क्रिकेटची माहिती देणारी बरीच अ‍ॅप्स आहेत. अशा काही अ‍ॅप्सविषयी...

* 'लाईव्ह लाईन अँड क्रिकेट स्कोर्स' या अ‍ॅपमध्ये क्रिकेट संघांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला आहे. तसंच प्रत्येक सामन्याची माहिती तुम्हाला मिळू शकेल. यासोबतच क्रिकेटशी संबंधित बातम्याही तुम्ही वाचू शकता.

* 'क्रिकेट लाईन गुरू'वर वाऱ्याच्या वेगाने स्कोअर कळू शकेल. तज्ज्ञांचे लेख इथे वाचू शकता. माजी क्रिकेटपटूंची मतं जाणून घेता येतील.

* क्रिकेट स्पर्धेशी संबंधित बातम्या, सामन्यांचं वेळापत्रक, फोटो, व्हिडिओ बघण्यासाठी 'क्रिकेट नेक्स्ट' अ‍ॅप डाउनलोड करून घ्या. इथे क्रिकेट तज्ज्ञांचे ब्लॉग्जही वाचायला मिळतील. अ‍ॅनॅलिसिस विभागात तुम्ही तुमची मतंही मांडू शकता.

* 'क्रिकबझ' या अ‍ॅपवरही तुम्हाला रंजक माहिती मिळू शकते. तज्ज्ञांची मतं जाणून घेता येईल. सामन्याबद्दलची सगळी माहिती इथे जाणून घेता येईल.

* 'बीसीसीआय' नावाच्या अ‍ॅपवरही विविध फीचर्स आहेत.

तुम्ही तुमच्या आवडीचं अ‍ॅप डाउनलोड करून घेऊ शकता.

### पंचांग

**रविवार, २६ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
आषाढ शु. २, चंद्रराशी : वृश्चिक,
नक्षत्र : ज्येष्ठा, योग : ऐंद्र,
सूर्योदय ६.१६ सूर्यास्त ७.१५

### फॉरवर्ड्स

**हमारीं मासूमियत क़ा इस क़दर फ़ायदा न उठा...**

**थोड़ा फ़ासला दिखा मोहल्ले में तो यार न बना...!**

आरोग्यमंत्र

## साफ और मजबूत दात...

दात घासणं हे एक तंत्र आहे. दंतविकार टाळण्यासाठी दात योग्य पद्धतीने घासले पाहिजेत. याविषयी...

* अनेकजण एक मिनिटापेक्षाही कमी वेळ दात घासतात. मात्र यासाठी कमीत कमी दोन मिनिटं द्यायला हवी. दररोज दोनदा दात घासले पाहिजेत. * दात घासण्याचा ब्रश फार मोठा नसावा. ब्रिसल्स मुलायम असले पाहिजे. * दात बळकट करण्यासाठी फ्लोराइडयुक्त टूथपेस्टचा वापर करा. अशा टूथपेस्टमुळे दातांची झीज होत नाही. दात घासताना दातांचा बाहेरचा, आतला आणि वरचा भाग स्वच्छ झाला पाहिजे. पुढच्या



दातांचा मागचा भाग वरून खाली या पद्धतीने घासा. * दात घासताना जीभही स्वच्छ करा. यामुळे तोंडाची दुर्गंधी निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियांचं प्रमाण कमी होईल. * जेवल्यानंतर चूळ भरायला विसरू नका. त्यामुळे अडकलेले अन्नकण निघून जातात. बरेचदा दातांच्या फटींमध्ये अन्नकण अडकतात. हे अन्नकण ब्रशने स्वच्छ करता येत नाहीत. मात्र त्यांच्यामुळे दातांमध्ये बॅक्टेरियांची निर्मिती होते. बॅक्टेरियांमुळे दातांची झीज होते तसंच दातात फटी पडू लागतात. * माउथवॉशचा अवश्य वापर करा. यामुळे दातांमध्ये अडकलेले अन्नकण बाहेर पडायला मदत होते. तोंडाची दुर्गंधी कमी होते. * दर तीन ते चार महिन्यांनी टूथब्रश बदला. आजारपणात वापरलेला ब्रश तातडीने बदला. * आरोग्यदायी पदार्थांचं सेवन करा. डेंटिस्टकडून नियमित तपासणी करून घ्या.

### फिटनेस फंडा

फिटनेस राखण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आपण बरंच काही करतो. ट्रेडमीलसारखी महागडी उपकरणं विकत घेतो. जीमच्या मेंबरशीपसाठी बरेच पैसे खर्च करतो. पण तुम्ही स्वस्तात फिट राहू शकता. तुमच्या इमारतीला भरपूर जिने असतील तर कॅलरी जाळण्यासाठी तुम्हाला दुसरीकडे कुठेही जावं लागणार नाही. जिन्यावरून धावणं हा एक उत्तम व्यायाम ठरू शकतो. फक्त अर्धा तास जिन्यावरून धावल्याने ५०० कॅलरी खर्च होतात, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. याबाबतच्या काही टिप्स...

**(क्रमश:)**

करिअरवाटा

## विक्री पुस्तकांची

प्रकाशनविश्वात नानाविध संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे साहित्याची आवड आणि उत्तम जाण असणाऱ्यांनी कारकिर्दीच्या या पर्यायाचा गांभीर्याने विचार करायला हवा. संपादनकौशल्य असणाऱ्यांनाही इथे मनाजोगं काम करण्याचा आनंद मिळतो. संपादक सगळ्या विषयात तज्ज्ञ असतोच असं नाही. अशा वेळी ज्या त्या विषयातल्या तज्ज्ञाकडून मजकुराची तपासणी करून



घ्यावी लागते. पुस्तकातला मजकूर बिनचूक आहे की नाही, हे पहावं लागतं. त्यामुळे प्रकाशन व्यवसायात संधी शोधणाऱ्या व्यक्तीला एखाद्या विषयाचं विशेष ज्ञान असेल तर उपयुक्त ठरतं. पुस्तकांच्या विक्रीचंही वेगळं शास्त्र असतं. त्यामुळे विक्रीसाठी आवश्यक कौशल्य असणाऱ्यांनाही या व्यवसायात बऱ्याच संधी आहे. या व्यक्तीकडे ग्राहकांशी संपर्क साधण्याची हातोटी असावी लागते. प्रदर्शनांमधूनही पुस्तकांची विक्री केली जाते. अशा प्रदर्शनांचं आयोजन करणं, जाहिरात करणं आदी गोष्टी अवगत असाव्या लागतात. आता या व्यवसायाची उलाढाल वाढत आहे. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगलं वेतन प्राप्त होत आहे. म्हणूनच पुस्तकांच्या गराड्यात वावरणं आवडत असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र खुलं आहे.

खेचाखेची

## मापात पाप

वजनात मारणे हा रद्दीवाल्यांचा आणि भाजीवाल्यांचा जणू हक्कच असतो. त्यावर वैधमापन विभागाने कारवाई सुरू केली. त्या बातमीचं हेडिंग होतं...

'मापात पाप' करणाऱ्यांना चाप!

### वेगळं काही

डेव्हिड कोवारी २४ तासांमध्ये सात देश फिरला. त्याने पोलंडपासून सुरूवात केली. मग झेक रिपब्लिक, स्लोवाकिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, स्लोवेनिया आणि क्रोएशिया या देशांना भेटी देत नवा विक्रम रचला. डेव्हिडला काही तरी वेगळं करायचं होतं. प्रसिद्धी मिळवण्यासोबतच लोकांना मदतही करायची होती. कमीत कमी वेळेत त्याने जास्तीत जास्त देश फिरण्याचा निर्णय घेतला. याआधी जर्मनीच्या मायकेल मॉलने २०१६ मध्ये २४ तासात सहा देश फिरण्याचा विक्रम केला. यामुळे डेव्हिडने सात देश फिरायचं ठरवलं. त्याने दहा तासांनी पहिला ब्रेक घेतला. डेव्हिडने २४ तासांमध्ये ५०० किलोमीटर प्रवास केला. यामुळे त्याचं नाव गिनिज बुकमध्ये नोंदवलं गेलं आहे.

आशियाना

## नुकसान टाळण्यासाठी...

बरेचदा घरात छोट्या छोट्या अडचणी समोर येतात. वस्तूंचा पसारा आवाक्यापलीकडे वाढतो. घाईच्या वेळी एखादं काम खूप वेळ खातं. अशा वेळी शांत डोक्याने काम करणं चांगलं. त्यामुळे मानसिक शांतता राखली जाते शिवाय नुकसानही टळतं.



* टाकून न देता कल्पकतेचा वापर करून काही वस्तूंना नवा साज देता येतो. तुम्ही घरातील जुने मग भिंतींवरच्या खिळ्यांवर अडकवू शकता. त्यात किचनमधले नॅपकीन्स किंवा इतर छोट्या वस्तू ठेवता येतील. रिकाम्या बाटल्यांना सुतळी गुंडाळून त्यावर कृत्रिम फुलांचं डेकोरेशनदेखील करता येईल.

* कधी कधी चिनी मातीची किंवा धातूची भांडी एकमेकांमध्ये अडकल्यावर लवकर निघत नाहीत. अशा वेळी अडकलेल्या ठिकाणी ग्लिसरीन सोडावं. त्यानंतर थोडासा जोर लावून भांडं ओढावं. बोन चायनाची भांडी स्वच्छ करण्यासाठी लिक्विड सोपचाच वापर करावा. क्रोकरीवर लिंबू आणि ब्लीचचा उपयोग करणं टाळावं. त्यामुळे चरे पडू शकतात.

## सुडोकू १३२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ७ | | | | ६ |
| ७ | ५ | ६ | २ | ९ | | | १ | ३ |
| | | | | | ३ | | | |
| | ८ | | | | २ | १ | | ५ |
| | १ | | | | | | ३ | |
| ३ | | ७ | ८ | | | | ९ | |
| | | | ५ | | | | | |
| ९ | ३ | | | २ | ७ | ८ | ६ | ४ |
| ४ | | | | ६ | | | ५ | |

**टीप -**

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १३१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | ६ | २ | ३ | ७ | ८ | १ | ५ |
| १ | ५ | २ | ८ | ४ | ९ | ७ | ६ | ३ |
| ७ | ३ | ८ | १ | ६ | ५ | ९ | २ | ४ |
| ५ | ६ | ७ | ३ | १ | ८ | २ | ४ | ९ |
| २ | ९ | १ | ७ | ५ | ४ | ६ | ३ | ८ |
| ३ | ८ | ४ | ६ | ९ | २ | १ | ५ | ७ |
| ८ | २ | ३ | ४ | ७ | १ | ५ | ९ | ६ |
| ४ | १ | ५ | ९ | ८ | ६ | ३ | ७ | २ |
| ६ | ७ | ९ | ५ | २ | ३ | ४ | ८ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १३२

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | | ■ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ८ | ■ |
| ९ | | ■ | | ■ | १० | | | ११ | | ■ | | ■ | १२ | १३ |
| | ■ | १४ | | | | | ■ | | ■ | १५ | | | | |
| १६ | | | | ■ | | ■ | १७ | | १८ | | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | १९ | | २० | | ■ | २१ | | ■ | २२ | | २३ |
| २४ | २५ | | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | ■ | |
| ■ | | ■ | ३० | ३१ | | ■ | ३२ | | ■ | ३३ | | | ३४ | |
| ३५ | ■ | ३६ | | | ■ | ३७ | | | ३८ | | | ■ | ३९ | |
| ४० | ४१ | | ■ | ४२ | ४३ | | | ■ | ४४ | | ■ | ४५ | | ■ |
| ४६ | | ■ | ४७ | ■ | ४८ | | ■ | ४९ | | ■ | ५० | | | |
| | ■ | ५१ | | ५२ | | ■ | ५३ | | | ५४ | | ■ | ■ | ■ |
| ■ | ५५ | | ■ | | ■ | ५६ | | | ■ | | ■ | ५७ | | ५८ |
| ५९ | | ■ | ६० | | | | | ■ | ६१ | | | | ■ | |
| | ■ | ६२ | | | ■ | | ■ | ६३ | | | ■ | ६४ | ६५ | |
| ६६ | | | | ■ | ६७ | | | | | ■ | ६८ | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) निमग्न, गुंग
३) उदा हिंदू, मुस्लीम ख्रिश्चन इ
४) पावसाची धार
६) आर्जव
९) गर्दभ
१०) दाखला
१२) संरक्षक जाड भिंत
१४) घर
१५) शरीरातील वात दूर करणारा
१६) नव्वद अंशाच्या आतील कोन
१७) वेळ वाया घालविणे
१९) दु:खाची छाया
२१) ज्या प्रमाणे
२२) आश्रय, थारा
२४) बेतास बेत
२७) दात
२८) पंख
२९) त्याला (सं)
३०) एका बाजूस झुकणे
३२) नात्यातील मनुष्य
३३) जकात
३६) धनी
३७) लष्करी छावणीतील बाजार
३९) महिना
४०) दरवाजा
४२) डावरा
४४) पंख
४५) एक चतुर्थांश भाग
४६) अपशकुन (करणे)
४८) कातडी
४९) वडिलांचे वडील
५०) साहसी कृत्य, मूर्खपणाचे काम करणारा
५१) पशू
५२) कायदा मोडणे
५५) झकास
५६) पुन्हा
५७) तीन पानांचा एक म्हणीतील वृक्ष
५९) अंबाडीसारखे एक झाड, त्याचा वाख
६०) जावयाला पहिल्या दिवाळीत मिळणारी भेटवस्तू
६१) गावातील नागरिक, गावात राहाणारे
६२) वात्रट
६३) आवाज होणे
६४) काम करण्याची पात्रता
६६) तापापूर्वीचे अंग मोडून येणे
६७) खर्चात कपात, कतरबेत,
६८) पुष्पदल

**उभे शब्द :-**
१) पहारेकरी
२) होडी
३) श्रीमंत
४) सारखा
५) वाळवंट
६) दोस्त, सूर्याचे एक नाव
७) रागाची चरफड,
८) सभ्यपणाची रीत
१०) निघून जाणे
११) पाणी वाहण्याचे गवंड्याकडील साधन
१३) रोखलेली नजर
१४) भारताचे एक बेट
१५) उत्तराधिकार
१७) शाळेतील फळ्याचा पूर्वीचा रंग
१८) उपस्थित
२०) पुरुषांनी नेसावयाचे रेशमी वस्त्र
२२) निर्यात
२३) मीठ
२५) फक्त, केवळ
२६) संपूर्ण
२८) वेतन
२९) सिद्ध
३१) मागणीचा सततचा हट्ट
३२) अंगरखा
३३) दुखणे, रोग, विकार
३४) मिळवता, कमाई करणारा
३५) उगाच
३६) नारळाचे झाड
३७) खोलवर
३८) पूर्वज
४१) मार्ग
४३) माल साठविण्याची जागा, गुदाम
४५) गवताचे पान
४७) दुर्दशा
४९) लांबट चौकोन
५०) दाह, अग्नी, ज्वाला
५१) कथिल आणि शिसे यांचा मिश्र धातू
५२) राबता, भोगवटा, रिवाज
५३) निमित्त, सबब
५४) अतिशय त्रास देणे, सळो की पळो करणे
५५) नंतर
५६) उथळ, पसरलेला आकार
५७) परीक्षा घेणारा
५८) समानता
५९) तारणारा
६०) वासर
६१) एक रंगीत कंदमूळ
६२) चक्र
६३) गंध
६५) पाक तयार करताना साखरेतून निघणारा मळ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | च | ल | ली | जी | भ | ला | व | ली | टा | ळ्या | ला | ■ | का | ज |
| प | र | वा | ■ | व | ट | व | ट | ■ | ळ | ■ | ल | वा | ज | मा |
| स्थि | ■ | द | ह | न | ■ | ण्य | ■ | सं | के | त | ■ | र | वा | ■ |
| ती | न | ■ | ल | ■ | स | व | ल | त | ■ | पा | ऊ | स | ■ | भ |
| ■ | वा | स | ■ | पा | र्व | ती | ■ | त | म | स | ■ | दा | द | र |
| दा | ■ | मे | ष | पा | त्र | ■ | म | धा | ळ | ■ | स | र | ब | ती |
| स | पा | ट | ■ | चे | ■ | उ | द | र | ■ | मो | र | ■ | द | ■ |
| ■ | चा | ■ | सं | प | त्ती | मा | न | ■ | खो | ■ | ब | र | बा | द |
| आ | र | ■ | ग | र्व | ■ | शं | ■ | प | ■ | वा | त | ड | ■ | ग |
| ग | णे | श | ■ | त | ब | क | ■ | रा | घ | व | ■ | क | वा | ड |
| म | ■ | हा | त | ■ | हा | र | जी | त | ■ | र | ■ | था | ट | ■ |
| न | ज | रा | न | ज | र | ■ | व | ■ | श | ■ | पो | ■ | प | सा |
| ■ | व | ■ | या | म | ■ | चि | ■ | स | र | स | क | ट | ■ | य |
| का | स | रा | ■ | दा | म | चुं | ब | क | ■ | म | ळ | व | ट | ■ |
| या | ■ | स | व | ड | ■ | द्री | ■ | ल | ष्क | र | ■ | का | र | ण |

# देवभूमी हिमाचल

रेकाँग पिओ ते सरहान मार्गावर गेले सहा दिवस दर्शन देणारी सगळी वृक्षराजी साथीला होतीच, तरी प्रकर्षाने जाणवत होते ते गुलाब. प्रवेशद्वाराच्या महिरपी, अंगणात स्वागतास सज्ज तर होतेच; पण डावी-उजवीकडे रस्त्यावर तरत-हेच्या गुलाबांची लयलूट होती. आम्ही जाणार होतो त्या होम स्टेचे नाव होते ''श्रीखंड''. हे तर महाराष्ट्रीयन पक्वान्न, इथे कसं काय बुवा हे नाव दिले? हा विचार मनात उमटून गेला होता.

हिमालयाची शिखरे सतत आमच्याबरोबर होती. त्यांच्याकडे बघून पोट काही भरत नव्हते. श्रीखंड हॉटेलची वाट गुलाबांना अर्पणच केली आहे. भल्यामोठ्या गुलाब पुष्पांचा भार न पेलवल्यामुळे वेली जमिनीवर वाकल्या होत्या. आवार एकदम स्वच्छ, आकर्षक. दारात दुर्मिळ म्हणावीत अशी सकलंट्स. सूर्यफुलाच्या आकारांच्या पानांच्या मोहक हिरव्या रंगांचे ते एक भारी मनात भरले माझ्या. त्याचे लहान-मोठे बरेच प्रकार होते. मी रेंगाळलेच तिथे. तिथला मदतनीस बघत होता. त्याला विचारले, ''हे झाड मला कुठे मिळेल? तुम्हीच एखादे छोटे रोप द्याल का मला?''

''नही, ये यहाँ नही मिलेगा आपको. और वैसे जियेगा मी नहीं.''

खूप वाईट वाटले, पण दिले सोडून. आमच्या खोल्या खूप छान होत्या. मदतनीस जिन्यावरून सामान पटापटा नेऊन देतात. एक बॅग नेताना आमची दमछाक व्हायची; पण हे दोनदोन बॅगा सहज घेऊन धावत असायचे. तसे वेळेवर येऊन पोहोचलो होतो. सामान ठेवून फ्रेश होऊन जवळच असलेल्या मंदिरात काही जण आरतीसाठी जाऊन आले. बाकीच्यांनी तिथेच फिरणे, गुलाबांच्या जवळ जाऊन फोटो काढणे यात आनंद मानला. दुसऱ्या दिवशी सकाळीच नऊ वाजता आरती असते. ती चुकवायची नाही, नाश्ता आल्यावर करू, असे ठरले. रात्री गप्पा, गाणी, वाचनाचे सत्र पार पडले.

सरहानमधील भीमाकाली मंदिर हे भारतातील एकूण एक्कावन्न शक्तीपीठांपैकी एक मंदिर आहे. हिमाचली काठकुनी वास्तुशैलीतील हे मंदिर हे राजाचे कुलदैवत आहे. अतिशय भव्य तरीही सुबक असे सुंदर मंदिर आहे. काठ म्हणजे लाकूड, कुनी म्हणजे दगड. लाकूड आणि दगड यांनीच बांधकाम केलेली ही विशेष शैली. शेकडो वर्षे झाली आहेत. सिमेंटचा वापर अजिबात नाही. खिळेसुद्धा लाकडाचे वापरलेले, काटकोनात केलेले बांधकाम. शेकडो वर्षे जसेच्या तसे राहिलेले मंदिर. भारताच्या विविध भागात किती या संस्कृती जतन केलेल्या आहेत. खरंच कमाल वाटते. या वास्तुशास्त्राचे अभ्यासक आहेत ते जास्त छान सांगतील; पण आम्हाला थोडी माहिती टूर आयोजक देत होते. निमुळते बांधकाम असल्याने बर्फ ओघळून जातो. ही त्या हवामानातील मोठी गरज आहे. लाकडी सुरेख कोरीवकाम केले आहे. प्रवेशासाठी आधी दोन मोठे चौक आहेत. चप्पल बूटच फक्त नाहीतर मोबाईल, चामड्याच्या वस्तू वगैरे सगळे बाहेर ठेवावे लागते. त्यासाठी लॉकर्स व्यवस्था आहे. अतिशय विस्तीर्ण असा हा मंदिराचा परिसर आहे. या चौकातून सुद्धा गुलाब बगीचे डोलत होते. पूजेसाठी तीच फुले खुडून नेताना पाहिले.

शेवटी दोन-तीन जिने चढून आत आत जावे लागते. सर्वात वरच्या मजल्यावर मध्यभागी एक खोली. तोच गाभारा. चारही बाजूंनी अरुंद पॅसेज. अगदी गाभाऱ्यात जाता येत नाही. एक पुजारी आत पूजा करत होते, दुसरे गाभाऱ्याच्या दारात



बसले होते. त्यांच्या समोर एक माणूस उभा होता. बाहेरच्या तीन अरुंद पट्टीमध्ये गर्दी करून भाविक उभे होते. एका कोपऱ्यात भलीमोठी घंटा बांधलेली होती. जशी आरतीची वेळ जवळ आली, तशी त्यांच्यातील नेमून दिलेल्या व्यक्तींनी आपापली जागा घेतली. दारातील उभ्या माणसाने हाती शंख घेतला. घंटेसमोर एक स्त्री तयारीत थांबली. आतून विशिष्ट आवाज येताच शंखनाद सुरू झाला, त्यानंतर घंटानाद. आरती सुरू झाली. एकही शब्द ऐकूच आला नाही. त्यामुळे ती कोणत्या भाषेत होती, काहीही समजले नाही. सारे वातावरणच भक्तिभावाचे झाले. एक ठेका पकडून टाळ्या वाजवत देवीला मनोमन स्मरत राहिलो. समोर दोन-चार जणच उभे राहू शकत होते. एकमेकांना जागा देऊन मुखावलोकन केले. आरती झाल्यावर प्रसाद घेऊन बाहेर येऊन चौकात उभे राहिलो आणि धुक्याचा पडदा हटला. कल्पाला झाले तसेच गौरीशंकराचे परत एकदा विलोभनीय दर्शन झाले. विस्तृत पर्वतराजी होती; परंतु त्यातही परत एक विशिष्ट शिखर होते ज्यावर अजिबात बर्फ साठले नव्हते. हा होता ''श्रीखंड कैलास''. एकदम मनात आले श्री म्हणजे ईश्वर, खंड म्हणजे प्रदेश, ईश्वराची भूमी म्हणजेच देवभूमी. सार्थ नाव मिळाले आहे या प्रदेशाला. मनोभावे नमस्कार केला. दोन कैलासांचे दर्शन मिळण्याचा विलक्षण योग नशिबात आला होता. हॉटेलवर परतून खाणेपिणे आवरून आमच्या शेवटच्या मुक्कामाला निघालो.

सामानसुमान आणणे, शेवटचे बागेत फिरणे आटोपून गाडीत चढायला निघताना त्या मदतनीसाला विचारले, ''मैं आपका फोटो ले सकती हूं क्या?''

लाजून, ''जरूर जी'' म्हणाला. एक छान फोटो घेतला. मग हळूच म्हणतो, ''आपके लिये एक छोटासा पेड दिया है मैंने. आपको चाहिए था न, वो.''

मी थक्कच झाले. एका साध्याशा माणसाने माझी इच्छा कसलीही अपेक्षा न करता पुरी केली होती. मला, ''धन्यवाद, बहोत ही धन्यवाद'' यापलीकडे काहीच बोलायला सुचलेच नाही.

गाडीत गेल्यावर एक छोटे रोप बाजूने व्यवस्थित माती ठेवून, प्लॅस्टिक पिशवीमध्ये गुंडाळून दिलेले प्रवीणाने दिले. छोट्या-छोट्या गोष्टी या, पण अपरिमित आनंद देऊन जातात. नाही का?

हिमाचलमधील आमचे शेवटचे डेस्टिनेशन होते ''नारकंडा''.

ही इतकी आनंदात चाललेली सहल आता शेवटच्या टप्प्यावर आली हे जाणवल्यामुळे एक विचित्र हुरहूर प्रत्येकीच्या मनात होती. रोज गाडीतील धमाल, एकमेकांची चेष्टा मस्करी, आमच्याकडून अमुक, तिकडून तमुक अशा वस्तूंची, खाऊची देवाणघेवाण आणि रोज रात्री कोणाच्या तरी खोलीत महफिल जमवून मारलेल्या गप्पा, मुलांचे नातवांचे दाखवलेले फोटो, सुनांचे वर्णन यासगळ्या वरवर साध्या वाटणाऱ्या शेअरिंगमुळे आम्ही एकमेकींच्या जवळ आलो होतो. आता अलिबागकर आणि पुणेकर भेद उरलाच नव्हता, आम्ही एका सामाईक आवडीच्या साथीदार झालो. टाळ्या देताना भेदभाव राहिला नाही. कोणाची ठरवून



चेष्टा करायची असेल तर अलिबाग आणि पुणेकर संगनमताने करू लागले होते. अर्थात, ती निव्वळ, निखळ मजा असायची.

नारकंडाला लवकरच पोहोचलो. आजवर जरी सगळे होम स्टे असले तरी ते हॉटेलवजाच होते. हा मात्र खराखुरा होम स्टे होता. पहिल्या दहा पायऱ्या चढल्यावर मालकाचे घर आणि डायनिंग रूम. मग एक चिंचोळा जिना चढून गेल्यावर आमच्या खोल्या. त्या अगदी सुसज्ज. कुठेही अस्वच्छता, धूळ, अरुंद जागा नाहीत. ऐसपैस खोल्या. त्यातून मालकाने स्वतः लाकडाचे बनवलेले फर्निचर. लाकडाची टेबल्स आपण बघतोच, पण अखंड लाकडातून तयार केलेल्या खुर्च्या फारच भारी होत्या. एकूणएक फर्निचर स्वतः बनवलेले होते. हा एक इंजिनीयर आहे माणूस. अनेक गुणात निपुण आहे.

गेल्या गेल्या सुहास्यवदना मालकीण बाईंनी आमचे चहा आणि कांदाभजी देऊन उत्तम स्वागत केले. खाणारे दमले तरी गरम भजी येतच होती.

वातावरण इतके छान होते की चालत बाहेर जाऊया ठरवले. डायनिंग रूमच्या बाहेर आलो आणि समोर या कुटुंबाची बाग दिसली. मधे मध्ये बाक टेबल ठेवलेली होतीच. त्यांचा मुलगा होता त्याला म्हटले आम्हाला जरा झाडे दाखवायला चल रे. तोही पटकन आला आणि वडीलही आले. तिथे मला वाटते काही एकर त्यांची बाग होती आणि तिथून थोड्या अंतरावर अशाच दोन बागा घेतल्या होत्या.

या आजवरच्या प्रवासात आम्ही सतत आम्हाला सफरचंद, प्लम वगैरेंच्या बागेत जायचे आहे, त्या झाडांना हात लावायचा आहे, फळांना स्पर्श करायचा आहे तेव्हा तसे थांबू या अशी मागणी करत होतो. आज या बागेतील घरात मुक्काम करून आमची मनापासूनची इच्छा पूर्ती झाली होती. पीच, प्लम, अक्रोड, जरदाळू, सफरचंद अशा या भागातील स्पेशल फळांची बाग. हरखून जाणे म्हणजे काय ते तेव्हा आम्हाला पाहिले असते तरच कळले असते. अपार आनंद लुटला.

मग त्या चिंचोळ्या रस्त्यावरून एका बाजूने सांभाळून चालत फिरायला निघालो. थंडी होतीच. बर्फाच्छादित पर्वत रांगा मात्र अगदी समोर. किती तरी अंतर चाललो. मधेच

सफर
वर्षा कुवळेकर
८७६६५६९१३६

गावातली पिटुकली दुकाने लागली. उगीच तिथे डोकावलो, रस्त्यावरचे दगडगोटे आकर्षित करत होते. विविध रंगांचे, आकारांचे गोटे होते. त्यातल्यात्यात लहान शोधले, एकमेकींना दिले. मौल्यवान ऐवज मिळाल्यासारखे जपून जवळ वागवले. बाजूने गाड्या जात होत्या. पर्यटक होतेच; पण स्थानिक जोडपी मला दिसली. मारुती गाडीतून एक जोडपे आम्हाला पुढे गेलेले दिसले. हिमालय बघत एका धबधब्याच्या दिशेने आम्ही निघालो होतो. थोडे पुढे गेल्यावर तीच मारुती कार शक्य तितकी डोंगराजवळ खेटून उभी केलेली दिसली. सहज वर पाहिले तर ते दांपत्य डोंगरावर चढत होते. एक अगदीच चिमुकली पायवाट दिसली. न राहवून मी त्यांना विचारले, ''आप क्या कर रहे हो वहां?''

डोक्याच्या वर दूर उंचावर हात दाखवत तो माणूस म्हणाला, ''वह घर हैं हमारा.आइये, चाय पिनेके लिये.''

थोड्या वार्तालापानंतर समजले की त्या डोंगरावर त्यांचे घर आहे. ती पसरलेली फळबाग त्यांचीच आहे. त्यांचे दूर शहरात दुकान आहे. ती स्त्री शिक्षिका होती. जवळच्या शाळेत शिकवते. त्यांचा एक मुलगा मेडिकलला आहे, दुसरा गावात शाळेत जातो. त्याला घ्यायला बस येते.

ते दोघे डोंगरावर आणि आम्ही येणाऱ्या गाड्यांवर डोळा ठेवून रस्त्यावर उभ्या राहून एवढ्या गप्पा मारल्या. गृहस्थ धर्माला जागून दोघेही त्यांच्या घरी आग्रहाने बोलावत होते. पण ती अतिच छोटी पायवाट चढण्याची कल्पना अजिबातच सुसह्य नव्हती. त्यांच्या गाडीचे ते अजब पार्किंग बघत पुढे गेलो. डोंगरावर आणि विरुद्ध दिशेला खाली सुद्धा या फळबागा होत्या. खरे समाधान झाले अगदी.

खूप पुढे गेलो. धबधबा काही येईना. अंधार मात्र होऊ लागला. पुढील वळणावर हिमालयाचा कडा पाहू आणि परतू असे करत अखेर परतलो. मुक्कामी आल्यावर सरळ बागेतील बाकडी गाठली. बाजूने बाक आणि मधोमध शेकोटी तयार केली मालकाने. आमचे पूर्णार्थाने साजरे झाले. अनुभवाचे वाटप सुरू झाले. गाणी झाली, गोष्टी सांगितल्या गेल्या. जेवणाची वेळ लांबवत आनंद घेत राहिलो. मालक मध्ये येऊन काही हकिगती सांगायचा. त्याचाही मुलगा मेडिकल शिकत आहे. आईबाबांना सगळी मदतही करत होता. कौतुक वाटले. फळांचे कळले, त्यांची देखभाल कळली. घरी केलेले जाम आणि फळांच्या चटण्या दाखवल्या. खरेदी झालीच. ताजी फळे झाडावरून तोडून किलोवर घेतली. आपण घेतो त्यापेक्षा किती स्वस्त आणि कमाल ताजी. आमच्या इच्छेसाठी याने वांगी बटाटा रस्सा भाजी दिली. खूप खूप छान अनुभव.

पुणेकरांची दुसऱ्या दिवशी बारा वाजताची चंदिगढला ट्रेन पकडायची होती. म्हणून पहाटे तीन वाजताच निघायचे होते. आमच्यासाठी पहाटे आलू पराठे या दांपत्याने गरमागरम करून दिले.

खरं तर, लवकर झोपायला हवे होते. पण, आमचा एकीचाही पाय निघेना. रात्री दीड वाजेपर्यंत आम्ही बोलतच बसलो. विरह जाणवू लागला.

''ए, उद्या चंदिगढला काय ग करणार आहात? आम्हाला फोन करत रहा बरं का''.

''अग नक्कीच करू. खरेदीही करणार आहोत तेव्हा व्हिडिओ कॉल करू''.

''आता पुण्याला या हं. माझे घर तुळशी बागेजवळ आहे. शॉपिंग पण करवेन आणि खाऊ पण मस्त करेन''.

''पाऊस लागला की अलिबागला या ग.''

हळवी आमंत्रणे होऊ लागली.

जेमतेम तासभर पडलो आणि निघालो. गाडीत झोपू वाटले, पण गप्पा अखंड सुरू राहिल्या. चंदिगढला आम्हाला हॉटेलवर सोडून पुणेकर रेल्वे स्टेशनकडे गेले. उदास होऊन आम्ही रूम ताब्यात घेतल्या पण झोपू शकलो नाही.

# विद्यार्थ्यांचा आवाज दाबला जाणार नाही!

जंतर मंतर आंदोलनाची तीव्रता कोणत्यातरी निश्चित परिणामांवर येण्याची शक्यता आहे. सोनम वांगचूक यांचे उपोषण, त्याच्या जोडीला कॉकरोच पार्टीचे आंदोलन यामुळे राजकारणाशी संबंधित अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या आंदोलनाच्या मुळाशी 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीचा प्रश्न आहे. आपल्या पंतप्रधानानी कधी नाही ते याबाबत भाष्य केले. दिल्लीत या अगोदर आंदोलन झाली नाही असे नाही. शेतकरी संघटना, विरोधी पक्ष यांनी दिल्लीत आंदोलन करुन सरकारला त्यांच्या चूका निदर्शनास आणून दिल्या आहेत. मोदी सरकारच्या १२ वर्षात पहिल्यांदा हे आंदोलन निर्णायकी स्तरावर आले आहे. यापूर्वी २०१९ मध्ये जंतरमंतरवर शेतकरी संघटनांनी आंदोलन केले होते; परंतु इतके हिंसक आंदोलन झाले नव्हते. १२ वर्षांच्या काळात आंदोलन थेट संसदेवर धडकले हे मोदी सरकारच्या काळात पहिल्यांदा झाले आहे. संसदेकडे जाणारे रस्ते तरुण तरुणींनी व्यापून टाकले. त्या सर्वांना आवरण्यासाठी पोलीस, निमलष्करीदल यांची हतबलता स्पष्ट दिसत होती. या तरुण तरुणी आपल्या मागणीसाठी सरकारकडे आंदोलन करत होते. त्यांना आवरण्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या जात होत्या. पण यांनी विद्यार्थ्यांवर काहीच परिणाम झाला नाही. तरुणांनी मागे हटायचे नाही असा निर्धारच केला होता.

वांगचुक यांना जंतरमंतरवर उपोषणाला बसले असतांना पोलिसांनी आंदोलन स्थळांवरुन हलवले. त्यांना दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना उपोषणामुळे अशक्तपणा आणि निर्जलीकरण झाल्याची रुग्णालयांनी माहिती दिली. या उपचाराबाबत वैद्यकीय अहवालाची प्रत सोनम वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली यांनी मागणी करुनही मिळाली नाही. गीतांजली यांनी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षकांना पत्र लिहून वांगचूक यांना तोंडावाटे किंवा शिरेतून कोणतेही औषध द्रव किंवा इलेक्ट्रोलाईट देऊ नये, अशी विनंती केली. वांगचूक






यांनी सुद्धा इलेक्ट्रोलाईट पावडर घेण्यास नकार दिला. या बाबींतून गीतांजली वांगचूक यांना कोणती शंका आली असावी? लोकशाही मार्गाने चाललेल्या विद्यार्थ्यांना अशी दहशत वाटणे कशाचे प्रतिक आहे? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

वांगचुक यांना पाठिंबा देणाऱ्या अभिजित दिपके मित्राच्या घरी कपडे बदलण्यासाठी गेले असतांना पोलिसांनी घराभोवती गराडा घातला व त्यांनां घरातच असतांना ताब्यात घेतले आणि जंतरमंतरवरुन वांगचूक यांना इस्पितळात पोहचल्यानंतर दिपके यांना सोडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन हालचालीवर लक्ष ठेवून सरकारने आंदोलन चिरडायचे ठरवले होते. याबाबत निश्चिती होते. वांगचूक यांना रुग्णालयात दाखल झाल्यानंतर मोबाईल फोन रुग्णालयाच्या खोलीत नेण्यास नकार देण्यात आला.

खरं तर हा संघर्ष सत्याग्रहाचा होता. भारताच्या इतिहासात सत्याग्रह हा परकीय सत्तेविरुद्ध लढण्यासाठी केला गेला. पण आज त्याच भारतात देशाच्या भवितव्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या युवक-युवतींना स्वतःच्या न्याय्य मागण्यांसाठी लोकशाही सरकारविरुद्ध रस्त्यावर उतरावं लागत आहे, ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. याहूनही गंभीर प्रश्न म्हणजे, आंदोलकांच्या मागण्या नेमक्या काय आहेत, त्या का आहेत, यावर संवाद साधण्याऐवजी त्यांना दडपण्याचा मार्ग स्वीकारला जात आहे. चर्चा, संवाद आणि लोकशाहीच्या मूल्यांऐवजी दडपशाही, नजरकैद, लाठीमार आणि दंडुकेशाहीचा वापर करून आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न झाला. लोकशाहीत विरोधी आवाजाला उत्तर हे संवादाने दिले जाते; दडपशाहीने नाही. कारण जेव्हा सरकार प्रश्न ऐकण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यांनाच गुन्हेगार ठरवू लागते, तेव्हा धोक्यात केवळ एक आंदोलन नसते तर धोक्यात संपूर्ण लोकशाही असते.

जंतरमंतरवरचे आंदोलन उत्स्फुर्त होतेच पण त्याचबरोबर कोणत्या राजकीय पक्षाच्या झेंड्याखालीही ते नव्हते. आंदोलनात सहभागी झालेले तरुण-तरुणी देशाच्या वेगवेगळ्या भागातून येथे आली होती. सभा आणि 'रोडशोला' पैसे देऊन लोक जमा करणाऱ्या राजकीय पक्षासारखी भुरटेगिरी करणारी ही गर्दी नव्हती. अलिकडे परीक्षांची पेपरफुटी हे कारण फक्त मर्यादीत नव्हते तर 'नीट' परीक्षा रद्द झाल्याचा फटका बसलेले, 'सीबीएस' घोटाळ्याचा मनस्ताप झालेले विद्यार्थी तसेच या सगळ्या भोंगळशाहीमुळे ज्या पालकांनी आपली मुले गमावली आहेत, त्यांचे पालक, नोकरी, रोजगार याबाबत उदासिन असलेल्या सरकारचे निषेध करणारे युवक-युवती रोजगार आणि शिक्षण प्रणालीकडे अक्षम्य दुर्लक्ष्य करणारी शासन यंत्रणा या सगळ्यांचा जाब मागणारे तरुण तरुणी एकवटलेले होते. लाखोंच्या संख्येने एकत्रित आलेले हे सर्व आपले भविष्य अंधारमय नको म्हणून दाद मागत होते. देशाचे भविष्य या पेक्षा दुसरे नाही परंतु जे देश चालवतांत विद्यार्थ्यांच्या आक्रोशाला आधार देण्याचे सोडून हे आंदोलन दडण्याचे काम सरकारने केले, अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया उमटली जात आहे.

सोनम वांगचूक आणि अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या या आंदोलनात अनेक शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना आणि विविध सामाजिक संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला. सरकारने या आंदोलनाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारच्या धोरणांतील त्रुटी, परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवस्था, विद्यार्थ्यांवरील अन्याय आणि त्या दुरुस्त करण्याच्या मागणीसाठी आंदोलन होत असेल, तर विरोधी पक्ष त्यात सहभागी होणारच. कारण सत्तेला जाब विचारणे आणि जनतेच्या प्रश्नांवर सरकारला उत्तरदायी धरणे हे विरोधी पक्षाचे घटनात्मक कर्तव्य आहे. आंदोलनातील युवक युवतींमध्ये दडपशाही झाली तरी ते हताश नाहीत.त्यांच्यामध्ये आवेश आहे. समाजकारण आणि राजकारणाला भेदाभेद नाही. सामाजिक न्यायाची राजकारणाची ही नांदी आहे. सोनम वांगचुक एक आदिवासी व्यक्ती आणि अभिजित दिपके एक दलितव्यक्ती ज्याला वांगचुकांनी प्रेरणा दिली आहे. हिंदू खतरे मे! इस्लाम खतरे मे! राम मंदिर, बाबरी मस्जिद, धर्माच्या या खेळण्यापेक्षा बहुजन हिताय, न्यायप्रिय, सत्यमेव जयते, युवाशक्तीची ही गर्जना फक्त हुंकार समजू नये. याबाबत आंदोलकांच्या मागणीला नकार देऊन आंदोलन चिरडून युवकांना थांबवता येणार नाही. कदाचित युग बदलवणारे युवा सत्ताबदलाचे कारण होऊ शकतात याचे भान सत्तारुढ पक्षाला येऊ दे!

सत्तारूढ मोदी सरकारसाठी चिंतेची बाब विरोधी पक्षांचा सहभाग नसून, देशभरातील विद्यार्थी, शेतकरी आणि युवक एका समान प्रश्नावर एकत्र येऊ लागले आहेत, ही आहे. कारण जेव्हा विद्यार्थ्यांचा आक्रोश, शेतकऱ्यांचा संताप आणि जनतेचा असंतोष एकाच व्यासपीठावर येतो, तेव्हा तो केवळ आंदोलन राहत नाहीतो सत्तेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारा जनआवाज बनतो.

# विद्यार्थी विकास : शिक्षणाचा अंतिम ध्यास

शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती विद्यार्थ्यांच्या मेंदूत कोंबण्याची प्रक्रिया नव्हे. शिक्षणाचा खरा अर्थ आहे; विचार करण्याची क्षमता निर्माण करणे, योग्य-अयोग्याची जाण विकसित करणे, निर्णयघेण्याचेधैर्यदेणे,संवेदनशीलता जपणे आणि समाजाशी नाते जोडत स्वतःच्या जीवनाला अर्थपूर्ण दिशा देणे. म्हणूनच विद्यार्थी विकास हाच शिक्षणाचा अंतिम उद्देश असला पाहिजे.

आज शिक्षणाची व्याख्या गुण, पदवी आणि रोजगार या त्रिकोणात अडकलेली दिसते. किती गुण मिळाले, कोणती पदवी घेतली आणि किती पगाराची नोकरी मिळाली, यावर विद्यार्थ्याच्या यशाचे मोजमाप केले जाते. पण, शिक्षण जर केवळ नोकरी मिळवून देण्यापुरते मर्यादित राहिले, तर ते अपूर्णच ठरते. शिक्षणाची खरी कसोटी तेव्हा लागते, जेव्हा विद्यार्थी चांगला माणूस, सजग नागरिक आणि जबाबदार व्यक्ती म्हणून समाजासमोर उभा राहतो.

प्राचीन ग्रीसमधील तत्त्वज्ञ सॉक्रेटिसने सांगितले''स्वतःला ओळखा.'' हा केवळ तत्त्वज्ञानाचा विचार नाही, तर शिक्षणाचा मूलमंत्र आहे. स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवड, ध्येय आणि कमतरता ज्याला समजतात, तोच विद्यार्थी स्वतःच्या विकासाचा खरा मार्ग शोधू शकतो. अशा वेळी बाह्य स्पर्धेपेक्षा आत्मविकासाला महत्त्व प्राप्त होते.

भारतीय तत्त्वज्ञानानेही याच विचाराला वेगवेगळ्या रूपांत मांडले आहे. उपनिषदांचे ''आत्मानं विद्धि'', गौतम बुद्धांचे ''अप्प दीपो भव'' आणि स्वामी विवेकानंदांचे ''शिक्षण म्हणजे माणसामध्ये आधीपासून असलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण'' हे विचार एका समान सत्याकडे निर्देश करतात. विद्यार्थी हा माहिती भरून ठेवण्याचा रिकामा पेला नाही. त्याच्यामध्ये अमर्याद क्षमता, कल्पनाशक्ती आणि सामर्थ्य दडलेले असते. शिक्षणाचे काम त्या सुप्त शक्तींना जागृत करणे आहे.



निसर्गातील बीजाकडे पाहिले, तरी हाच धडा मिळतो. बीजाला एका दिवसात वटवृक्ष होता येत नाही. आधी ते जमिनीत मुळे घट्ट रुजवते. मुळे जितकी खोल, तितका वृक्ष अधिक भक्कम आणि

सुनील गवळी

उंच. विद्यार्थ्याच्या जीवनातही ज्ञान, संस्कार, शिस्त, संवेदनशीलता आणि चारित्र्य हीच मुळे आहेत. गुण हे यशाचे फळ असू शकतात; पण मूल्ये ही त्या यशाची मुळे आहेत. मुळांची काळजी घेतली, तर फळे मिळणारच.

भगवद्गीतेतील अर्जुनाची कथा हीदेखील विद्यार्थी विकासाचा प्रभावी धडा आहे. युद्धभूमीवर अर्जुनाला शत्रूंनी पराभूत केले नव्हते; तो स्वतःच्या संभ्रमामुळे खचला होता. श्रीकृष्णांनी त्याच्या हातात केवळ शस्त्र दिले नाही, तर त्याला जीवनाकडे पाहण्याची दृष्टी दिली. कारण, योग्य दृष्टी मिळाली की निर्णय योग्य होतात आणि योग्य निर्णय जीवनाची दिशा ठरवतात. शिक्षणाचे सर्वोच्च कार्यही विद्यार्थ्याला अशीच विवेकपूर्ण जीवनदृष्टी देणे आहे.

आज माहिती मिळवणे कधी नव्हे इतके सोपे झाले आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे काही क्षणांत जगभरातील माहिती आपल्या हातात येते. मात्र माहिती आणि ज्ञान यात फरक आहे; आणि ज्ञानापेक्षाही मोठी गोष्ट म्हणजे विवेक. करुणा, संयम, मूल्यनिष्ठा, स्वयंशिस्त, सहिष्णुता आणि मानवता कोणतेही तंत्रज्ञान तयार करू शकत नाही. या गुणांची जडणघडण शिक्षक, पालक, संस्कार आणि अनुभवातूनच होते.

म्हणून विद्यार्थी विकास हा केवळ बुद्धीचा विकास नाही; तो मन, विचार, भावना, आचरण आणि चारित्र्याचा समग्र प्रवास आहे. विद्यार्थ्याने मोठी पदवी मिळवावी, उत्तम करिअर करावे, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, हे निश्चितच महत्त्वाचे आहे. पण, त्याचबरोबर त्याने आपल्या यशाचा उपयोग समाजासाठी कसा करायचा, याची जाणीव असणे त्याहून महत्त्वाचे आहे.

शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ यशस्वी व्यावसायिक घडविणे नसून विवेकशील विचारवंत, संवेदनशील नागरिक आणि मूल्यनिष्ठ माणूस घडविणे हा आहे. कारण एक सुशिक्षित व्यक्ती स्वतःचे जीवन बदलू शकते; पण एक सुसंस्कृत आणि जबाबदार व्यक्ती संपूर्ण समाजाचे भविष्य बदलू शकते.

विद्यार्थी विकास म्हणजे परीक्षेत अव्वल येण्याची शर्यत नव्हे. ती स्वतःला समजून घेण्याची, स्वतःच्या मर्यादा ओलांडण्याची, चुका स्वीकारून त्यातून शिकण्याची आणि आयुष्याला अर्थ देण्याची अखंड साधना आहे.

शिक्षणाचे खरे यश गुणपत्रिकेत दिसत नाही. ते विद्यार्थ्याच्या विचारांत, वर्तनात, निर्णयांत, चारित्र्यात आणि समाजासाठी काहीतरी करण्याच्या वृत्तीत दिसते. म्हणूनच शिक्षणाने केवळ हुशार विद्यार्थी घडवण्याऐवजी सुजाण, संवेदनशील आणि माणुसकी जपणारे नागरिक घडवण्याचा ध्यास घेतला पाहिजे. हाच विद्यार्थी विकासाचा खरा अर्थ आणि शिक्षणाचा अंतिम ध्यास आहे.

*(लेखक विद्यार्थी समुपदेशक आहेत.)*

# कोकणातील अतिरिक्त पाण्याची सुवर्णसंधी!

कोकणात पावसाची बरसात झाली की नद्या-नाले दुथडी भरून वाहतात आणि काही तासांतच हे कोट्यवधी लीटर गोडे पाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यात मिसळून जाते. त्याच वेळी विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी पाण्याच्या एका थेंबासाठी आभाळाकडे डोळे लावून बसलेला असतो. निसर्गाने एका भागाला दिलेले पाण्याचे वरदान आणि दुसऱ्या भागाची पाण्यासाठीची वणवण, हे महाराष्ट्राच्या जलव्यवस्थापनातील सर्वात मोठे विरोधाभासी चित्र आहे. याच विरोधाभासावर कायमस्वरूपी उपाय करण्याची क्षमता 'कोकण जलयोजने'मध्ये आहे.



कोकणातील अतिरिक्त पाणी दुष्काळी भागाकडे वळविण्याची ही संकल्पना प्रत्यक्षात आली, तर महाराष्ट्राच्या कृषी आणि जलव्यवस्थापनाच्या इतिहासात नवे पर्व सुरू होऊ शकते. या योजनेमुळे राज्यातील १५ ते ३० लाख हेक्टर क्षेत्र नव्याने सिंचनाखाली येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्याची राज्याची सिंचन क्षमता सुमारे २० टक्के असून, ती जवळपास ४० टक्क्यांपर्यंत वाढू शकते. म्हणजेच लाखो शेतकऱ्यांच्या शेतीला पाण्याची शाश्वत साथ मिळू शकते.

कोकणाला पावसाचे वरदान लाभले आहे. मात्र या पाण्याचा पुरेसा साठा आणि योग्य नियोजन होत नसल्याने मोठ्या प्रमाणातील पाणी समुद्राला जाऊन मिळते. दुसरीकडे राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण कमी, अनिश्चित किंवा असमान असल्याने शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. या परिस्थितीत कोकणातील अतिरिक्त पाणी दुष्काळी भागाकडे वळविणे हा केवळ जलसिंचनाचा विषय नाही, तर राज्याच्या भविष्यातील जलसुरक्षेचा प्रश्न आहे. पाणी उपलब्ध झाले तर कोरडवाहू शेती बागायती होऊ शकते. शेतकऱ्यांना वर्षातून दोन-तीन पिके घेता येतील. शेती उत्पादन वाढेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळेल.

> 'कोकण जलयोजना' साकारली तर ३० लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली

**सलीम शेख**

मोठ्या जलसिंचन प्रकल्पांमध्ये भूसंपादन आणि पुनर्वसन हे मोठे अडथळे ठरतात. मात्र प्रस्तावित योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सह्याद्री पर्वतरांगांच्या पायथ्याने सिंधुदुर्ग ते मुंबईपर्यंत प्रस्तावित मुख्य कालव्याचा मोठा भाग शासकीय जमिनीवरून जाण्याची शक्यता आहे. उर्वरित जमीनही बहुतांश डोंगराळ, खडकाळ किंवा पडीक स्वरूपाची असल्याने भूसंपादनाचा खर्च तुलनेने कमी राहू शकतो. सुपीक शेती आणि वस्ती मोठ्या प्रमाणावर बाधित होणार नसल्यास पुनर्वसनाचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतो. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी इतर मोठ्या प्रकल्पांच्या तुलनेत सुलभ होण्याची शक्यता आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर जमीन पाण्याअभावी शेतीपासून वंचित आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांचे संपूर्ण अर्थकारण पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. पाऊस कमी झाला की पीक जाते, उत्पन्न घटते आणि कर्जाचा भार वाढतो. अनेक कुटुंबांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. अशा परिस्थितीत कोकणातील अतिरिक्त पाणी दुष्काळी भागात पोहोचले तर परिस्थितीचा चेहरामोहरा बदलू शकतो. दुबार-तिबार पीक घेणे शक्य होईल. फळबागा, भाजीपाला आणि अन्य नगदी पिकांना चालना मिळेल. शेतीच्या उत्पन्नात वाढ होऊन ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

या योजनेचा फायदा केवळ शेतीपुरता मर्यादित राहणार नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, उद्योगांना लागणारे पाणी, भूजल पातळीतील सुधारणा, ग्रामीण रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्था या सर्वांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांनाही या जलव्यवस्थापनातून लाभ मिळण्याची शक्यता व्यक्त केली जाते. विविध अभ्यासांनुसार महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाईवर दीर्घकालीन उपाय म्हणून या योजनेकडे पाहता येईल.

### ४० हजार कोटींचा खर्च; पण फायदा पिढ्यान्‌पिढ्यांचा

या प्रकल्पासाठी सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले जाते. त्यातील मोठा हिस्सा महाराष्ट्र सरकारने उचलावा आणि उर्वरित खर्च संबंधित राज्यांनी करावा, अशी संकल्पना मांडण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या आर्थिक सहकार्यामुळे प्रकल्पाला अधिक गती मिळू शकते. ४० हजार कोटींची गुंतवणूक निश्चितच मोठी आहे. मात्र या खर्चाकडे केवळ आजचा आर्थिक भार म्हणून न पाहता पुढील अनेक दशकांसाठीची जलसुरक्षा म्हणून पाहण्याची गरज आहे. लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊन शेती उत्पादनात वाढ झाली, तर त्यातून निर्माण होणारी आर्थिक उलाढाल या गुंतवणुकीपेक्षा कितीतरी मोठी ठरू शकते.

### शेतकरी आत्महत्यामुक्तीच्या दिशेने पाऊल?

पाण्याची उपलब्धता हा शेतीचा कणा आहे. पाणी नसेल तर उत्तम जमीन, बियाणे, खत आणि तंत्रज्ञान असूनही शेतकऱ्याची शेती संकटातून बाहेर पडत नाही. सातत्याने दुष्काळाचा सामना करणाऱ्या भागातील शेतकऱ्यांसाठी सिंचनाची हमी म्हणजे केवळ पीक वाचविणे नव्हे, तर कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याची संधी आहे. पाण्याची शाश्वत उपलब्धता निर्माण झाली तर उत्पन्न वाढू शकते, कर्जाचा ताण कमी होऊ शकतो आणि शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलू शकतो. त्यामुळे शेतकरी आत्महत्यांच्या समस्येवरही अप्रत्यक्षपणे सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा करता येईल.

मात्र या योजनेचा विचार करताना कोकणाच्या पर्यावरणीय आणि स्थानिक गरजांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कोकणातील पाणी दुष्काळी भागाला देताना स्थानिक शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, पर्यावरण, नद्या-खाड्या आणि भविष्यातील कोकणाची जलगरज यांचा समतोल साधणे आवश्यक आहे. कोकणातील पाणी बाहेर नेण्यापूर्वी कोकणाची तहान भागली पाहिजे, ही भूमिका तितकीच महत्त्वाची आहे. जलसंपत्तीचे न्याय्य आणि शाश्वत नियोजन झाले, तरच ही योजना सर्वांच्या हिताची ठरेल.

### जलक्रांतीसाठी राजकीय इच्छाशक्ती हवी

इतक्या मोठ्या प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्य सरकार, संबंधित राज्ये, लोकप्रतिनिधी, जलतज्ज्ञ, शेतकरी आणि नागरिक यांचा समन्वय आवश्यक आहे. राजकीय मतभेद बाजूला ठेवून दीर्घकालीन दृष्टिकोनातून या योजनेचा अभ्यास आणि निर्णय व्हायला हवा. कोकणातील पावसाचे पाणी दरवर्षी समुद्रात वाहून जाणे आणि दुसरीकडे शेतकऱ्यांनी पाण्यासाठी टाहो फोडणे, हे चित्र बदलण्याची वेळ आता आली आहे. पाण्याचे योग्य नियोजन झाले, तर कोकणाचे पावसाचे वरदान दुष्काळी महाराष्ट्रासाठी जीवनदायी ठरू शकते. ही योजना केवळ कालवे, बंधारे आणि पाणी वाहून नेण्याचा प्रकल्प न राहता शेतकऱ्याच्या जीवनात स्थैर्य आणणारी जलक्रांती ठरू शकते. कोकणातील पावसाचे वरदान आणि दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील आशा यांना जोडणारी ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आता गरज आहे ती ठोस अभ्यासाची, पारदर्शक नियोजनाची आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे राजकीय इच्छाशक्तीची. समुद्रात वाहून जाणारे पाणी जर शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचले, तर महाराष्ट्राच्या नकाशावर दुष्काळाचे डाग पुसण्याची हीच कदाचित मोठी संधी ठरू शकते. ●

# 'कांदोगोलमो'

**धनंजय शेटये**

बालपणीच्या आठवणींचा खमंग दरवळ काही चवी अशा असतात की त्या केवळ जिभेवर रेंगाळत नाहीत, तर मनाच्या कप्प्यात कायमच्या घर करून राहतात. त्या प्रत्येक घासागणिक आपल्याला पुन्हा एकदा बालपणाच्या निष्पाप, निरागस आणि आनंदी दिवसांत घेऊन जातात. अशीच एक अस्सल, गावरान आणि आत्मीय चव म्हणजे 'कांदोगोलमो'. हा केवळ एक पदार्थ नाही; तर कोकणच्या मातीत रुजलेल्या संस्कृतीचा, आईच्या मायेचा आणि बालपणीच्या सुंदर आठवणींचा अमूल्य ठेवा आहे.



मालवणी भाषेत 'गोलमो' म्हणजे 'जोवला'. पूर्वी पावसाळ्यात समुद्र खवळलेला असल्याने ताजी मासळी सहज उपलब्ध होत नसे. त्यामुळे घराघरांत सुकी मासळी, बांगडे, दोडया, शेंगाळा, सुकट आणि जोवला यांची आधीच बेगमी करून ठेवली जाई. कारण कोकणी माणसासाठी माशांशिवाय जेवण म्हणजे जणू चवीशिवाय आयुष्य! म्हणूनच दुधाची तहान ताकावर भागवावी, तशी समुद्राच्या चवीची ओढ या सुक्या मासळीने भागवली जात असे. त्या साधेपणातही समाधान होते आणि त्या समाधानालाच घरगुती चवीचा सुवर्णस्पर्श लाभलेला होता.

जगभरातील असंख्य पदार्थांची चव चाखल्यानंतरही मन एका साध्यासुध्या पदार्थासाठी का हळवे होते, याचे उत्तर 'कांदोगोलमो' देतो. तव्यावर खरपूस भाजलेला गोलमो, त्यात चवीनुसार घातलेले मीठ-मसाला आणि बारीक चिरलेला रसाळ कच्चा कांदा एवढ्याशा संगमातून तयार होणारी ही चव म्हणजे अक्षरशः स्वर्गीय आनंद! आज पंचतारांकित हॉटेलमधील महागडी मेजवानी समोर आली, तरी त्या अस्सल गावरान कांदोगोलम्याच्या एका घासापुढे तीही फिकी वाटावी, अशी त्याची जादू आहे.

शनिवार-रविवारच्या निवांत सकाळी अजूनही मनाच्या पडद्यावर तितक्याच जिवंतपणे उमटतात. पूर्व दिशेला उधळलेले तांबूस सोनेरी किरण, घरातील जुन्या रेडिओवर सुरू असलेला 'आरोग्य धनसंपदा' कार्यक्रम आणि त्याचवेळी चुलीभोवती आईच्या मायेचा दरवळ... हे सारे वातावरण आजही स्मरणात ताजे आहे. चुलीवर आधी तांदळाच्या शुभ्र, गरमागरम आणि टम्म फुगलेल्या भाकऱ्या भाजून तयार व्हायच्या. त्यानंतर त्याच लालबुंद तव्यावर आई जेव्हा गोलमो भाजायला टाकायची, तेव्हा सुटणारा तो खरपूस, खमंग सुवास संपूर्ण घरभर दरवळायचा. त्या सुगंधानेच पोटातील भूक दुप्पट व्हायची आणि मन आनंदाने भरून यायचे.

या पदार्थाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सहजता. ना मसाल्यांचा थाट, ना पाककलेचा दिखाऊपणा. तव्यावर भाजलेला गोलमो, चिमूटभर मीठ, थोडासा मसाला आणि बारीक चिरलेला कच्चा कांदाड्ढ एवढेच त्याचे विश्व. पण जेव्हा हा कांदोगोलमो गरमागरम तांदळाच्या भाकरीसोबत तोंडात जातो, तेव्हा त्या चवीसमोर जगातील कोणतेही वैभव क्षणभर थांबून जाते. साधेपणात दडलेले सौंदर्य आणि चवीत दडलेले समाधान याचा तो जिवंत अनुभव असतो.

चुलीच्या उबदार शेजारी जमिनीवर बसून, आईच्या हाताने वाढलेली गरम भाकरी आणि सोबत कांदोगोलमो... त्या क्षणांना शब्दांत मांडणे कठीण आहे. त्या घासांमध्ये केवळ अन्न नव्हते; तर मायेचा स्पर्श, प्रेमाची ऊब आणि घराच्या ओळखीचा सुगंध मिसळलेला होता. गोलम्याचे कितीही आधुनिक प्रकार बनवले, तरी कच्च्या कांद्यासोबत मिळणारी त्याची अस्सल, गावरान आणि अलौकिक चव आजही अद्वितीयच आहे.

'कांदोगोलमो' ही फक्त भूक भागवणारी न्याहारी नव्हती; ती आईच्या हातच्या प्रेमाची चव होती, बालपणातील निष्पाप आठवणींची शिदोरी होती आणि कोकणच्या मातीतून दरवळणाऱ्या संस्कृतीचाजिवंत वारसा होती. प्रत्येक घासात समुद्राचा खारटपणा, चुलीचा धुरकट सुगंध, आईच्या हातांचा मायेचा स्पर्श आणि गावच्या मातीचा गंध सामावलेला होता.आजकाळ बदलला, जीवनशैली बदलली, खाद्यसंस्कृतीही बदलली; पण कोकणी माणसाच्या मनातील कांदोगोलम्याचे स्थान मात्र आजही अढळ आहे.

जिभेवर रेंगाळणारी त्याची चव आणि मनात दरवळणाऱ्या त्या बालपणीच्या आठवणी या दोन्हींची सर आजही कशालाच नाही. कारण काही चवी या केवळ चवी नसतात... त्या आपल्या आयुष्याचा, संस्कृतीचा आणि भावविश्वाचा अविभाज्य भाग बनून कायमच्या हृदयात जपल्या जातात. **

# संपन्न जीवनदर्शन... विवेकदीप

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७




'विवेक दीप' हे प्रा.विलास रणसुभे यांनी संपादित केलेले पुस्तक, कोल्हापूरच्या श्रमिक प्रतिष्ठानने प्रकाशित केले आहे. सुरुवातीला प्रा.विलास रणसुभे यांनी या पुस्तकामागील संकल्पना स्पष्ट केली आहे. के.डी खुर्द यांचा, त्यांना दहा-बारा वर्षांचा सहवास लाभला. सरांचे कार्य अंधश्रद्धा निर्मूलन, समाजजागृती, पर्यावरण आणि अहिंसेला अनुसरून आहे. त्याचे कार्य चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे, धार्मिक सणांकडे नव्या दृष्टीने पाहणारे, जनतेत पर्यावरणाबाबत जागृती करणारे आहे. त्यांचे कार्य महाराष्ट्रातील जनतेला माहीत व्हावे, या हेतूने हे पुस्तक प्रकाशित करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या पुस्तकात कॉ. के.डी. खुर्द यांच्याशी संबंधित पंचवीस लेख समाविष्ट आहेत.

सामाजिक भान असलेला कार्यकर्ता, या लेखात कॉ.गोविंद पानसरे यांनी के.डी खुर्द, यांना महाराष्ट्र राज्य अंधश्रद्धा निर्मूलन समितीचेवतीने जीवन गौरव पुरस्कार अर्पण करण्यात आला, त्यानिमित्ताने लिहिलेल्या, या पुनर्मुद्रित लेखातून त्यांच्या जीवन कार्याची माहिती मिळते. के.डी. खुर्द (१९३४-२०२३) यांच्या सार्वजनिक कार्याची सुरुवात मलकापूर या गावात झाली. त्या काळातील तेथील प्रबळव्यापारीवर्गाविरुद्ध, सुमारे ३५-४० वर्षांपूर्वी, तरुण आघाडी उभी राहिली होती होती. या तरुण आघाडीने मलकापूर नगरपालिकेच्या निवडणुका लढवून यश मिळिवले होते. त्या आघाडीत काशिनाथ खुर्द सहभागी झाले होते. मात्र ते सरकारी नोकरीत असल्यामुळे, या तरुण आघाडीच्या नेत्यात त्यांची गणना होत नव्हती.

के.डी.खुर्द यांची जगण्याची पद्धत, वागण्याची पद्धत आणि कार्य करण्याची पद्धत यापासून नवीन कार्यकर्त्यांनी काही शिकावे असे बरेच आहे. हे पानसरे यांनी सविस्तरपणे मांडले आहे. डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ.अशोक चौसाळकर यांनी आपल्या खुर्द यांच्याविषयीच्या विविध आठवणी मांडल्या आहेत. विवेक वाटेवरचा पथिक, या डॉ.श्रीराम पवार यांच्या लेखातून के.डी.खुर्द यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू स्पष्ट होतात. त्यांचा परिचय झाला, तेव्हा ते शिक्षकी पेशातून निवृत्त झाले होते. मात्र त्यानंतर त्यांनी समाजशिक्षकाची भूमिका कशी बजावली, हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.

शेवटी ते लिहितात, समाज अधिक आक्रस्ताळा, अधिक विखुरलेला, अधिक एकारलेला होण्याचा धोका स्पष्ट असताना, जाता-धर्मावरून भिंती घालणाऱ्या फुटपाड्या दादांचे उद्योग फोफावत असताना, विज्ञानापेक्षा रुढीपरंपरांच्या जोखडाखाली नव्या रूपात समाजाला नेण्याचा जोर वाढत असताना, खुर्द यांच्यासारख्या विवेकी माणसांचे अवतीभवती असणे किती महत्त्वाचे होते, हे अधिक तीव्रतेने जाणवते. कॉ. दिलीप पवार, उदय गायकवाड यांच्या सविस्तर लेखांतून के.डी.खुर्द यांच्या कार्याचे संपूर्ण दर्शन होते. खुर्द सरांनी सर्वप्रथम रंकाळा तलावात गणेश विसर्जनाच्या निमित्ताने होणारे व्यापक प्रदूषण टाळण्यासाठी मोठे शिस्तबद्ध आंदोलन केले आणि ते यशस्वीही केले. त्यासाठी त्यांनी विविध संस्थांचे, शासकीय यंत्रणांचे उत्तम सहकार्य मिळिवले. लोकांना ते पटवून दिले. कालांतराने हे आंदोलन महाराष्ट्रभर पसरले आणि नंतर महाराष्ट्र सरकारनेही स्वीकारले. कोल्हापूर जिल्ह्यात साडेचार लाख मूर्ती आणि हजार टन निर्माल्य संकलित होऊन, जलस्रोत अबाधित ठेवता आले. त्यांच्या या कार्याला न्यायालयानेही दुजोरा दिला होता. 'के.डी.खुर्द : दाभोलकर-पानसरेंचा सच्चा सैनिक' या लेखात हमीद दाभोलकर यांनी लिहिले की, महाराष्ट्र अंनिसचे जे सुरुवातीचे शिलेदार होते, त्यांच्यामध्ये खुर्द सरांचा समावेश होता. पस्तीस वर्षांपूर्वी कट्टरपंथीय लोकांच्या विरोधाला न जुमानता त्यांनी कोल्हापुरात विसर्जित गणपती दान करण्याची मोहीम यशस्वी केली. पुढे डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी ही मोहीम राज्यभरात नेली. खुर्द सरांचा दुसरा लाडका उपक्रम म्हणजे कार्यकर्त्यांना वृत्तपत्रातील 'वाचकांचा पत्रव्यवहार'मध्ये पत्र लिहायला उद्युक्त करणे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांपर्यंत आपली चळवळ पोहोचू शकेल असे त्यांना वाटत असे. खुर्द सरांचे सगळे कुटुंबीय त्यांच्या कामात त्यांना साथ देणारे होते. डॉ.नरेंद्र दाभोलकर आणि कॉम्रेड पानसरे यांना सामाजिक कार्य करताना, स्वतःचे बलिदान द्यावे लागले, याची खुर्द सरांना खंत होती. मात्र त्यांनी हताश होऊन काम थांबवले नाही. अखेरच्या श्वासापर्यंत सामाजिक कामाशी असलेली आपली नाळ त्यांनी जपली होती. त्यांनी दाखविलेल्या वाटेने चालण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे त्यांची आठवण जपणे आहे, असे हमीद शेवटी लिहितात. उमेश सूर्यवंशी, अनिल चव्हाण, मिलिंद यादव, हर्षद लवंगारे, सुजाता म्हेत्रे या खुर्द सरांनी घडविलेल्या विविध तरुण कार्यकर्त्यांनी लिहिलेले सविस्तर लेख नितांत वाचनीय आणि त्यांच्या कार्याची सविस्तर ओळख करून देणारे आहेत. कार्यकर्ते घडवणारे विद्यापीठ, या लेखात कृष्णात स्वाती यांनी सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी, कोल्हापूरमधील आपल्या आठवणी आणि खुर्द सरांचे मार्गदर्शन याविषयी सविस्तर लिहिले आहे. त्यांच्या मते, 'के.डी.खुर्द नावाचे जिल्ह्यातील एक परिवर्तनाचे कार्यकर्ते घडवणारे जिवंत विद्यापीठ आमच्या आजूबाजूला वावरत होतं. त्यांच्या तोंडातून निघणारा प्रत्येक शब्द जणू परिवर्तनासाठी होता. त्यांनी केलेली प्रत्येक कृती जणू परिवर्तनासाठीच होती.' रमेश वडगणेकर यांनी खुर्द सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही विशेष पैलू स्पष्ट केले आहेत. सरांनी राजकारणाचा कधीही द्वेष केला नाही. राजकारण समाज बदलासाठी आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते. खुर्द सरांनी जटा निर्मूलनाचे अवघड काम करून दाखविले. स्त्रियांच्या केसातील अस्वच्छतेमुळे जट निर्माण होते आणि तिची अंधश्रद्धेमुळे जोपासना होते. जटा निर्मूलनाचा कार्यक्रम सरांनी सार्वजनिक ठिकाणी केला आणि प्रचलित अंधश्रद्धांना चोख उत्तर दिले. शिक्षण विस्तार अधिकारी असताना, विविध शाळांमध्ये त्यांनी मुलींचे बॉयकट करण्यास प्रोत्साहन दिल्यामुळे, त्यांच्या भावी जीवनात, जट निर्माण होण्याची शक्यताच दूर झाली. संविधानिक मूल्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, धर्मनिरपेक्षता, धर्मचिकित्सा या विचारांचा प्रसार, प्रचार झाला पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने आपला देश समृद्ध होईल असे त्यांना वाटत असे. 'निवृत्ती न स्वीकारणारे के.डी. खुर्द' हा प्रसाद कुलकर्णी यांचा सविस्तर लेख, त्यांच्या जीवनाचा उत्तम आढावा घेतो. शेवटी प्रसाद लिहितात, समाजाचे वैचारिक पर्यावरण चांगले ठेवायचे असेल, तर भारतीय राज्यघटनेचे तत्त्वज्ञान समाजात रुजवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याचे सजग कृतिशील भान ठेवत के.डी.खुर्द विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी व्रतस्थपणाने प्रबोधन करत राहिले. हे त्यांचे कृतिकार्य प्रेरणादायी आणि अनुकरणीय आहे. खुर्द सर यांच्या विविध नातेवाईकांनी लिहिलेले लेख नितांत वाचनीय आणि अतिशय हृद्य आहेत. त्यामधून त्यांचे सामाजिक कार्य आणि घरगुती जीवन उत्तम प्रकारे उलगडले जाते. 'विवेक दीप' हे पुस्तक एका आदर्श माणसाची जीवनकहाणी, विखुरलेल्या, असंख्य वाचकांसमोर उत्तम प्रकारे मांडत आहे.अशी पुस्तके जास्तीतजास्त विचारी वाचकांपर्यंत पोहोचल्यास, त्यांचे विचार समाजात निश्चितपणे रुजण्यास आणि वाढण्यास मदत होईल, याची खात्री वाटते. पुस्तकातील समाविष्ट विविध रंगीत छायाचित्रांतून त्यांच्या कार्याचे दर्शन होते आहे. ●

**पुस्तकाचे नाव : विवेक दीप**
**संपादक : विलास रणसुभे, ९८२२८७४८८१**
**प्रकाशक : श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर ९४२३२६४९३९**
**पहिली आवृत्ती : फेब्रुवारी २०२६**
**पृष्ठे : ११२ मूल्य : रु.१००/**

# विद्यार्थ्यांनी केवळ सरकारी नोकरीच्या भरवशावर न राहता कलागुणांवर भर द्यावा

**निलेश साठे**




आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक विद्यार्थी सरकारी नोकरीचे स्वप्न पाहत असतो. स्थिर उत्पन्न, नोकरीची सुरक्षितता आणि सामाजिक प्रतिष्ठा यामुळे सरकारी नोकरीचे आकर्षण कायम आहे. मात्र, केवळ सरकारी नोकरीच्या भरोशावर राहणे हा योग्य पर्याय नाही. आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी आपल्या कला, कौशल्ये आणि अंगभूत गुणांचा विकास करण्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.सध्या सरकारी नोकऱ्यांची संख्या मर्यादित आहे, तर अर्जदारांची संख्या लाखोंमध्ये आहे. त्यामुळे अनेक तरुण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करत राहतात. काहींना यश मिळते, तर अनेकांना निराशेचा सामना करावा लागतो. त्यामुळे आयुष्यातील महत्त्वाचा काळ केवळ एका पर्यायावर अवलंबून न राहता स्वतःच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी वापरणे गरजेचे आहे.प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. कोणाला संगीताची आवड असते, कोणाला चित्रकला, लेखन, अभिनय, क्रीडा, संगणक, तंत्रज्ञान, व्यवसाय किंवा उद्योजकतेची आवड असते. योग्य प्रशिक्षण, मेहनत आणि सातत्य यांच्या जोरावर या कलांमधूनही यशस्वी करिअर घडवता येते. आज डिजिटल युगात सोशल मीडिया, यूट्यूब, फ्रीलान्सिंग, स्टार्टअप्स आणि विविध ऑनलाइन व्यवसायांमुळे कौशल्यांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे.याचा अर्थ सरकारी नोकरीची तयारी करू नये असा नाही. परंतु त्याचबरोबर एखादे कौशल्य आत्मसात करणे, संवादकौशल्य, संगणक ज्ञान, इंग्रजी आणि मातृभाषेवरील प्रभुत्व, तसेच उद्योजकीय विचारसरणी विकसित करणे तितकेच महत्त्वाचे आहे. कौशल्य असलेली व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत स्वतःसाठी रोजगार निर्माण करू शकते.

आजचा विद्यार्थी हा फक्त नोकरी शोधणारा नसून रोजगार निर्माण करणारा बनला पाहिजे. कला, कौशल्ये आणि आत्मविश्वास यांच्या बळावर तो स्वतःचे आणि इतरांचेही भविष्य उज्ज्वल करू शकतो. म्हणूनच विद्यार्थ्यांनी सरकारी नोकरी हा एक पर्याय म्हणून ठेवावा, पण संपूर्ण आयुष्य त्याच्यावर अवलंबून न ठेवता स्वतःच्या कला, गुण आणि कौशल्यांच्या विकासावर भर द्यावा. हाच आजच्या काळाचा खरा मंत्र आहे. **

# जिल्ह्यात विठ्ठल नामाचा जयघोष

**आषाढी एकादशीनिमित्त जिल्ह्यात आनंद, उत्साहाचे आणि भक्तीमय वातावरण पहायला मिळाले. विठूरायचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात भाविकांची मांदियाळी जमली होती. अनेक शहरांत, गावात पालखी, दिंडीचे आयोजन करून विठूनामाचा जयघोष करण्यात आला होता. सकाळपासूनच जिल्ह्याच सर्वत्र भक्तीमय, उत्साहाचे वातावरण दिसत होते. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाईने उजळून निघाले होते. पहाटेपासून काकड आरती, महापूजा आणि प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. रंगीबेरंगी सजावट, पारंपरिक पूजा आणि हरिनामाच्या गजरात जिल्हा विठुरायाच्या चरणी नतमस्तक झाला होता.**



## विठ्ठल भक्तांना फळांचे वाटप

### स्व. नमिता नाईक यांच्या स्मृतीला मानवंदना

**। अलिबाग । प्रतिनिधी।**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त अलिबाग शहरातील शिवाजी पुतळा चौक येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात माजी नगराध्यक्षा स्व. नमिता प्रशांत नाईक यांच्या स्मरणार्थ विठ्ठल भक्तांना फळांचे वाटप करण्यात आले. आदर्श मित्र मंडळ, घरत आळी यांच्यावतीने आयोजित या सामाजिक उपक्रमात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना फळांचे वितरण करण्यात



आले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विठ्ठल भक्त उपस्थित होते. याप्रसंगी रविकिरण आंबेकर, उदय तेली, सिद्धार्थ नाईक, सुशांत पाटील, कपिल अनुभवणे यांच्या हस्ते फळांचे वाटप करण्यात आले.

## म्हसळ्याच्या गवळवाडीत विठूनामाचा जागर

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीचे निमित्ताने न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा आणि पी. एम. श्री प्राथमिक शाळा म्हसळा च्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेषात म्हसळा गौळवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात विठूनामाचा जागर करीत दर्शन घेतले.

म्हसळा तालुक्यातील प्रती पंढरपूर असलेल्या श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात या निमित्ताने शेकडो भाविक भक्त टाळ मृदुंग, पताका, हाती घेऊन म्हसळा गौळवाडी विठ्ठल मंदिरात दिंडी काढून टाळमृदूंगाच्या गजरात विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. मुलींनी नऊवारी साडी तर मुलांनी धोतर आणि टोपी असा पारंपरिक वेष केला होता. अनेक भक्तांनी दर्शन घेतले आणि दिंडीत सहभागी झाले.पायी



● (छायाचित्र -उदय कळस )

हळू हळू चाला मुखाने हरी नाम बोला, जय हरी विठ्ठल, जय जय विठ्ठल नामाचा जयघोष करीत पंढरीच्या वारीची आठवण करून दिली. तालुक्यातील शेकडो भाविक भक्तांनी श्री विठ्ठल रखुमाईची मनोभावे पूजा करून दर्शन व प्रसादाचा लाभ घेतला. यावेळी म्हसळा गौलवाडी ग्रामस्थांनी भाविक भक्त गणांसाठी उपवासाच्या फराळाची व्यवस्थित केली होती. गौलवाडी ग्रामस्थ मंडळाचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ यांनी भक्त -भाविकांची उत्तम प्रकारे व्यवस्था ठेवली होती.

## नागोठण्यातील आषाढी एकादशी उत्साहात

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील श्री ज्ञानेश्वर व विठ्ठ्ल रूक्मिणी मंदिरात शनिवारी (दि.२५) आषाढी एकादशी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित्त येथील संत सेवा मंडळाच्या वतीने ज्ञानेश्वर मंदिरात पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आषाढी एकादशी निमित्ताने विठू माउलीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. आषाढी एकादशीच्या निमित्ताने मंदिरात दिवसभर हरिनामाचा गजर सुरू होता.

श्री ज्ञानेश्वर मंदिरातील आषाढी एकादशीच्या कार्यक्रमाची सुरुवात पहाटे चार वाजता श्री विठ्ठल रूक्मिणी यांच्या काकड आरतीने करण्यात आली. त्यावेळी अनेक भाविकांसह नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक उपस्थित होत्या. त्यानंतर पहाटे पाच वाजता विठ्ठल रूक्मिणींच्या मुर्तींवर व दिगंबर



जाधव, प्रणव रावकर व सौ. व श्री. शिर्के या दांपत्याच्या हस्ते अभिषेक करण्यात आला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने येथील भारतीय एज्यकेशन सोसायटीच्या एस. डी. परमार इंग्लिश मिडियम स्कूल व होली एंजल्स स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून संताच्या व वारकऱ्यांच्या वेशात दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंड्याचे मंदिरात आगमन झाल्यानंतर या छोट्या वारकऱ्यांचे श्री संत सेवा मंडळाच्या वतीने फुले देऊन स्वागत करण्यात आले व त्यांना प्रसाद म्हणून केळी व लाडूचे वाटप करण्यात आले. यावेळी भाएसो एस. डी. परमार शाळा समिती अध्यक्ष सुरेश जैन, होली एंजल स्कूलचे विजय मुल्कवाड उपस्थित होते.

## शेलूमध्ये बाळ दिंडीचा उत्सव



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या शेलू येथील केंद्र शाळेने आषाढी एकादशी निमित्त बाल दिंडी काढून उत्सव साजरा केला. शाळेतून निघालेली दिंडी गावात एक प्रदक्षिणा मारीत पुन्हा शाळेत पोहचली.

राजिप केंद्र शाळा शेलू येथे आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये सहभागी बाल वारकरी यांनी ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात संतांच्या विचारांचा वारसा जपत आणि भक्ती, संस्कार, समता व मानवतेचा संदेश देत मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा यशस्वी केला.

या बालदिंडीचा शुभारंभ कर्जत पंचायत समितीचे सदस्य महेश लक्ष्मण खारीक यांच्या पालखी पूजन करून झाली. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषात तसेच अभंग आणि भजनांच्या माध्यमातून वारकरी परंपरेचे दर्शन घडविले. ग्रामस्थांनी दिंडीचे गावातील चौका चौकात आणि अनेक ठिकाणी स्वागत केले. या कार्यक्रमाचे नियोजन दुर्वास सोनावणे, केंद्र शाळेचे शिक्षक सुनील जाधव, विशाल सूर्यवंशी, लता गवई, अलका कंधारे, शोभा गायकवाड यांनी केले.



## नवघर शाळेचा परिसर बालदिंडीने दुमदुमला

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीनिमित्त रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा, नवघर येथे शनिवारी दि. (२५) रोजी भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात बालदिंडीचे आयोजन करण्यात आले. मशिक्षण हीच वारी, वारी समतेची आणि वारी पर्यावरणाचीफ असा सामाजिक संदेश देत विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा गजर करत संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन काढला. सकाळी शाळेच्या प्रांगणातून बालदिंडीला प्रारंभ झाला. विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेत सजलेले विद्यार्थी, हातात टाळ-मृदंग, भागवत धर्माचे पताके आणि सजविलेली पालखी घेऊन वारकरी रूपात सहभागी झाले होते. ज्ञानोबा माऊली तुकाराम आणि विठ्ठल रुक्मिणीच्या जयघोषाने नवघर परिसर दुमदुमून गेला. यावेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारीची परंपरा जपत शिक्षण, सामाजिक समता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारी घोषवाक्ये दिली. त्यामुळे बालदिंडीला सामाजिक प्रबोधनाचीही जोड मिळाली. गावातून मार्गक्रमण करत बालदिंडी नवघर येथील विठ्ठल मंदिरात पोहोचली. मंदिरात विद्यार्थिनींनी भक्तिमय सांस्कृतिक नृत्य सादर केले. त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत आषाढी वारीचा आनंद लुटला.

शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर यांनी उपस्थितांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत विठ्ठल नामाचा गजर केला. बालदिंडीचे नियोजन वृषाली गुरव, राजेंद्र अंबिके, रुपाली लेंडवे, श्वेता जाधव यांनी केले.

## सुतारवाडीचे विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेशभूषेत



**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीनिमित्त डॉ. जी. आर राजे प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडीचे विद्यार्थी वारकऱ्यांच्या पारंपारिक वेश, भूषेत ढोबळेवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात टाळ मृदंगाच्या गजरात पोहोचून भक्ती भावाने आरती केली. याप्रसंगी लहान मुलींनी नऊवारी साडी आणि मुलांनी पारंपारिक पद्धतीने डोक्यावर टोपी धोतर परिधान केले होते. यावेळी संपूर्ण परिसरामध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत झाला होता. कविता भालेराव, शितल सानप, हरिचंद्र महाडिक, सानिका मोरे आदी दिंडीमध्ये सहभागी झाले होते. याप्रसंगी स्कूलचे संस्थापक डॉ. रमेश राजे तसेच सर्व विश्वस्त, सर्व स्कूल कमिटी मेंबर आणि पालकांनी चिमुकल्यांचे विशेष कौतुक केले.



● आषाढी एकादशीनिमित्त अलिबाग जवळील वरसोली येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. तसेच रुळे गावातून वरसोली विठ्ठल मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली होती. (छायाचित्र - समीर मालोदे)

## तळ्यात रंगला वारकरी दिंडीचा सोहळा

**। तळा । प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून तळा शहरातील मराठी शाळेत वारकरी दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. विठ्ठलाच्या नामगजरासह ज्ञानोबा-तुकोबाच्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला होता. या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पांडुरंगाच्या भक्ती गीतांवर सादरीकरण, गोल रिंगण, फुगड्या आणि वारकरी परंपरेशी निगडित विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाई तसेच वारकरी संप्रदायाच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. स याप्रसंगी सुप्रिया जामकर, मित्तल वावेकर, शिक्षक राजू थिटेकर, गोकुळ निकम, यांसह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रातवड विद्यालयात दिंडी, हरिपाठ

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात आषाढी एकादशी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृती, संत परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत, या उद्देशाने विद्यालयात विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रखुमाईच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. संतोष कदम, शालेय छात्रसंसद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या हस्ते पूजन संपन्न झाले. त्यानंतर विद्यालयातून पारंपरिक दिंडी काढण्यात आली. टाळ, मृदुंग आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजरात विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते.

## साखर शाळेत दिंडीचे आयोजन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी सोहळ्यात मोठ्या भक्तिमय वातावरणात सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी सहभाग घेतला होता. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक वातावरण निर्मिती होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी आणि वारकऱ्यांच्या वेशभूषा साकारल्या. सदर कार्यक्रमासाठी आक्षी ग्रामपंचायत सरपंच रश्मी पाटील, रविंद्र पाटील, हरिश्चंद्र बामजी, दिलीप फाळके, जयराम आंबेरकर, तेजस तांडेल, रेश्मा भुकवार, सदस्य देवदत्त मुंढे, हरेश्वर गोतकर, अंकिता भुकवार, रेश्मा तांडेल, अश्विनी गण, भावना जगू, जयेंद्र बुरांडे, सुनिता गोतकर, मनिषा तांडेल, नुतन तांडेल, अस्मिता भुकवार, मंदा गण, अमिता सारंग, राजश्री गण, उमा तांडेल, अमोली साटविलकर, कोमल गण, आरती सारंग, निकिता सारंग, मनिषा गुरव अंगणवाडी सेविका रिमा गुरव, स्मिता वर्तक, संजना नर्बेकर, मुख्याध्यापक राजेंद्र पाटील, उपशिक्षक स्मिता चिखले आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी हरेश्वर बामजी, सरपंच रश्मी पाटील यांच्यातर्फे अल्पोपहार देण्यात आला होता.

## मजगांवमध्ये दुमदुमला विठ्ठल नामाचा गजर

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील मजगांवमध्ये आषाढी एकादशीमित्त बापदेवपाडा प्रासादिक भजन मंडळातर्फे आगरी समाज विठ्ठल मंदिर, बाजारपेठेतील गणपती मंदिर व कुंभार वाड्यातील संत गोरोबा काका मंदिरात विठ्ठल नामाचा गजर दुमदुमला होता.



मजगांवमध्ये आगरी समाज, बापदेवपाडा प्रासादिक भजन मंडळातर्फे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कोळी समाज खारदोडकुले येथील आगरी समाज विठ्ठल मंदिरामध्ये, बाजारपेठेतील गणपती मंदिरात आणि कुंभार वाड्यातील संत गोरोबा काका मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील तमाम भाविक रसिक जनांनी लाभ घेतला आहे.

## साजगावच्या धाकटी पंढरीत विठ्ठल नामाचा गजर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील साजगाव येथील महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या धाकटी पंढरी येथे आषाढी एकादशीनिमित्त पहाटेपासून भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. राजिप सदस्या रेश्मा राजेश पाटील यांच्या हस्ते पहाटेची महापूजा संपन्न झाली.

पंढरपूर येथे प्रत्यक्ष दर्शनासाठी जाणे अनेक भाविकांना शक्य होत नसल्याने ते साजगाव येथील धाकटी पंढरीत येऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात. त्यामुळे या मंदिराला भाविकांमध्ये विशेष श्रद्धास्थान



प्राप्त झाले आहे.

आषाढी एकदशीनिमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी खोपोली पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भाविकांच्या सोयीसाठी मोफत अल्पोपहार सेवा, वैद्यकीय सुविधेसाठी डॉक्टरांची व्यवस्था तसेच हार-फुले, प्रसाद आदींची दुकाने उपलब्ध करण्यात आली होती. राज्यातील विविध भागांतून आलेल्या दिंड्या व पालख्या मंदिरात दाखल होताच ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल... विठ्ठल...च्या जयघोषाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)